# शब्द रुची

४८


जुलै २०२३ • मूल्य १० रु. • पृष्ठे ६०

कथाकार शांताराम अर्थात के.ज. पुरोहित जन्मशताब्दीदिनी 'मित्रास्त'चे प्रकाशन




डॉ. सुरेखा सबनीस, सुदेश हिंगलासपूरकर, न्या. नरेंद्र चपळगावकर, डॉ. श्रीरंग पुरोहित, डॉ. अभय बंग आणि डॉ. रवींद्र शोभणे

संपन्न अभिनय
आणि
जीवन



# मॅग्नेटिक महाराष्ट्र



## प्रमुख औद्योगिक समूह

- **मुंबई–ठाणे–रायगड । १५००० एकर**
  अभियांत्रिकी । अन्न प्रक्रिया । वाहन उद्योग व सुटे भाग । रसायने । औषधनिर्माण
- **पुणे–चाकण–तळेगाव–सातारा । ८००० एकर**
  डाटा सेंटर । रत्ने व आभूषणे । अभियांत्रिकी । अन्न प्रक्रिया । वाहन व सुटे भाग । इएसडीएम लॉजिस्टिक्स
- **नाशिक–मालेगाव–अहमदनगर । ५००० एकर**
  अन्न प्रक्रिया । वैद्यकीय उपकरण । इएसडीएम । अभियांत्रिकी
- **औरंगाबाद (AURIC, DMIC) – जालना । ८००० एकर**
  अन्न प्रक्रिया । वाहन व सुटे भाग । इएसडीएम । वस्त्रोद्योग
- **नागपूर– अमरावती । ४००० एकर**
  अंतराळ आणि संरक्षण । अभियांत्रिकी । वस्त्रोद्योग । अन्न प्रक्रिया
- **रत्नागिरी – सिंधुदुर्ग । ५,१५० एकर**
  अभियांत्रिकी । रसायने । तेल आणि नैसर्गिक वायू । शेती व अन्न प्रक्रिया । सागरी उत्पादने

## महाराष्ट्र : देशाचे आर्थिक शक्तीकेंद्र

- **भारतातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था**
  महाराष्ट्राचे एकूण देशांतर्गत उत्पादन मूल्य ४२० अब्ज डॉलर्स; भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादनामध्ये १४.२% योगदान
- **थेट परदेशी गुंतवणूकीमध्ये सर्वाधिक वाटा**
  एप्रिल २००० ते मार्च २०२३ या कालावधीत १८९ बिलियन डॉलर्स थेट परदेशी गुंतवणुकीस आकर्षित केले. भारताच्या एकूण वाट्यात ३०% योगदान.
- **उत्पादनात अग्रेसर**
  भारताच्या एकूण औद्योगिक उत्पादनात महाराष्ट्राचे १३.८% योगदान
- **IPRS मध्ये सर्वोत्तम औद्योगिक क्षेत्रे**
  केंद्र सरकारच्या उद्योग संवर्धन आणि अंतर्गत व्यापार विभागामार्फत (DPIIT) इंडस्ट्रियल पार्क रेटिंग सिस्टीम (IPRS) अहवालानुसार महाराष्ट्रात देशातील सर्वाधिक सर्वोत्तम औद्योगिक क्षेत्रे
- **उत्तम कायदा व सुव्यवस्था**
  महाराष्ट्र राज्य हे प्रगतिक प्रशासन व धोरण सातत्यासाठी ओळखले जाते.
- **निर्यातीत अग्रस्थानी**
  महाराष्ट्राचे निर्यात मूल्य सर्वाधिक आहे. भारताच्या एकूण निर्यातीत १६% योगदान.
- **सर्वोत्तम गुणवत्तेचे मनुष्यबळ**
  भारतातील सर्वाधिक म्हणजे ७०% रोजगार क्षमता गुणवत्ता महाराष्ट्रात आहे.
- **समृद्ध पायाभूत सुविधा**
  ४ आंतरराष्ट्रीय आणि १३ देशांतर्गत विमानतळ, २ प्रमुख व ४८ लहान बंदरे आणि सर्वाधिक ऊर्जा क्षमता.

## प्रमुख सुधारणा

१. **प्लग अँड प्ले पायाभूत सुविधा**
एमएसएमईसाठी राखीव असलेल्या क्षेत्रातून २५% क्षेत्र (तब्बल १११२.५ एकर) प्लग अँड प्ले डेव्हलपमेंटसाठी आरक्षित केले जाईल.
महाराष्ट्र प्लग अँड प्ले इन्फ्रास्ट्रक्चर आणि कॅप्टिव्ह विक्रेत्यांसाठी परवडणाऱ्या भाड्याने शेड, सोयी – सुविधा, एक्स–पॅट हाऊसिंग आणि मॉड्युलर स्पेस १००% अनुकूल इकोसिस्टमसह वापरण्यास तयार असलेल्या पायाभूत सुविधांचा वापर करण्यासाठी गुंतवणूकदारांना थेट वाटप ऑफर करतो.

४. **गुंतवणूकदार प्रथम योजना– १४९ करार भागीदारांसाठी नेमणूक १० गुंतवणूक सहकारी**
संपूर्ण देखरेख आणि गुंतवणूकदारांना अविरतपणे आवश्यक सहाय्य पुरविण्याच्या उद्देशाने रिलेशनशिप मॅनेजर (आरएम) आणि रिलेशनशिप एक्झिक्युटिव्ह (आरइ) नियुक्त करण्यात आले आहेत.

## गुंतवणूक करारांवर स्वाक्षरी

उद्योग विभागाने एमआयडीसीसोबत जून २०२० ते जून २०२३ या कालावधीत रु. ४,१७,८३५ कोटी रुपयांचे १४९ सामंजस्य करार केले आणि ५,६९,४७६ ची संभाव्य रोजगारांची निर्मिती केली.

- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जून व जुलै २०२० –**
  **रु १७,६८६ कोटी । १४,०२५ रोजगार**
  सामंजस्य करार– १५ । आधारभूत क्षेत्रे – रसायने, वाहन, इएसडीएम, तेल आणि वायू । प्रमुख राष्ट्रे – युएसए, जपान, सिंगापूर, दक्षिण कोरिया
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२० –**
  **रु ३४,८२९ कोटी । २३,१८२ रोजगार**
  सामंजस्य करार– १५ । आधारभूत क्षेत्रे – डाटा सेंटर, लॉजिस्टिक्स, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे – स्पेन, युनायटेड किंगडम, जपान, सिंगापूर, भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२० –**
  **रु ६१,०४२ कोटी । २,५५,३८० रोजगार**
  सामंजस्य करार– २५ । आधारभूत क्षेत्रे – डाटा सेंटर, लॉजिस्टिक्स, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे – भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, जुलै २०२१ –**
  **रु १६,५०० कोटी । ५,००० रोजगार**
  सामंजस्य करार– २ । आधारभूत क्षेत्रे – तेल आणि नैसर्गिक वायू, अक्षय ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे – ऑस्ट्रेलिया, भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, सप्टेंबर २०२१ –**
  **रु ३५,५०० कोटी । १०,००० रोजगार**
  सामंजस्य करार–२ । आधारभूत क्षेत्रे – अक्षय ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे – भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, ऑक्टोबर २०२१ –**
  **रु २,८२३ कोटी । १,२५० रोजगार**
  सामंजस्य करार– १ । आधारभूत क्षेत्रे – विद्युत वाहने । प्रमुख राष्ट्रे – युके.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, नोव्हेंबर २०२१ –**
  **दुबई एक्स्पो २०२० – रु १५,६१७ कोटी । ११,३८५ रोजगार**
  सामंजस्य करार–२५ । आधारभूत क्षेत्रे – लॉजिस्टिक, ऑटो कॉम्पोनंट्स, ऑक्सिजन मॅन्युफॅक्चरिंग, डेटा सेंटर्स, जैवइंधन । प्रमुख राष्ट्रे – जपान, सिंगापूर, स्वीडन, कोरिया, जर्मनी, इटली व भारत.
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, डिसेंबर २०२१ व जानेवारी २०२२**
  **रु ५,५१२ कोटी । ९,९८० रोजगार**
  सामंजस्य करार– १३ । आधारभूत क्षेत्रे – जैव–इंधन, IT/ITES, तांत्रिक वस्त्र, रसायने, ऑटो, इलेक्ट्रॉनिक्स । प्रमुख राष्ट्रे – फ्रान्स आणि भारत
- **मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०, मे २०२२**
  **रु ८०,४७९.७८ कोटी । ९६,७०५ रोजगार**
  सामंजस्य करार– २५ । आधारभूत क्षेत्रे – आयटी पार्क, आयटी – आयटीइएस आणि डेटा केंद्रे, वस्त्रोद्योग, अन्न प्रक्रिया, पेपर आणि पल्प, अभियांत्रिकी आणि पोलाद, अक्षय ऊर्जा, लॉजिस्टिक, तेल व वायू । प्रमुख देश – सिंगापूर, इंडोनेशिया, यूएसए, दक्षिण कोरिया आणि जपान.
- **जेएसडब्ल्यू एनर्जी, सप्टेंबर २०२२**
  **रु. ४,१९६ कोटी**
  सामंजस्य करार – १ आधारभूत क्षेत्र – ऊर्जा । प्रमुख राष्ट्रे – भारत
- **जागतिक आर्थिक मंच २०२३, जानेवारी २०२३**
  **रु. १,३७,६६६ कोटी (१७ अब्ज अमेरिकन डॉलर्स) ।**
  **१,०१,३८९ रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या–१९ । प्रमुख क्षेत्रे– ऊर्जा, उच्च तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधा उद्योग, पोलाद उत्पादन, कृषी आणि अन्न प्रक्रिया, आयटी/फिनटेक/डेटा सेंटर । प्रमुख राष्ट्रे भारत, पोर्तुगाल, जपान, यूएसए, मॉरिशस, नेदरलँड, फिनलँड, सिंगापूर, कॅनडा, तैवान, लक्झेंबर्ग, इस्रायल, कोरिया, जर्मनी.
- **आयएफसीसीआय, इन्व्हेस्ट इन महाराष्ट्र, एप्रिल २०२३**
  **रु. ९६७ कोटी । ११८० रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या– ५ । प्रमुख क्षेत्रे – इलेक्ट्रिक वाहने, ऑटोमोबाईल, वैद्यकीय उपकरणे, आरोग्य, अन्न प्रक्रिया.
- **बजाज फिनसर्व्ह लिमिटेड, जून २०२३**
  **रु. ५००० कोटी । ४०,००० रोजगार**
  सामंजस्य करारांची संख्या – १ । क्षेत्र – आर्थिक सेवा । देश – भारत

**एकूण गुंतवणूकीस चालना – रु ९,४५,३४९ कोटी**

**सामंजस्य करार – रु. ४,१७,८३५ कोटी**
(जून २०२० – जून २०२३)

**थेट परदेशी गुंतवणूक – रु. ४,०७,३२८ कोटी**
(ऑक्टोबर २०१९ – मार्च २०२३)

**नियमित गुंतवणूक – रु १,२०,१८६ कोटी**
(डिसेंबर २०२० पासून)

**वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम २०२३ – प्रमुख कॉरिडॉर भागीदारांबरोबर धोरणात्मक गुंतवणूक सहकार्य करार:**

- स्वीस इंडिया चेंबर ऑफ कॉमर्स इंडिया
- बर्कले विद्यापीठ
- सेंटर फॉर न्यू इकॉनॉमी अँड सोसायटी
- द वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम्स प्लॅटफॉर्म फॉर शेपिंग द फ्युचर ऑफ अर्बन ट्रान्सफॉर्मेशन

।। उद्यमात् सकल समृध्दिः ।।

MIDC

मुख्य कार्यालय:
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
उद्योग सारथी, महाकाली केव्हज रोड, अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००९३
**वेबसाईट:** www.midcindia.org

प्रमुख कार्यालय:
**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
४ (ए), १२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर कॉम्प्लेक्स १, कफ परेड, कुलाबा, मुंबई– ४०० ००५.
**वेबसाईट:** www.midcindia.org

**ग्रंथाली वाचक चळवळीचे मासिक**

शब्द रुची ४८

**जुलै २०२३, वर्ष दहावे**
**अंक तिसरा, मूल्य १० रु.**

संपादक : **सुदेश हिंगलासपूरकर**

कार्यकारी संपादक : **अरुण जोशी**

मुखपृष्ठ : **सतीश भावसार**

**कार्यालयीन संपर्क**
**कॉम्प्युटर युनिट – योगिता मोरे, अनिरुद्ध गद्रे**
shabdruchee@gmail.com
**जाहिरात प्रसिद्धी – धनश्री धारप**
**वितरण – हरिप्रसाद जयस्वाल, सौमित्र शिंदे**
**वेबसाइट डिझाइन व डिजिटल एडिटिंग**
**सचिन पिळणकर, समीर कदम**

**केवळ वार्षिक वर्गणी स्वीकारली जाईल.**
**वार्षिक वर्गणी ४०० रुपये**
**डिमांड ड्राफ्ट, म.ऑ. 'ग्रंथाली' नावे**

SCAN & PAY
1000210529000008.9821032830@idbi
GRANTHALI

पत्रव्यवहार/वर्गणी पाठवण्याचा पत्ता
ग्रंथाली, १०१, १/बी विंग, 'द नेस्ट', पिंपळेश्वर को-ऑप. हौसिंग सोसायटी, टायकलवाडी, स्टार सिटी सिनेमासमोर, मनोरमा नगरकर मार्ग, माहीम (प.), मुंबई ४०००१६
फोन : २४२१६०५० **(वेळ : दुपारी १ ते ६.३०)**

**अंकासाठी लेख व प्रतिक्रिया खालील मेलवर पाठवावी.**
**shabdruchee@gmail.com**

**ऑफिस वेळ : दुपारी १ ते सायं. ७**
**संपर्क/फोन/पुस्तके खरेदी करण्यासाठी**

**अंकात प्रसिद्ध झालेली मते ज्या त्या व्यक्तीची. 'ग्रंथाली' चळवळीचे 'शब्द रुची' हे व्यासपीठासमान मासिक आहे. त्यात सर्व छटांच्या विचारांना स्थान आहे. मात्र त्याच्याशी 'ग्रंथाली' विश्वस्त संस्था व तिचे विश्वस्त सहमत आहेत असे नव्हे.**

# अनुक्रम

**कांचन घाणेकर** / ५
माझी आत्ती

**आशा काळे** / ८
जीवनातल्या सर्वच भूमिकांत तादाम्य पावलेली अभिनेत्री

**अरुण पुराणिक** / ११
'मॉडर्न सुलोचना' – एक आठवण

**उषा तांबे** / १२
प्रभाताई पुरोहित

**राजेंद्र मुंढे** / १४
नैतिकता मूल्यविचार स्वीकारणारा समीक्षक – डॉ. किशोर सानप

**डॉ. विजय पांडे** / १७
जीवनाचा आस्वाद घेणारा मित्र

**राजश्री पाटील** / २०
इहलोक

**शरद काळे** / २३
निसर्गचक्राचा समतोल मानवाच्या हाती

**अपर्णा पाटील** / २७
तोचि धोका ओळखावा, मृत्यू तेथेची जाणावा

**राजीव श्रीखंडे** / ३१
द प्रेसिडेंट – मिगेल अस्टुरिअस

**डॉ. अनंत लाभसेटवार** / ३५
भारताची जागतिक प्रतिमा

**संजीवनी खेर** / ३७
डॉ. तस्लीमा नसरीन– जळीस्थळी उग्रवाद?

**किरण येले** / ४०
समाजात काम करत लिहिणारा ललितलेखक – मिलिंद घायवट

**वृत्तांत** / ४३

ग्रंथपरिचय – **गणेश मनोहर कुलकर्णी** / ५२
**अनिल चनाखेकर** / ५४

ग्रंथपाने – **चांगदेव काळे** / ५५

# संपादकीय...

**कथाकार** शांताराम अर्थात के.ज. पुरोहित यांची जन्मशताब्दी १५ जून २०२३ रोजी पूर्ण दिवस ‘कथा’ या विषयावर चर्चासत्रे आयोजित करून साजरी झाली. त्यात कथेचा स्वातंत्र्योत्तर कथेपासून आजच्या कथेपर्यंत झालेला प्रवास उलगडला गेल्याने एक महत्त्वपूर्ण विचारविनिमय घडला. त्याचा वृत्तांत अंकात आहे. याच्या संध्याकाळच्या सत्रात ‘मित्रास्त’ या के.ज. पुरोहित यांनी लिहिलेल्या मित्रांवरील आठवणींचे पुस्तक प्रसिद्ध झाले. पुरोहित यांनी साऱ्यांचा मार्मिक आणि वस्तुनिष्ठ मांडलेला पट अनेक नामवंतांच्या कलागुणांसह स्वभाववैशिष्ट्येही उलगडतो. या पुस्तकाच्या प्रकाशनावेळी डॉ. अभय बंग यांनी सद्य:स्थितीवर भाष्य केले. गेल्या दहा वर्षांपासून समाजात वाढलेल्या प्रतिगामित्वाबाबत परखड विचार मांडले. तसेच, लेखकांनी पुढचा विचार करून लिहिले पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी सोदाहरण व्यक्त केली. विचारांचे हेच साम्य २४ जून रोजी संपादक-समीक्षक सुनील कर्णिक यांच्या वयाच्या पंचाहत्तरीपूर्तीनिमित्त योजलेल्या सन्मानसोहळ्यात दिसले. साहित्य संस्थांवर आपली माणसे पेरण्याचा प्रकार गेली काही वर्षे जाणीवपूर्वक होत आहे आणि त्याद्वारे आपला अजेंडा राबवला जात आहे, असे मत व्यक्त होताना दिसले. माध्यमांत संपादक नावाची संस्था उरली नाही, सध्याचे संपादक परिपक्व नाहीत, त्यामुळे सवंगतेकडे आणि आपली नोकरी जाईल या भीतीपोटी मालकाकडून येणाऱ्या दडपणाखाली विवेकहीन पत्रकारिता चालल्याचे स्पष्ट मत समारंभाचे अध्यक्ष निखिल वागळे यांनी मांडले. सत्कारमूर्ती सुनील कर्णिक यांनीही ‘मराठी मरू घातलेली भाषा आहे’ या वि.का. राजवाडे यांनी अनेक वर्षांपूर्वी केलेल्या विधानाशी मी सहमत असल्याचे सांगताना मराठीचा वाङ्मयाचा प्रसार होण्यात लेखक काही करत नाहीत, अशी खंत व्यक्त केली.

सहजसुंदर अभिनय आणि सात्त्विक प्रतिमा रसिकांच्या मनावर कायमची ठसवून अभिनेत्री सुलोचना काळाच्या पडद्याआड गेल्या. हिंदी-मराठी सिनेमांत त्यांनी आपली अमीट छाप सोडली. त्यांच्या आठवणी कांचन घाणेकर, आशा काळे यांनी सांगितल्या आहेत. पूजा सामंत यांनी त्यांचे शब्दांकन केले आहे. अरुण पुराणिक यांनी सुलोचनादीदींचे दोनच, मात्र आगळे किस्से लिहिले आहेत.

के.ज. पुरोहित यांच्या पत्नी, लेखिका प्रा. प्रभा पुरोहित यांचे नुकतेच निधन झाले. त्या हा सोहळा पाहू शकल्या नाहीत याची खंत वाटते. त्यांची दोन पुस्तकं ‘ग्रंथाली’ने प्रसिद्ध केली. त्यानिमित्त या कुटुंबाची पाहिलेली अगत्यशीलता, खुलेपणा मनात कायम राहील. प्रा. उषा तांबे यांच्या त्या शिक्षिका. त्यांनी प्रभाताईंच्या अर्थात ‘बाईंच्या’ स्मृती जागवल्या आहेत.

‘ग्रंथाली’ने गेल्या वर्षी ‘मी बहुरूपी’ हे अशोक सराफ यांचा अभिनयप्रवास उलगडणारे पुस्तक प्रसिद्ध केले. त्यांच्या वयाच्या पंचाहत्तरीनिमित्त खास समारंभात त्याचे सुनील गावसकर यांच्या उपस्थिती प्रकाशन झाले. पुस्तकास लाभलेल्या प्रायोजकत्वातून आणि विक्रीतून आलेल्या निधीचा विनियोग पडद्यामागील वयस्कर कलाकारांबद्दल कृतज्ञता व्यक्त करून अर्थसाहाय्य करण्याकरता करावा, असे सराफ परिवार व ‘ग्रंथाली’ यांनी योजले होते. त्यानुसार शनिवार, २९ जुलै २०२३ रोजी वीसेक कलाकारांना हा कृतज्ञतानिधी प्रदान केला जाणार आहे.

राजीव श्रीखंडे, संजीवनी खेर, किरण येले आणि शरद काळे यांच्या नियमित सदरांसह राजेंद्र मुंढे, डॉ. विजय पांडे, गणेश कुलकर्णी, राजश्री पाटील, अपर्णा पाटील, डॉ. अनंत लाभसेटवार यांचे लेख आणि अनिल चनाखेकर यांनी लिहिलेला डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या दोन पुस्तकांचा परिचय असा मजकूर अंकात आहे.

के.ज. पुरोहित जन्मशताब्दी कार्यक्रमात ‘ग्रंथाली Listen’च्या नवीन कथांचे प्रकाशन झाले. यापैकी दोन कथांचे वाचन मधुरा वेलणकर आणि विजय केंकरे यांनी केले. या कथा यूट्यूबवर उपलब्ध आहेत. ‘ग्रंथाली वॉच’ आणि ‘ग्रंथाली प्रतिभांगण’ या यूट्यूब चॅनेलवरून प्रसारित होणारे विविध विषयांवरील कार्यक्रम आवर्जून पाहिले जात आहेत. हे दोन चॅनेल आपल्या आप्तांना सबस्क्राइब करायला सांगून याचा प्रसार करण्याचे सहकार्य कराल याची खात्री आहे.

**– अरुण जोशी**



# माझी आत्ती

कांचन घाणेकर



**कुठलंही** नातं समजून घ्यायला म्हटलं तर एक वर्ष पुरेसं होतं, म्हटलं तर एक जन्म पुरत नाही. अख्या देशाला अभिनेत्री सुलोचनादीदी म्हणून ज्ञात असलेली माझी आई जिला मी आत्ती म्हणत असे, त्या आत्तीचा सहवास मला तब्बल ७५ वर्षं लाभला! खरंच, मी भाग्यवान! तिची एकुलती एक लेक मी! नुकताच (१८ जून) फादर्स डे साजरा झाला, १४ मे रोजी 'मदर्स डे' साजरा झाला. माझ्यासाठी मदर्स डे आणि फादर्स डे हे दोन्ही एकत्रितपणे साजरे करावेत अशी आत्ती होती.. असंच आमचं नातं होतं.. तिनं आमच्या घरात वडील, आई अशी दोन्ही नाती बेमालूमपणे सांभाळली, सहज निभावून नेली. मी १२ वर्षांची असताना माझे वडील आबासाहेब चव्हाण यांच्या निधनानंतर आत्ती हेच माझं विश्व झालं. त्यामुळे आत्तीकडून आई आणि वडील असं प्रेम, नकळतपणे केलेले संस्कार, जीवनमूल्यं, कर्तव्य असा अभिषेक आपसूक, तिनं जाणीवपूर्वक न शिकवता माझ्यावर, घरातील व्यक्तींवर होत गेला. त्यामुळे आत्तीचं आणि माझं नातं हे परिभाषित नाही, पण तरीही माझ्या आणि तिच्या नात्याला अनेक पदर आहेत, अनेक गहिरी परिमाणं आहेत. तिच्याविषयी धाक, आदर, प्रेम, काळजी, अव्यक्त माया, खूप काही भावना दोघींच्या उरी होत्या.. दिवसामागून दिवस-वर्षांमागून वर्षं सरत गेली, पण लौकिकार्थानं किंवा आजच्या काळाप्रमाणे 'मॉम, आय लव्ह यू!' असं काही म्हटलं नाही..त्याची आवश्यकता भासली नाही.. शब्दातीत प्रेम होतं आमचं एकमेकींवर..

१६ सप्टेंबर १९४७ चा माझा जन्म. मी वाढत असताना मामांची ८ मुलं आणि मी अशा ९ मुलांना आत्तीनं वाढवलं, त्यांचं शिक्षण, करिअर, लग्नकार्य यातही तिनं स्वतःला झोकून देऊन प्रेमानं आपली कर्तव्यं निभावली. मामाची मुलं माझ्या आईला आत्ती (आत्याचा अपभ्रंश) म्हणतात, हेच मी कायम ऐकत आले म्हणून माझ्यासाठी माझी आई ही माझी आत्ती ठरली, कायमच. माझ्या आईला, अर्थात आत्तीला एकच भाऊ. आत्ती त्याला दादा म्हणे, मग मी त्याला मामा न म्हणता दादा म्हणू लागले, माझ्यासह सगळ्यांचा तो दादा हे संबोधन ठरले. आत्ती आणि मेहनत-संघर्ष कायम.. माझ्यावेळी आत्ती गर्भार असताना तिचे ९ महिने भरेपर्यंत ती काम करत होती. तिचा नववा महिना असताना ती भालजींच्या (भालजी पेंढारकर) जयप्रभा स्टुडिओत ३० रुपये महिना पगारावर काम करत असे. तिनं बाबांच्या (भालजी पेंढारकर) स्टुडिओत कामाला सुरुवात केली, ती हल्ली ज्याला ज्युनिअर आर्टिस्ट म्हणतात, तशी. एक सालस, सच्ची, कष्टाळू मुलगी म्हणून बाबांचा

विश्वास तिच्यावर बसला. भालजींबद्दल पराकोटीचा आदर आणि निष्ठा होती तिच्या मनात. आत्ती ज्या काळात बाबांच्या स्टुडिओत काम करत असे, तो काळ बाबांच्या आणि जयप्रभा स्टुडिओचा भरभराटीचा काळ होता. भालजींनी 'महारथी कर्ण' नामक चित्रपटाचे दिग्दर्शन केलं होतं ज्यात पृथ्वीराज कपूर यांनी कर्णाची तर दुर्गा खोटे यांनी कुंतीची भूमिका केली होती. १९४४मध्ये रिलीज झालेल्या या चित्रपटासाठी पृथ्वीराज कपूर यांची खूप प्रशंसा झाली होती. आत्तीला कपूर कुटुंबीयांचा सहवास मिळू लागला. कपूर कुटुंबीय सहकुटुंब कोल्हापूरला येत असत. आणि भालजींशी त्यांच्या मनमोकळ्या गप्पा होत. भालजींची लाडकी शिष्या म्हणून आत्तीला कपूर कुटुंब चांगलं ओळखू-जाणू लागलं. पृथ्वीराज कपूर यांच्या पत्नींनी भालजींना भाऊ मानलं, पृथ्वीराज यांच्या राज, शम्मी, शशी अशा सगळ्या मुलांसाठी भालजी मामाजी होते.. भालजी यांच्या सिनेमात छोट्या राज कपूरनं नारदाची भूमिका साकारली, ती इतकी उत्कृष्ट केली की भालजींनी आपल्या ह्या भाच्याला त्याच्या ह्या पहिल्या कमाईचे त्या काळात १९४४ मध्ये तब्बल पाच हजार रुपये दिले! पृथ्वीराज कपूर यांनी भालजींना म्हटलं, इतकी मोठी रक्कम राजला कशासाठी दिलीत भाईसाहेब? त्यावर भालजी कौतुकानं म्हणाले, हे त्याचं मानधन नाहीये! हे पैसे त्याच्या मामानं, आपल्या भाच्याला भेट म्हणून दिलेत! पुढे असं ऐकिवात आलं, भालजींनी दिलेल्या याच रकमेतून राज कपूर यांनी आपल्या आरके स्टुडिओचा शुभारंभ केला.. अशा अनेक हृद्य बऱ्यावाईट घटनांची आत्ती साक्षीदार होती. राज कपूर यांनी पुढे त्यांच्या सिनेमात आत्तीला मुख्य नायिका म्हणून घेतलं. 'अब दिल्ली दूर नहीं' या नावाचा तो सिनेमा. भालजी पेंढारकरांवर कपूर कुटुंबाचा स्नेह, आणि भालजींची निष्ठावान शिष्य म्हणून आत्ती असे ते स्नेहसंबंध चंद्रकलेप्रमाणे वाढत गेले..

सुलोचनादीदी! एक अशी अभिनेत्री जिचे आरंभिक अभिनयातले गुरू भालजी पेंढारकर! त्यांच्याकडून तिनं अभिनयाचे धडे गिरवले, पण नंतरचा सुलोचनादीदींचा जीवनातला, कारकिर्दीतला प्रवास एकटीचा होता! तब्बल ५० वर्षं हिंदी/मराठी चित्रपटांच्या क्षितिजावर ती काम करत राहिली, स्वतःचं अस्तित्व तिनं स्वतः निर्माण केलं, आदर द्या असं मागून आदर मिळत नाही..पण सुलोचना यांनी आपल्या निष्कपट, निर्व्याज, सालस वागणुकीतून तो दर्शवून दिला..म्हणूनच सुलोचना लाटकर यांच्या पश्चात, त्यांच्या हयातीतदेखील दुसरी सुलोचना घडली नाही!

आत्तीने तिच्या चित्रपटकारकिर्दीत फक्त दोनच चित्रपट असे केलेत ज्यात तिला बोर्डावर नृत्य करताना दाखवलं आहे. 'तारका' आणि 'भाऊबीज' बहुधा हे ते २ चित्रपट. पण तिच्या चाहत्यांनी तिला तमाशाप्रधान भूमिकेत पाहणं नापसंत केलं. एकदा कोल्हापूरच्या आउटडोअर शूटिंगमध्ये काही चाहत्यांनी तिला गराडा घातला, आणि थेट म्हटलं, 'असं वंगाळ (वाईट) काम पुन्यांदा करू नका.. इनंती हाय!' तमाशा ही आपली लोककला पण घरंदाज प्रतिमा असलेल्या सुलोचनादीदींनी अशी भूमिका करू नये असं चाहत्यांना वाटत असे.

'वहिनींच्या बांगड्या' हा आत्तीचा अतिशय गाजलेला मराठी चित्रपट, जो हिंदीतदेखील रिलीज झाला. भूमिकेनं ती घराघरात लोकप्रिय झाली, आपलीशी झाली. कीर्तीच्या शिखरावर तिला या सिनेमानं नेलं. तिच्या लोकप्रियतेचं हेच गमक असावं - ती पडद्यावर प्रत्येकाला त्यांच्या घरातील आई, वहिनी, मोठी बहीण वाटली. हा प्रेमाचा धागा कधीही तुटला नाही.. आत्तीच्या भूमिकांबद्दल मी समीक्षा करत नाही; पण ६०-७० वर्षं सतत सकारात्मक, प्रेमळ, भारतीय साच्यातल्या आदर्श भूमिका करूनही ती कधी टाइपकास्ट झाली नाही..! प्रेक्षक तिच्या व्यक्तिरेखांना कधीही कंटाळले नाहीत! खाजगी-कौटुंबिक लग्नकार्यांतदेखील तिच्याभोवती सगळ्या आणि पैपाहुण्याचं कोंडाळं होत असे.. तिची ओळख आमची वहिनी असा केला जाई. अनेक प्रेक्षकांसाठी ती त्यांच्या घरातील वहिनी होती!

आत्तीच्या वैयक्तिक जीवनात अनेक दुःखं, संकटं, अनेक आप्तांच्या जबाबदाऱ्या होत्या, पण एकदा का ती स्टुडिओच्या आत गेली की तिचं सुलोचना हे अस्तित्व स्टुडिओच्या बाहेर ठेवून ती स्टुडिओत येत असे आणि व्यक्तिरेखेत परकायाप्रवेश करे. आत्तीचा भाचा वयाच्या अवघ्या ३२व्या वर्षी इहलोकी गेला, ती तेव्हा मनानं खचून गेली.. मलाही असं वाटतं, डॉक्टर काशिनाथ घाणेकर यांच्याशी लग्न करायला तिनं मला परवानगी द्यावी म्हणून मी १७ वर्षे वाट पाहिली.. मला माझी आई आणि डॉक्टर दोघंही प्रिय होते..कुणाला एकाला दुखावून मला कुठलंही पाऊल उचलायचं नव्हतं.. तिची इच्छा नव्हती या लग्नाला, पण तिनं आमच्या लग्नाला परवानगी दिली त्या वेळेस मात्र तिनं आनंदानं सहकार्य केलं.. माझ्यामुळेदेखील आत्ती दुखावली गेली, तिच्या तणावाला मी कारणीभूत होते, ही भावना मला त्रासदायक वाटते.. अमिताभ बच्चन ते शशी कपूर आणि राजेश खन्ना ते विनोद मेहरा अशा हिंदीतील अनेक आणि मराठातील स्टारच्या आईत ती चपखल बसली, आणि खरोखच तिनं पडद्यावरच्या आईची ममता प्रत्यक्षातही वठवली हे तिच्या मायाळू स्वभावाचं मोठं वैशिष्ट्य! मला आठवतंय, विनोद मेहरा यांचं अकाली निधन झाले, हा फिल्म इंडस्ट्रीसाठी, त्याच्या चाहत्यांसाठी शॉक होता. त्याच्या आई तर उन्मळून पडल्या! मी आणि आत्ती त्याच्या जुहूच्या घरी गेलो तेव्हा विनोद मेहरा यांच्या आईला शोक अनावर झाला, देखिये, आपका बेटा चला गया! असं त्या माऊलीनं हंबरडा फोडत म्हटलं! आत्तीनं रियल आणि रील जीवनात कधी फरक मानला नाही हेच खरं!

विनोद मेहरा यालादेखील आपल्या रील आईबद्दल खूप आदर, प्रेम होता हे वेगळं काय सांगणार?

आत्तीनं तिच्या कुटुंबाला आपल्या प्रेमानं बांधून ठेवलं होतं. तिच्या कौटुंबिक सदस्यांपैकी अनेकांचे संसार तिनं थाटून दिले. हिंदी इंडस्ट्रीमधील अभिनेत्रीची लग्नं होतं, त्यांना ती सिल्कची नारायणपेठ साडी भेट देत असे. यात मराठमोळी संस्कृतीची भेटवस्तू देण्यात तिचा कल असे. कुठेही शूटिंगला गेली की तिला शॉपिंग करायला आवडे. इतरांना वाढदिवस, विशेष प्राविण्य मिळवल्यास, पुरस्कार मिळाल्यास अशा सगळ्यांना भेटी देणं तिच्या रक्तात होतं. एक मोठी बॅग भरून तिनं खरेदी केलेल्या साड्या आज तिची स्मृती जागवतात.

फार उपवास किंवा देवपूजा करणाऱ्यातली ती नव्हती, पण परमेश्वरावर तिची आस्था, श्रद्धा होती. ख्रिसमसला घरात केक, ईदला शीरखुर्मा, दिवाळीला मिष्ठान्न, दसऱ्याला पुरणपोळी अशी खाद्यपरंपरा तिनं ठेवली होती. आषाढी एकादशीला साबुदाण्याची खिचडी, शेंगदाण्याची आमटी तिला प्रिय होती. दसऱ्याला-खंडेनवमी दिवशी मेकअप बॉक्सची पूजा करण्याचा तिचा परिपाठ होता. सर्व भारतीय सणांचा आनंद कुटुंबासमवेत घेण्याची अशी तिची पद्धत होती. आत्ती जितकी प्रेमळ, तितकाच तिचा दरारा वाटत असे. तिची वागणूक सौम्य, बोलणं मृदू असे. तरीही मी लहान असताना आत्तीशी बोलायला मला भीती वाटे. ती मनानं कोमल असली तरी कणखर होती. सम असो विषम असो, परिस्थिती कशीही असो, त्या स्थितीशी दोन हात करण्याची तिच्याकडे हातोटी होती. म्हणूनच पुरुषाचे धाडस पण स्त्रीचं मृदू मन असलेली असामान्य अशी माझी आत्ती होती!

१९४८ ते १९५३ मराठी सिनेमे तिनं केले. २००० पर्यंत ती खूप व्यग्र होती. अनेक हिंदी चित्रपटांत काम करत असली तरी महिन्यातून एक तरी मराठी चित्रपट करावा हा तिचा अट्टहास होता. काही निर्माते तिचं मानधन देऊ शकले नाही, कधी चित्रपट अपयशी ठरला किंवा सिनेमा पुरेशी कमाई करू शकला नाही की निर्माते तिला मानधन देऊ शकले नाहीत तरी त्यांना तिनं विचारलं नाही, पुन्हा ते नव्या सिनेमासाठी आत्तीकडे येत असत. स्वतःच्या कामाविषयी तिची निष्ठा प्रचंड होती, निरुपा रॉय, उषा किरण, ललिता पवार अशा सगळ्या तिच्या सीनियर सहकलाकार अभिनेत्री, कुणातही कधीही असूया, वैर नव्हतं.. उलट एखादा चित्रपट, भूमिका आपल्याला न जमल्यास ती भूमिका आपल्या सहकलाकार अभिनेत्रींकडे सोपवण्याचा मोठेपणा या सगळ्याच अभिनेत्रींकडे होता. अशा अर्थानंदेखील आत्ती अजातशत्रू होती! निरुपा रॉय यांनी त्यांच्या कारकिर्दीच्या आरंभी अनेक पौराणिक चित्रपट केले, पण पौराणिक सिनेमात काम केलेल्या कलाकारांना ए ग्रेडचे सिनेमे मिळत नसत, हे निरुपा रॉय यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी असे धार्मिक पौराणिक चित्रपट करायचे नाहीत असं ठरवलं आणि मगच त्या काळातले ए ग्रेड सिनेमे निरुपा रॉय यांना मिळाले. त्यांनी त्यांना ऑफर झालेल्या काही भूमिका आत्तीलाही देऊ केल्या. त्यामुळे सुलोचना असं नाव त्या काळच्या काही पौराणिक सिनेमांच्या श्रेयनामावलीत दिसतं. अर्थात अतिशय बिझी आर्टिस्ट असा आत्तीचा लौकिक तेव्हा कायम होता. बिमल रॉय यांनी त्यांच्या 'सुजाता' या गाजलेल्या सिनेमासाठी आत्तीला शशिकला आणि नूतन यांच्या आईच्या भूमिकेची ऑफर दिली त्या वेळेस मात्र आत्तीची द्विधा मनःस्थिती झाली..बिमल रॉयसारखा दिग्गज फिल्म मेकर, भूमिका छान, पण नूतन, शशिकला या अवघ्या ४-५ वर्षांनी लहान असलेल्या तरुण अभिनेत्रीची आई साकारणं तिला पटत नव्हतं! पण ललिता पवारनं समजावून सांगितलं, या आव्हानाचा स्वीकार कर. तरुण अभिनेत्रीच्या कारकिर्दीचा काळ हा फार तर ८-१० वर्षं असतो! नंतर तिला चरित्र भूमिका कराव्या लागतात.. मग तडजोड म्हणून नव्हे तर आता एक आव्हान म्हणून, बिमल रॉयसोबत फिल्म करण्याचा एक अनुभव म्हणून 'सुजाता' फिल्म तू करावीस, अशी गळ ललिता पवार यांनी ज्येष्ठ कलाकार म्हणून घातली आणि ऐन तारुण्यात आत्ती नूतन आणि शशिकला या समकालीन नायिकांची ऑन स्क्रीन आई बनली! अनेकांप्रमाणे माझाही 'सुजाता' हा आवडता चित्रपट आहे! अतिशय संवेदनशील विषयाची बटबटीत हाताळणी न करता अतिशय तरलतेनं बिमल रॉय यांनी 'सुजाता' घडवला आहे! अलीकडेपर्यंत सगळ्या नवोदित कलावंतांना तिनं ॲवॉर्ड समारोहात, कधी प्रत्यक्ष भेटीत त्यांच्या प्रतिभेचं जाहीर कौतुक करून त्यांचे मनोबल वाढवलं आहे. टीव्हीवर लागणाऱ्या मराठी/हिंदी मालिका, त्यांच्यातील 'ट्विस्ट आणि टर्न'अचंबित करायचे! कथेला अचानक कलाटणी कशी देतात, नव्या कलाकारांचा आत्मविश्वास अचंबित करायचा तिला! खूप कौतुक वाटायचं नव्या पिढीच्या धडाडीनं काम करण्याच्या वृत्तीचं. वयानं ज्येष्ठ असली तरी आत्तीकडे नव्या पिढीकडे पाहण्याचा दृष्टिकोन निकोप, सकारात्मक होता. कौतुक करण्याची वृत्ती, दखल घेत पाठ थोपटण्याची तिची वृत्ती कुणालाही सुखावून टाकणारी होती.. खरंच आत्तींकडून खूप शिकण्यासारखं होतं..

सुलोचनादीदींना दादासाहेब फाळके पुरस्कार मिळायला हवा होता अशी त्यांच्या लाखो चाहत्यांची दांडगी इच्छा आहे! त्यांच्या हयातीत हे घडू शकलं नाही, किमान त्यांना मरणोत्तर दादासाहेब फाळके पुरस्कार मिळायला हवा असं प्रकर्षाने वाटतं.

**शब्दांकन : पूजा सामंत**
samant.pooja@gmail.com




# जीवनातल्या सर्वच भूमिकांत तादाम्य पावलेली अभिनेत्री


**आशा काळे**


प्रख्यात अभिनेत्री आशा काळे आणि सुलोचनादीदी यांचे नाते जवळजवळ आई-मुलीचे होते. सुलोचनादीदी भालजी पेंढारकर, चारुदत्त सरपोतदार यांना आपला गुरू मानत, आणि सुलोचनादीदी यांचे गुरू भालजी त्यामुळे आशा काळे यांनीही भालजींना गुरुस्थानी मानलं. आशा काळे म्हणतात, माझ्या आईचं निधन काही वर्षांपूर्वी झालं, तेव्हा मी पोरकी झाले..आता मला आईसमान असलेल्या सुलोचनादीदींनीदेखील इहलोक सोडले! खऱ्या अर्थानं मी पोरकी झाले! आपल्या भावना व्यक्त करताना आशा काळे अतिशय व्यथित -भावुक होतात!

**आशा काळे –** सुलोचनादीदींच्या या राहत्या घरी माझं अनेकदा येणंजाणं व्हायचं..त्यांना चहा पिणं प्रिय होतं. मी घरी गेले कि त्या कांचनला (कांचन घाणेकर -मुलगी) हाक मारत, म्हणत, कांचन, चहा कर ग! आशा आली आहे, तिला चहा हवाय! 'आतून कांचनचा हसतच आवाज येई, आत्ती, चहा तिला नको आहे! तिच्या नावावर तुला हवाय, पण मी तुला चहा देणार नाहीये!' आपल्या आईला कांचन आत्ती म्हणत असे. आईच्या प्रकृतीबाबत अतिशय दक्ष आणि प्रेमळ असणारी कांचन म्हणजे दीदींचा श्वासच होता.

दीदींचं आणि माझं नातं जितकं जिव्हाळ्याचं, तितकं आदराचं, प्रेमाचं, हक्काचं, हितगूज करणारं आणि तितकंच आदरयुक्त भीतीचं.. असं अनेकदा व्हायचं, माझी आई मला प्रसंगी रागावे, मी तिचं ऐकलं नाही की आई मग सुलोचनादीदींकडे माझी हक्कानं तक्रार करे, तुम्हीच आशाला काही समजावून सांगा, ती ऐकत नाही माझं! दीदी मग मला अधिकारानं, प्रेमानं, दराऱ्यानं रागावत. पण त्यांच्या बोलण्यात, रागावण्यात कुठेही आकस नसे, फक्त प्रेम असे. माझ्या हिताचा विचार माझ्या आईप्रमाणे दीदींनी त्यांच्या हयातीत कायम केला. दिवसागणीक आमचं नातं दृढविश्वासाचं, आदराचं आणि गहिऱ्या प्रेमाचं होत गेलं. यातदेखील श्रेय दीदींना आहे. मूर्तिमंत कारुण्याची, वात्सल्याची, माया-ममतेची मूर्ती म्हणजे दीदी! सुलोचनादीदी यांचं शिक्षण फारसं झालं नव्हतं, पण दीदी म्हणजे चालतंबोलतं विद्यापीठच जणू. आदर्श संस्कार त्यांच्यात नखशिखांत भिनले होते. नव्या पिढीची मुलंमुली शालेय-महाविद्यालयीन शिक्षणाखेरीज योग्य तऱ्हेनं वागावं कसं, बोलावं कसं, स्वतःची इमेज कशी असावी अशा अनेक गोष्टींसाठी ग्रूमिंग सेंटर जॉईन करतात, पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट हल्ली परवलीचा शब्द झालाय, एटिकेट्स, मॅनर्स, स्टायलिंग, ग्रूमिंग शिकणं हल्ली 'मस्ट' झालं आहे, पण दीदींकडे सगळे गुण उपजतच होते..त्यांच्या सहवासात जो येई तो त्यांच्यात असलेले हे सगळे गुण आत्मसात करत असे.. असे अनेक गुण-कलागुण मीदेखील माझ्या कळतनकळत आत्मसात केलेत दीदींकडून. म्हणूनच त्या माझ्यासाठी ऑल इन वन होत्या.. दीदींकडे अलौकिक शक्ती होती हे मात्र खरं.







रुपेरी पडद्यावर कधी आई, कधी मावशी, कधी पत्नी अशा अनेक व्यक्तिरेखा साकारणाऱ्या दीदींनी त्यात आपला जीव पणाला लावला, त्यांनी कधी अभिनय केला असं जाणवलंच नाही, सगळ्याच भूमिका ह्या माऊलीनं अक्षरश: जगल्या! आपल्या भूमिकेशी कसं तादात्म्य पावावं हे त्यांच्याकडूनच अनेकांनी नकळतपणे शिकलं असावं.



सुलोचनादीदी ४ जूनला गेल्या, पण आजही त्यांची मायेनं ओथंबलेली हाक माझ्या कानांत गुंजतेय, त्या दृष्टिआड होत नाहीत.. मला आजही त्यांच्याशी झालेली पहिली भेट स्मरतेय. माझ्या वडिलांची नोकरी शासकीय होती, त्यांच्या बदल्या होत असत. माझा जन्म कोल्हापूरच्या गडहिंग्लज इथे झाला. काही प्राथमिक शिक्षण कोल्हापूरला झालं तर पुढील शिक्षणासाठी मी पुण्यात आले. मला त्या शाळकरी वयात अभिनयाची ओढ नव्हती. नृत्याची आवड असल्यानं मी नृत्याचं प्रशिक्षण घेतलं, नृत्याचे काही कार्यक्रमही केलं. 'सीमेवरून परत जा' या नाटकात आणि 'तांबडी माती' या चित्रपटात मला काम करण्याची पहिली संधी मिळाली. कोल्हापुरात दीदींशी स्टुडिओत पहिली भेट झाली. अगदी नवख्या व्यक्तीलादेखील आपलंसं करण्याची निसर्गदत्त उदारता त्यांच्याकडे होती. पुढच्या टप्प्यावर मला शूटिंगनिमित्तानं मुंबईत यावं लागलं. माझी आई माझ्यासोबत होती. माधवाश्रममध्ये आमच्या राहण्याची सोय झाली. दीदींना समजलं की आम्ही दोघी माधवाश्रममध्ये राहतोय, त्यांनी माझ्या आईला आपलेपणानं, हक्कानं त्यांच्या घरी राहण्याचा आग्रह केला. त्या वेळेस त्या माहीमच्या भागीरथी सदनमध्ये राहत असत.

ते घर त्या सोडून जाणार होत्या, पुढे त्या सायनला राहायला गेल्या, पण त्या सायनच्या जागेत राहण्यापूर्वी त्या जागेत राहणाऱ्या व्यक्तीला ती जागा फारशी लाभली नव्हती! एका जवळच्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानं त्या गृहस्थानं ती जागा सोडून जाण्याचे ठरवलं! जी जागा त्या गृहस्थाला लाभली नाही त्याच जागेत दीदी राहायलला आल्यावर ती जागा त्यांना लाभली, दीदींची भरभराट झाली. त्यांच्या चित्रपटांनी वारेमाप यश मिळवलं, त्यांना पुरस्कार मिळत गेले, दीदींची लोकप्रियता वाढतच गेली. अर्थात पुढे दीदींना गुडघ्यांचा त्रास सुरू झाला आणि त्यानी प्रभादेवी येथे शिफ्ट होण्याचा निर्णय घेतला. दीदींनी सायनची जागा आम्हाला राहायला देऊ केली तीही विनामूल्य! आईला आणि मला विनामूल्य राहणं खचितच आवडणारं नव्हतं, पण दीदींकडे कायमच असा मनाचा मोठेपणा होता. मला दीदींची ही जागा त्यांच्या वास्तव्यामुळे चांगलीच लाभली. दीदींनी मला मुंबईत राहण्यासाठी कधी प्रश्न निर्माण होऊ दिलाच नाही. त्यांचे सततचं मार्गदर्शन मला लाभलं. जीवनात आलेला तणाव, करिअरमध्ये निर्माण झालेले प्रश्न असो व मला माधव पांडुरंग नाईक यांच्याशी लग्न करायचं होतं तेव्हा लग्नाचा विचार करावा किंवा नाही ही माझी द्विधा मनःस्थिती होती पण तेव्हादेखील दीदींचं मार्गदर्शन मला लाभले. माधव नाईक यांच्याशी मी विवाह करावा, जीवनात मला सुख, स्थैर्य लाभेल, ते माझ्यासाठी योग्य जोडीदार आहेत (माधव नाईक) असं दीदींचं मत होतं. दीदींचं हे अनुमानदेखील बिनचूक ठरलं, आणि माझा संसार सुखाचा झाला.

दीदींनी त्यांच्या व्यक्तिगत आयुष्यात खूप आघात सोसलेत, त्या आघातांचे कढ, एखादा साधासा ओरखडाही कधी त्यांनी कुठल्याही नात्यावर उठू दिला नाही. त्यांचं मन थोर होतं. स्वच्छ मनाच्या होत्या त्या. आपल्या घरात कुणी इतरांना राहू देतं का मला सांगा? पण, सुलोचना दीदी म्हणजे एक वेगळं रसायन होतं.. त्यांची जगावेगळी वैशिष्ट्यं, आकाशाएवढं मन काय काय म्हणून सांगायचं! अभिनेत्री म्हणून त्या किती थोर होत्या हे आता मी काय नव्यानं सांगणार? अवघ्या देशाला त्यांच्या अभिनयाची महती ठाऊकच आहे. कलियुगात सगळीच











शाश्वत मूल्यं हरवलेली दिसतात, त्या काळात सुलोचनादीदी म्हणजे चिरंतन संस्काराचा अखंड झरा, निर्मळ मन, सात्त्विक-शालीन सौंदर्याची आदरमूर्ती. मला आयुष्यभर दीदींचा खूप आधार वाटत राहिला..त्यांच्या पश्चात माझ्या शरीरातील एक अंग गळून पडल्याचा आभास होतोय! माझ्या जीवनात त्या आल्यापासून माझ्या प्रत्येक वाढदिवसाला त्यांचा शुभेच्छा देण्यासाठी कधी फोन आला नाही असं इतक्या वर्षांत कधीही घडलं नाही.. सगळ्यांचे वाढदिवस त्यांच्या कसे लक्षात राहत हे कोडं मला आजवर सुटलं नाही..अनेक वर्षं दीदी माझ्या मोठ्या बहिणीसोबत- अलकासोबत उरुसाला जात असत. त्यांचं उरुसाला जाणं एक नियमित परिपाठ बनला होता. पण गेली ३-४ वर्षं दीदींना विस्मरण झालं होतं. उरुसाला जायचे आहे असं त्या म्हणत. प्रत्यक्षात दीदी प्रकृतिअस्वास्थ्यामुळे बाहेर जात नसत. कोल्हापुरवर त्यांचं खूप प्रेम, पूर्वीप्रमाणे कोल्हापूरला जाता येत नसल्यानं त्यांना तिथे गेल्याचा भास होत असे!

अमेरिकेला सुधीर फडके फिल्म फेस्टिवलला माझं जाणं झालं. त्या टूरवर माझा पाय फ्रॅक्चर झाला. आनंद -उत्साहावर पाणी पडणं स्वाभाविक होतं! त्या दरम्यान माझे 'गुंतता हृदय हे' ह्या नाटकाचे प्रयोग जोरात चालू होते, पाय फ्रॅक्चर झाल्याने मी नाटक कशी करणार असा प्रश्न निर्माण झाला.. पण ज्यांना अमेरिकेत जायची संधी मिळाली नाही त्यांनी माझ्याविरोधात खूप राळ उडवली! मी नाटक करू शकत नव्हते कारण पाय जायबंदी झाला होता! पण, मी नाटक करणं टाळत असेन म्हणून असं (पाय फ्रॅक्चर नाटक) करत असेन असंही माझ्या कानावर आलं! मी खूप निराश झाले. तातडीनं हे नाटक ठेवून द्यावं, पुन्हा नाटकाच्या वाऱ्याला उभं राहायचं नाही असा निर्णय मी घेतला! प्रत्यक्षात हा निर्णय पूर्णपणे चुकीचा होता! 'गुंतता'सारखं सुपरहिट नाटक सोडून देणं! पण अल्पावधीतच केवळ दीदींच्या सांगण्यावरून मी हे नाटक पुन्हा केलं. दीदी म्हणाल्या, 'अगं आशा, निंदकाचं घर असावं शेजारी! तुझे नाटक बॉक्स ऑफिसवर धो धो चाललं आहे, तू नाटक सोडणार म्हणजे निर्मात्याचं आणि तुझं नुकसान नाही का होणार? इतरांच्या टीकेला कंटाळून तू का स्वतःचं नुकसान करून आपल्या पायांवर धोंडा पाडून घेणार? आपल्या करिअरबाबत आपण अतिशय सीरियस असलंच पाहिजे. त्यामुळे कसलंही काम सोडायचं नाही. तू प्रामाणिकपणे आपलं काम कर!'

दीदींनी हा लाखमोलाचा सल्ला मला दिला, हे वाण मी आजतागायत निष्ठेनं पाळलं! अगदी, सहज बोलता बोलता त्या लाखमोलाचा सल्ला देत हा अनुभव मला कायमच आला आहे, जीवन कसं जगावं, समाधानी वृत्ती कशी असावी, आपल्या कर्तव्याची पूर्तता कशी करावी अशा अनेक गोष्टींचा वस्तुपाठ म्हणजे दीदी!

त्यांचं माझ्या हृदयातील स्थान कायमच अढळ राहील!

**शब्दांकन : पूजा सामंत**
samant.pooja@gmail.com

ग्रंथाली

## रानभुलीचे प्रदेश




विजयालक्ष्मी मणेरीकर यांनी लिहिलेलं 'रानभुलीचे प्रदेश' हे पुस्तक अतिशय सुंदर आहे. थोडक्यात हे पुस्तक अतिशय देखणं झालेलं आहे, खूप रंजक आणि माहितीपूर्ण असं हे पुस्तक सगळ्यांनीच वाचलं पाहिजे.

**- अच्युत गोडबोले**

**विजयालक्ष्मी मणेरीकर**

**मूल्य २५० रुपये । सवलतीत १५० रुपये**

## व्यूह-चक्र

'व्यूह-चक्र' या लेखसंग्रहात इंग्रजी भाषेतील लेखातील, पुस्तकातील चिंतनशील विचार आले आहेत, ते इथल्या परिस्थितीला आणि संदर्भांना जोडण्याचा प्रयत्न केला आहे.




**डॉ. आनंद जोशी**

**मूल्य २०० रुपये । सवलतीत १२० रुपये**



# 'मॉडर्न सुलोचना' एक आठवण

अरुण पुराणिक



**सुलोचनाबद्दलचे हे दोन किस्से. विस्मृतीत गेलेले–**

मास्टर विनायक यांचा 'चिमुकला संसार' हा सुलोचनादीदींचा पहिला चित्रपट. त्यांचे मूळ नाव होते साहेबानू लाटकर. त्यांचे सुलोचना हे नामकरण भालजी पेंढारकर यांनी केले. त्यांनी अनेक ऐतिहासिक, ग्रामीण, सामाजिक हिंदी–मराठी चित्रपटांतून भूमिका केल्या. आजही सोज्वळ, सात्त्विक आणि सोशिक भारतीय स्त्री म्हटली तर डोळ्यांसमोर फक्त सुलोचनादीदीच उभ्या राहतात.

दीदींनी आपल्या रुपेरी जीवनाची सुरुवात कोल्हापुरात केली. सासुरवास, जयभवानी आदी चित्रपटांत मा. विठ्ठल त्यांच्याबरोबर नायक होते. त्यानंतर १९४८ मध्ये पुण्याच्या मंगल पिक्चर्सच्या 'जीवाचा सखा' या चित्रपटाची त्यांना ऑफर आली. तेव्हा त्या आपले गाव सोडून जाण्याच्या मन:स्थितीत नव्हत्या. मा. विठ्ठलांना हे कळलं तेव्हा ते ताबडतोब दीदींना भेटायला गेले. त्यांनी सांगितलं, पुण्याची ऑफर आहे ना? ती स्वीकारून लगेच पुण्याला जा. तिथून पुढे मुंबईला जा. तिथेच तुमच्यातील कलाकाराला वाव मिळेल! मी ऐन उमेदीच्या काळात मुंबई सोडून गावाच्या ओढीनं परत कोल्हापूरला आलो. मुंबईत मिळालेल्या पैशांवर कोल्हापुरात माझी चाळ उभी राहिली. तिथेच अजून काही काळ राहिलो असतो तर माझे बंगले उभे राहिले असते. सुलोचनादीदींनी मा. विठ्ठल यांचा हा मौलिक सल्ला शिरोधार्थ मानला. मुंबईत त्यांच्या रुपेरी जीवनाचं खऱ्या अर्थानं चीज झालं.

शेख मुख्तारचा 'दो उस्ताद' ग्रान्ट रोडच्या नॉवेल्टीला १९५९ मध्ये प्रदर्शित झाला होता. त्यामध्ये शेख मुख्तार, राज कपूर, मधुबाला व सुलोचनादीदी अशी तगडी स्टारकास्ट होती. सुलोचनादीदींनी शेख मुख्तारच्या (जगन्नाथ) सोज्वळ पत्नीची भूमिका केली होती. शेख खतरनाक गुन्हेगार व कुटुंबवत्सल पती असे दुहेरी आयुष्य जगत असतो. पाठी लागलेल्या गुंडांना चकवत योगायोगाने मधुबाला सुलोचनाच्याच घरात शिरते. सुलोचना तिला मदत करणार असते. तोच तिथे तिला मुख्तारचा फोटो दिसतो. मधुबाला सुलोचनाला मुख्तारबद्दल सांगते. त्याचे खरे रूप समजल्यावर, नेमके सत्य जाणून घेण्यासाठी जीन्स व टॉपमधील मॉडर्न तरुणी बनून सुलोचना साक्षात् आपल्या पतीला भेटायला जातात व सत्य समजल्यावर त्याला सोडून आत्महत्या करायला निघतात, छोटा दीर राज कपूर तिला वाचवतो असा त्यामध्ये प्रसंग आहे

त्यावेळी नॉवेल्टी थिएटरच्या दर्शनी भागावर जीन्स टॉपमधील मॉडर्न सुलोचनादीदींचे भव्य पोस्टर लागले होते. गिरगावातील मॅजेस्टिक व सेंट्रलमध्ये त्यांचेच धार्मिक, सामाजिक व ऐतिहासिक चित्रपट प्रदर्शित होत. तिथल्या सुशिक्षित, गरीब मराठी मध्यम वर्गीय प्रेक्षकांनी सुलोचनादीदींचे असे मॉडर्न रूप कधीच पाहिले नव्हते. त्यांच्या या मॉड पोस्टरची वाऱ्यासारखी बातमी गिरगाव व गिरणगावात पसरली. हजारो सिनेप्रेक्षक एखाद्या जत्रेला जावे तसे ते पोस्टर पाहायला येऊ लागले. सिनेमाची चिक्कार पब्लिसिटी झाली!

**– अरुण पुराणिक**
arun.puranik@gmail.com



# प्रभाताई पुरोहित

उषा तांबे

**साधारण** १९५७-५८ सालची गोष्ट. अमरावतीच्या गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कूलचा दहावीचा वर्ग. इंग्रजी विषयाचा तास. वर्गाला कॉरिडॉरच्या बाजूने खिडक्या आहेत. त्यातून वाकून वाकून मुली येणाऱ्या शिक्षिकेची वाट पाहत आहेत. आज त्यांना इंग्रजी शिकवायला नवीन बाई येणार आहेत.

आणि त्यांना एक अत्यंत आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या, हसऱ्या चेहऱ्याच्या बाई वर्गाकडे येताना दिसतात. मुली अगदी हर्षभरित! वर्गात आल्यावर त्या समोरच्या विद्यार्थिनींवरून नजर फिरवतात आणि स्वत:ची ओळख करून देतात- 'मी प्रभा पुरोहित. आजपासून मी तुमचे इंग्रजीचे वर्ग घेणार आहे.' आज इतक्या वर्षांनंतरही मला त्यांचं ते पहिलं सुभग दर्शन आठवतं आहे. परवा त्यांचं अंत्यदर्शन घेताना मला शाळेतला तो दिवस डोळ्यांसमोर आला.

पुढे महाविद्यालयात आम्हाला पुरोहितसर इंग्रजी शिकवायला आले. महाविद्यालयाच्या आवारातच त्यांचा बंगला होता. सर आणि बाई दोघंही कामावर गेलेले असले तरी घरी त्यांचा छोटा श्रीरंग असे. त्याला बघायला आम्ही एम.ए. इंग्रजीच्या पाच-सहा विद्यार्थिनी अगदी मोकळेपणानं जात असू. एकूणच त्या कुटुंबाशी जवळीक साधण्याचा आमचा प्रयत्न असे आणि त्यांनीही आम्हाला सहज सामावून घेतलं होतं.

मागे वळून बघताना आता असं लक्षात येतं आहे की त्या दोघांमुळे मला इंग्रजी साहित्याची विशेष गोडी लागली. दहावीत पुरोहितबाई होत्या. त्या विषयात मला विशेष प्रावीण्य मिळालं. सरांनी तर मला 'अर्थशास्त्र' विषयाच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा अर्ज बदलून 'इंग्रजी लिटरेचर'चा भरायला लावला होता. या प्रवासाचा सर्वोच्च बिंदू होता मला इंग्रजी साहित्यात एम.ए.ला मिळालेलं सुवर्णपदक! विद्यार्थ्याच्या प्रगतीत एवढा रस घेणारे शिक्षक दुर्मिळच! हे गुरू-शिष्याचं नातं त्या दोघांनी आयुष्यभर निभावलं. आपल्या मोठेपणाचं दडपण कधीही येऊ न देता ते मार्गदर्शन करत राहिले. त्यांच्या अस्तित्वाचा आम्हाला मोठाच मानसिक आधार होता.



प्रभाताई पुरोहित

एका आकारानं, त्याहीपेक्षा मनानं, 'मोठ्या घरात' प्रभाताई वाढल्या. त्याचे सहिष्णुतेचे संस्कार त्यांच्या मनात खोलवर रुजलेले होतं. समृद्धी आणि औदार्य एकाच वेळी बाळगणाऱ्या या घराबद्दल त्या म्हणतात, 'दिवाळीत बाहेरच्या आवाराच्या भिंतीपासून तिसऱ्या मजल्याच्या गच्चीपर्यंत पणत्यांनी झगमगणारं आमचं मोठं घर आता फक्त माझ्या मनात घर करून आहे.' हे वाचून आपणही हेलावून जातो. परंतु त्या घराच्या मोठेपणाचा प्रवाह पुढे प्रभाताईंच्या आयुष्यात वाहता राहिलेला आहे, हेही आपल्या लक्षात येतं.

२५ फेब्रुवारी १९४५ रोजी प्रा. के.ज. पुरोहित यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्या 'जीवनछाया' नावाच्या इमारतीत राहायला गेल्या. एवढं प्रशस्त नाव असलेल्या वास्तूत त्यांच्या भाड्यानं घेतलेल्या फक्त दीड खोल्या होत्या. सरांना दरमहा ८० रुपये पगार होता. परंतु तेव्हापासूनच त्यांच्याकडे सतत सासरचं किंवा माहेरचं कुणीतरी सतत शिकायला असायचं. तसेही, पुरोहितसरांच्या मैफिलीत रमणाऱ्या स्वभावामुळे त्यांच्या घरात सतत पाहुण्यांचा राबता असे. त्या पाहुण्यांचं प्रभाताईंनी

नेहमीच खास वऱ्हाडी शैलीत आतिथ्य केलं. मी त्या दोघांची विद्यार्थिनी होते, तर माझे पती शशिकांत पुरोहितसरांचे आवडते विद्यार्थी होते. त्यामुळे आम्हा दोघांना कायम वडाभात-चिंचेचं सार – अशा जेवणाचं आमंत्रण असे. प्रभाताई हिंडत्या-फिरत्या असताना आमच्याकडे खास कच्च्या पोह्यांचा चविष्ट चिवडा करून आणत. कधी त्या मला नाजूकसं भरतकाम केलेला रुमाल देत. माझ्या वाढदिवसाच्या दिवशी त्यांना भेटायला गेले, तर ओवाळून मग आशीर्वाद देत. हे काहीतरी विशेष आहे, हे तेव्हा समजत नव्हतं, असं नाही; पण आता त्या अनुभवाचा दुर्मिळपणा फार तीव्रतेनं जाणवतो आहे.

घरच्या मदतनीसांबद्दल (त्यांना नोकर म्हणायचं नाही) प्रभाताईंना वाटणारा जिव्हाळा हाही असाच एक दुर्मिळ गुण. घरी काम करणाऱ्यांना गणगोत मानायचं, हे त्यांच्या मोठ्या घरचं वळणच होतं. घरकामाला मदत म्हणून ठेवून घेतलेल्या रत्नाला आठवड्याला न्हायला घालणं, तिच्या वेण्या घालणं, हे त्यांनी आनंदानं केलं. ती त्यांची नणंदच झाली. याच आपुलकीमुळे गबाळा, विक्षिप्त 'मामा' त्यांचं काम अगदी लख्ख करून जाई. वर 'बाई, तू मज लेकीसारखी आहेस' असंही म्हणे. त्यांचा एक मदतनीस सीताराम सुट्टीवर जाताना बाईंना चूल पेटवून देऊन मगच निघण्याची काळजी घेई. याचा अर्थ त्यांना भेटलेली सगळी माणसं चांगलीच होती किंवा भेटलेल्या माणसांचे दोष त्यांना कळलेच नाहीत असा नाही. बाईंच्या गैरहजेरीत छोट्यामोठ्या चोऱ्या करणाऱ्या भागीरथी, लीला यांच्याबद्दलही त्यांनी लिहिलं आहे. परंतु त्याकडे प्रभाताई एका व्यापक, समंजस दृष्टिकोनातून बघतात. लीलाचं तरुण वय, दूरदेशी असलेला नवरा, यांचा विचार करून आपणच त्यांना समजून घेण्यात कमी पडतो, अशी त्या कबुली देतात!

अमरावतीला झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून पुरोहितसर निवडून आले. हा निकाल ऐकण्यासाठी प्रभाताई, मनीषा आणि सर आमच्या घरून, कुठल्याशा छोट्या कार्यक्रमाला उपस्थित राहून पुढे पुण्याला गेले होते. सर एका मतानं निवडून आले. त्यांच्या आनंदात, सत्कारसोहळ्यांमध्ये, त्या उत्साहानं सहभागी झाल्या. तसंही, 'शांतारामां'च्या लेखनाला त्यांनी सतत प्रोत्साहन दिलेलं होतं. 'प्रत्येक दिवाळीमध्ये मला तुमची एक तरी नवीन कथा वाचायला मिळाली पाहिजे,' अशी 'ओवाळणी' मागणारी प्रभाताईंसारखी लेखक पत्नी विरळाच असावी. तसे त्या दोघांचे स्वभाव अगदी दोन टोकांचे होते. सरांची सतत गडबड आणि धावपळ; पण प्रभाताईंचा स्वभाव शांत, संथ. सरांना पूजाअर्चेमध्ये फारसा रस नव्हता पण बाई श्रद्धाळू होत्या. त्या श्रद्धेच्या आड मात्र सर कधी आले नाहीत. त्या दोघांच्या भिन्न प्रवृत्ती एकमेकांना पूरक ठरल्या होत्या. प्रभाताई कधी आक्रमक होत नसत; पण आपल्या मतावर त्या ठाम असत.

अनेकदा बोलताना सरांना एखादं नाव आठवलं नाही, तर ते म्हणत, 'प्रभा, तो कोण ग? आपला तो हा ग...' आणि प्रभाताई न चिडता 'तो हा' अचूक ओळखून सांगत. आपापली स्वतंत्र व्यक्तिमत्त्वं जपूनही दाम्पत्य जीवन कसं सुखी होऊ शकतं, याचा आदर्शच त्यांनी घालून दिला होता.


मागे एकदा एका टेलिव्हिजन चॅनेलसाठी मी प्रभाताईंची मुलाखत घेतली होती. बहुधा 'मोठं घर' पुस्तकाच्या प्रकाशनाच्या निमित्तानं असावी. त्यावेळी, आपल्या आयुष्याचा आढावा घेत त्या म्हणाल्या होत्या, 'माझ्या आयुष्यात मी पूर्ण समाधानी आहे. कुठलाही पण, परंतु, तरीही, माझ्या मनात नाही.' (ह्या मुलाखतीचं रेकॉर्डिंग त्यांच्या घरी झालं. हॉलमध्ये आम्ही बसलो होतो. जेवणाच्या खोलीकडे जाणारं काचेचं दार बंद केलेलं होतं. त्यापलीकडे एका खुर्चीत बसून कौतुकानं तो कार्यक्रम पाहणारे पुरोहितसर मला आठवताहेत.) प्रभाताईंच्या इतक्या वर्षांच्या सहवासात मी कधीही तक्रारीचा सूर ऐकला नाही. विवाहानंतर जवळपास चौदा-पंधरा वर्षं अपत्य नसल्याच्या अनुभवाबद्दल त्या कधी फारसं बोलल्याचं आठवत नाही. आपल्या दुखण्यांचं त्यांनी कधी स्तोम माजवलं नाही. त्यांच्या बोलण्यातून, लिखाणातून, त्यांचं प्रसन्न, संपन्न व्यक्तिमत्त्वच जाणवत राहिलं.

म्हणूनच त्यांच्या अखेरच्या दिवसांमध्ये त्यांना भेटल्यावरही, अगदी त्यांचं अंत्यदर्शन घेतल्यावरही लक्षात राहिल्या आहेत, त्या अमरावतीच्या शाळेच्या कॉरिडॉरमधून डौलानं चालत येणाऱ्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या आमच्या पुरोहितबाई!

**– उषा तांबे**

ushatambe8@gmail.com


॥ग्रंथाली॥




# मित्रास्त

## के.ज. पुरोहित

**मूल्य ३०० रुपये**
**सवलतीत १८० रुपये**

इ.स. १९६३ ते २०१४ अशा अर्धशतकाच्या दीर्घ कालपटावर पसरलेली आणि नानाविध नियतकालिकांत विखुरलेली मात्र आजही आपला ताजेपणा जपलेली ही व्यक्तिचित्रे.




# नैतिकता मूल्यविचार स्वीकारणारा समीक्षक डॉ. किशोर सानप

डॉ. राजेंद्र मुंढे

**किशोर** सानप यांचे नुकतेच निधन झाले. ते आघाडीचे समीक्षक, संत साहित्याचे मर्मज्ञ चिकित्सक आणि ललित लेखक म्हणून महाराष्ट्राला सर्वपरिचित होते. ललित आणि वैचारिक या दोन्ही क्षेत्रांमध्ये सकस लेखन करणाऱ्या समकालीनांमध्ये किशोर सानप यांचे नाव ठळक अक्षरांनी नोंदवण्याइतके महत्त्वाचे आहे. समकाळ हा अनेक विचारव्यूह, समाजकारण राजकारण-धर्मकारण यांच्या घुसळणीचा आहे. कट्टर धर्मांधता, दहशतवाद, नक्षलवाद आणि अभिव्यक्तीची होणारी गळचेपी अशा काळाचे ताणेबाणे त्यांच्या लेखनात शोधता येतात. त्यांनी आधुनिकतेसोबतच विशेषतः संत तुकारामादी संतांच्या साहित्याचा सातत्याने चिकित्सक दृष्टिकोनातून केलेला अभ्यास संतसाहित्याला नवी दिशा देणारा ठरला आहे. यासोबतच डॉ. सानप यांनी आधुनिकतेचा आणि नैतिकतेचा गांभीर्याने आपल्या समग्र ललित, वैचारिक आणि समीक्षालेखनात अचूक मेळ घातलेला दिसतो. त्यांनी सर्जनशील लेखनासह समीक्षेसाठी नैतिकतेचे मूल्य सर्वश्रेष्ठ मानले आहे. डॉ. भालचंद्र नेमाडे यांच्यानंतर नैतिकतेचा साहित्यात जोरकसपणे पुरस्कार करणारे ते एकमेव समीक्षक मानले जातात. त्यांनी हे विचारसूत्र मनाशी घट्ट बाणून आपले लेखनव्रत अव्याहत स्वीकार करून, गेल्या चार दशकात कविता, कथा, कादंबरी, समीक्षा, वैचारिक संतसाहित्य आणि संशोधनाच्या पातळीवर सातत्याने लेखन केलेले दिसते.

डॉ. किशोर सानप यांचा जन्म अकोला येथे ७ जानेवारी १९५६ रोजी एका अभावग्रस्त गरीब कुटुंबात झाला. त्यांनी वाणिज्य आणि मराठी विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले. १९९२ मध्ये रातुम नागपूर विद्यापीठात डॉ. आशा सावदेकरांच्या मार्गदर्शनाखाली 'भालचंद्र नेमाडे यांचे वाङ्मय एक चिकित्सक अभ्यास' या विषयात आचार्य पदवी प्राप्त केली. १९७९ ते २०१३ पर्यंत वर्धा येथील शिक्षा मंडळाच्या गो. से. वाणिज्य महाविद्यालयात वाणिज्य व मराठी विषयाच्या अध्यापनाचे कार्य



डॉ. किशोर सानप

केले. सर्वदूर विख्यात अशा सांस्कृतिक क्षेत्रांत भरीव योगदान देणाऱ्या स्व. यशवंतराव दाते स्मृती संस्था, वर्धा या संस्थेची सन् १९८७ मध्ये स्थापना केली आणि संस्थापक अध्यक्ष म्हणून संस्थेच्या सामाजिक, वाङ्मयीन, सांस्कृतिक उपक्रमामध्ये भरीव योगदान दिले.

सानप यांचे आजतागायत २७ ग्रंथ प्रकाशित झाले असून १८ ग्रंथ प्रकाशनाधीन व संकल्पित आहेत.

सानप यांची 'ऋतू' या कवितासंग्रहातून कवी म्हणून पहिली ओळख साहित्यप्रांताला झाली. त्यांनी पुढचे पाऊल कादंबरी लेखनात टाकून 'पांगुळवाडा' कादंबरीची निर्मिती केली. या कादंबरीत समकालीन जीवनानुभावाचा एक मोठा अवकाश कवेत घेत तिसऱ्या पिढीतील तरुणाच्या सोशिक आणि संघर्षशील जीवनाची शोकगाथा मांडली आहे. त्यांची

दुसरी कादंबरी 'हारास' ही राजकीय क्षितिज गाठण्याची महत्त्वाकांक्षा असणाऱ्या आणि त्यासाठी जीवनात तडजोडी करणाऱ्या एका स्वप्नाळू स्त्रीची कहाणी आहे. राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांच्या ऱ्हास पावणाऱ्या जीवनाचा आंतरिक वेध घेऊन त्यांच्या दैनंदिन जगण्यातून माणसाच्या आदिम अशा पाशवी प्रेरणांचे स्रोत शोधण्याचा प्रयत्न हारास या छोटेखानी कादंबरीतून किशोर सानप यांनी केला आहे. 'भूवैकुंठ या तिसऱ्या कादबरीतून पर्वताएवढे आयुष्याचे दुःख असणाऱ्या नि अवघ्या कुटुंबाची जबाबदारी, जगण्याच्या कलेचे रोकडे तत्त्वज्ञान सांगणाऱ्या वारकरी पंथाच्या विठुरायाच्या अगाध भक्तीच्या बळावर पेलणाऱ्या कौशल्येची कहाणी कादंबरीत येते, ती त्या प्रदेशाच्या वऱ्हाडी बोलीच्या माध्यमातून सानपांच्या तीनही कादंबऱ्या रूढार्थाने न जाता वेगळेपण जपणाऱ्या आहेत.

'मी अनादिचा अस्वस्थ गा' आणि 'कोवळी पानगळ' या दोन कथासंग्रहांतून कथालेखन संग्रहित झाले आहे.

वाणिज्य विषयाचे अध्यापक असणाऱ्या किशोर सानपांनी साहित्याभिरुचीतून संशोधनासाठी भालचंद्र नेमाडे यांच्या समग्र साहित्याचा चिकित्सक अभ्यास करून पीएचडी उपाधी प्राप्त केली. या अभ्यासातून भालचंद्र नेमाडेंच्या कादंबरी, कविता आणि समीक्षा अशा तीन ग्रंथाची निर्मिती केली आणि सानप समीक्षक म्हणून अवघ्या महाराष्ट्राला परिचित झाले.

'मराठी कादंबरीतील नैतिकता' या समीक्षाग्रंथाने सानपांच्या सामिक्षाविचारांना नवे परिमाण लाभले. भालचंद्र नेमाडेंनी आपल्या लेखनातून मांडलेला नैतिकतेचा मूल्यविचार पुढे नेत किशोर सानपांनी नैतिकतेच्या दृष्टिकोनातून वाङ्मयीन संस्कृतीचा रोखठोक समाचार घेऊन, समीक्षाव्यवहारातील सिद्धांत आणि उपयोजन यांची नैतिक समीक्षापद्धतीने मांडणी करून मराठी समीक्षेला नवा मूल्यविचार देण्याचे कार्य केले आहे. सानपांनी नेमाडेनंतर एका लेखकाचा त्याच्या वाङ्मयप्रकाराचा समग्र अभ्यास करण्याची पद्धत स्वीकारून 'मराठीतील प्रायोगिक कादबरी' आणि 'श्याम मनोहर' हा मराठी कादंबरीच्या समीक्षा व्यवहारातील त्यांचा पहिलाच प्रयत्न, मराठीतील प्रायोगिक कादंबरीची कल्पना स्पष्ट करतानाच मराठी कादंबरीचे स्वरूप, मराठी परंपरेची एकदम नवीनच मांडणी, मराठीतील प्रायोगिक कादंबरीची मूल्यात्मकता आणि मूल्यात्मकतेचे प्रत्यक्ष उपयोजन करणाऱ्या कादबंऱ्यांची चिकित्सा, प्रायोगिकतेची गतिमानता आदि अंगाने या समीक्षा ग्रंथात किशोर सानप यांनी सखोल चिकित्सा केली आहे.

सानपांनी तुकारामाच्या चरित्रलेखनाच्या अनुषंगाने संतसाहित्याच्या प्रांतात अलगद प्रवेश करत, 'युगपुरुष तुकाराम', 'तुकारामः व्यक्तित्व आणि कवित्व' आणि तुकारामांच्या सर्व ग्रंथाचा सखोल आणि साक्षेपी परामर्श येऊन 'समग्र तुकाराम दर्शन' घडवले आहे.

कादंबरी हा एक सामाजिक दस्तऐवज असल्यामुळे परिवर्तनाच्या नोंदी समकालीन कादंबरीतून दृग्गोचर व्हायला हव्या, गेल्या वीस-पंचवीस वर्षांच्या कालखंडातील सर्व प्रवाहांतल्या आणि विचारांतल्या कादंबऱ्यांची प्रातिनिधिक निवड करून मराठी कादंबरीचे समकालीन वास्तव किशोर सानप यांनी 'मराठी कादंबरी नव्या दिशा' या ग्रंथातून चिकित्सकपणे मांडले आहे.

'लघुपत्रिकेतील कविता प्रेरणा व स्वरूप' या छोटेखानी समीक्षा पुस्तकातून लघुपत्रिकेची चळवळ, तिच्या मर्यादा, तिचे यशापयश, लघुपत्रिकेतल्या कवीची आजवरची काव्यनिर्मिती, कवितेचे स्थान अशा समग्रलक्षी दृष्टिकोनातून किशोर सानप यांनी या ग्रंथाची मांडणी केली आहे. पुन्हा एकदा निर्माण झालेल्या स्थितिशीलतेला शह देऊन सृजनशीलता, प्रयोगशीलता, नावीन्य, कल्पकता, अभिव्यक्ती याची प्रतिष्ठा वाढावी हेच खरे तर या ग्रंथाच्या निर्मितीचे प्रयोजन मानून, लघुपत्रिकेच्या चळवळीचा एक दुर्मिळ दस्तऐवज त्यांनी सिद्ध केला होता.

'समकालीन स्त्रियांच्या कादंबऱ्या' मेघना पेठे, कविता महाजन आणि अरुणा सबाने ह्या स्त्रियांच्या सर्वांगीण बाजू धीटपणे पारदर्शक आणि निर्भीडपणे मांडणाऱ्या स्त्री लेखिका आहेत, त्यांनी आधुनिक, प्रगत - जागतिकीकरणाच्या काळात खेड्यापाड्यात नगरात महानगरात- आदिवासी कोअर एरियात काम करणाऱ्या सर्वच स्तरांतल्या स्त्री जीवनाचे समकालीन वास्तव माडले आहे. केवळ स्त्रीवादीच नव्हे, तर एकूणच मराठी साहित्यात या लेखिकांच्या कादंबऱ्यांतून आलेले स्त्रीत्वाचे ऊर्जित रूप सानपांनी आपल्या या ग्रंथांतून अधोरेखित केले आहे.

'दशक्रियेची उत्तरक्रिया' या संपादित ग्रंथातून त्यांची एखाद्या साहित्यकृतीकडे बघण्याची विवेचक आणि सम्यक दृष्टी प्रत्ययाला येते. याच लेखकाच्या 'तंट्या' या चरित्रात्मक कादंबरीबद्दल समीक्षेची चिकित्सा करणारा 'तंट्याबद्दल' ग्रंथ डॉ. सानपांच्या निधनाच्या सहा दिवसांआधी साकेतकडूनच प्रकाशित झाला आहे .

कादंबरीनंतर कवितेवर जाणीवपूर्वक समीक्षालेखन डॉ. सानपांनी केलेले आहे हे त्यांच्या ग्रंथालीने २०२० मध्ये प्रकाशित केलेल्या 'युगांतराची कविता' या ग्रंथातून दिसून येते. त्यांनी सत्तरी, ऐंशी, नव्वदीच्या व त्या पुढीलही कवी आणि त्यांची कविता हा आपला समीक्षाविषय केला. मराठी कवितेवर आपली स्वतंत्र मुद्रा या काळात उमटवणाऱ्या कवींपासून तो असे कर्तृत्व पुढे सिद्ध करण्याची शक्यता असणाऱ्या कवींपर्यंतचे हे समीक्षालेखन ही या काळाचीही सांस्कृतिक समीक्षा झाली आहे.

सैद्धांतिक व उपयोजित : समीक्षासृजनाच्या दरम्यान, आधुनिक मराठीतील वसाहतकालीन उत्तरवसाहतकालीन उत्तराधुनिक जागतिकीकरणाच्या काळात लिहित्या जुन्या-नव्या पिढीच्या सुमारे चाळीस कवींची जाणीवपूर्वक दखल घेऊन गंभीरपणे समग्र साहित्यकृतींची लेखकाच्या नैतिक भूमिकेच्या परिप्रेक्ष्यात प्रदीर्घ समीक्षा केली आहे. म्हणूनच हा ग्रंथ मराठी काव्य समीक्षेला एक नवा आयाम देणारा ठरतो आहे.

याशिवाय सानपांचे गेल्या दोन वर्षांत 'रामदास फुटाणे यांची कविता' - सामाजिक आणि राजकीय पडझडीचं सांस्कृतिक वर्तमान', 'मराठी कादंबरीचे साहित्यशास्त्र (का.बा. मराठे / वि.का. राजवाडे / भालचंद्र नेमाडे यांच्या मीमांसेच्या संदर्भात)', 'श्याम मनोहरांच्या कथा-कादंबऱ्या आणि नाटक : अज्ञात प्रेरणांचा शोध' हे ग्रंथ लवकर प्रकाशित होत आहेत. या ग्रंथांच्या शीर्षकावर नजर टाकली, तरी सानपांच्या लेखनातील वैविध्य, बृहतता आणि त्यांची लेखननिष्ठा प्रतीत होते. अशा त्यांच्या साहित्य व समीक्षा लेखनाची दखल मराठी समीक्षाविश्वाने तितकीशी घेतलेली दिसत नाही.

लेखकाची आधुनिकता आणि नैतिकता यांचा एकास एक संबंध मानून वाङ्मयीन सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनवादी चळवळीशी जैविक नाते निर्माण केले. लेखकाची नैतिकता हा बाणा मानून, समाजप्रबोधन हाच लेखनाचा हेतू मानणारे किशोर सानप हे व्रतस्थ लेखक होते. सामाजिक उत्तरदायित्व, लेखकाचे स्वातंत्र्य, युगलेखकाचे द्रष्टेपण, साहित्य आणि समाजाचा एकास एक संबंध, लेखकाची नैतिकता, देशीयतेची विविधांगी अस्मितारूपे, सामाजिक चळवळी, प्रबोधनवादी विचारसरणी, विदग्ध वाङ्मयाचे सामाजिक आणि सांस्कृतिक निकष अशा वाङ्मयीन सामाजिक-सांस्कृतिक मूल्यनिर्मितीच्याच परिप्रेक्ष्यात ह्या लेखकाने कथा-कविता-कादंबरी- (समीक्षा-संतसाहित्य-वैचारिक लेखन असे चौफेर लेखन) केलेले आहे. मूल्यभान राखून नैतिकतेच्या अंगाने ललित आणि समीक्षाविषयक लेखन करून, वाङ्मयाच्या विविध प्रकारांत साहित्य आणि समाजाचे तटस्थ, पारदर्शक, निर्भयवृत्तीने साक्षेपी लेखन व मीमांसा करून, गेल्या चार दशकांच्या प्रदीर्घ कालखंडात तटस्थपणे, समाजासाठी लेखन करत होते.

संतकवी ते आधुनिक उत्तराधुनिक लेखक-कवींचा सूक्ष्म आणि सखोल अभ्यास मांडून संत तुकाराम, भालचंद्र नेमाडे, श्याम मनोहर, आधुनिक व उत्तराधुनिक कथाकार-कादंबरीकार कवी-कवयित्री यांची सखोल व प्रदीर्घ मीमांसा करणारे ललित, सैद्धांतिक व उपयोजित समीक्षालेखन; लेखकाचा समग्र अभ्यास, वैचारिक आणि सामाजिक अशा विविधांगी समाज आणि साहित्याचा रक्तसंबंध पारदर्शकपणे आणि निर्भयपणे मांडणारा हा सर्जनशील समीक्षक होता. त्यांना विनम्र अभिवादन.

**- डॉ . राजेंद्र मुंढे**
rajendramundhe004@gmail.com

ग्रंथाली

**विज्ञानविचार आणि जीवन यांची सांगड घालणारी पुस्तके**




**मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रु.** | **मूल्य ७५० रु. सवलतीत ४५० रु.** | **मूल्य ७५० रु. सवलतीत ४५० रु.** | **मूल्य ४०० रु. सवलतीत २५० रु.** | **मूल्य ३५० रु. सवलतीत २१० रु.** | **मूल्य १५० रु. सवलतीत ९० रु.** | **मूल्य २०० रु. सवलतीत १२० रु.**




**मूल्य १०० रु. सवलतीत ६० रु.** | **मूल्य २५० रु. सवलतीत १५० रु.** | **मूल्य ३५० रु. सवलतीत २१० रु.** | **मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.** | **मूल्य ३५० रु. सवलतीत २१० रु.** | **मूल्य ३५० रु. सवलतीत २१० रु.** | **मूल्य ७५० रु. सवलतीत ५०० रु.**



# जीवनाचा आस्वाद घेणारा मित्र

डॉ. विजय पांडे

**काही** दिवसांपूर्वी संध्यावहिनींचा मला फोन आला, की सुहासचा नवीन काव्यसंग्रह प्रकाशित होतोय 'ग्रंथाली'तर्फे. तर या कार्यक्रमात सुहासचा मित्र म्हणून तुला थोडं बोलायचंय. मी नखशिखांत हादरलो. कारण हे म्हणजे, एखाद्या वारुळाला तू हिमालयावर बोल, असं म्हणण्यासारखं आहे आणि परत इतक्या दिग्गज साहित्यिकांसमोर आणि तुमच्यासारख्या सुजाण रसिक प्रेक्षकांसमोर. स्वत:ची शोभा करून घेण्यासारखंपण. तरीही मी होकार दिला याला मुख्यत: दोन कारणं आहेत. एक तर सुहास हा माझा विकपॉइंट आहे. दुसरं म्हणजे तो माझा मेडिकलचा क्लासमेट. आमची १९७५ ची बॅच.

मी पहिल्यांदा सुहासला बघितलं तेव्हा मला असं काही विशेष वाटलं नाही. तो औरंगाबादला असतो. एस.बी. कॉलेजमधून आलाय आणि याचं नाव आहे सुहास जेवळीकर, इतकीच जुजबी माहिती माझ्याकडे होती.

काही महिन्यांनी आमची मुलामुलींची ट्रिप वेरूळला गेली. संध्याकाळी आम्ही सूर्यास्त बघत खुलताबाद गेस्ट हाऊससमोर सगळे बसलो होतो. तेव्हा सुहासनं काही कविता सादर केल्या. त्यात बा.भ. बोरकरांची प्रेमकविता... कारण मुलीपण तिथे होत्या... मर्ढेकरांची आणि मंगेश पाडगावकरांची... पाडगावकरांचा तर तो फॅन होता. ते त्याचे आयडॉल होते. त्यांची कविता त्याने उत्कृष्ट सादर केली. सर्वांनी वाहवा केली. आम्हाला वाटलं, पूर्वतयारी आणि पाठांतर करून आलाय. बहुतेक हा मुलीबाळींवर इंप्रेशन जमवू बघतोय. अर्थात आमची विचार करण्याची पात्रता तेवढीच होती.

त्यानंतर तो म्हणाला, की मी आता स्वत: तयार केलेल्या वात्रटिका सादर करतो. आम्हाला आश्चर्य वाटलं, आम्ही सावरून बसलो आणि तो सुरू झाला, ''एकदा संमेलनात भेटले पाडगावकर. म्हणाले, कविता काय लिहितोस, वात्रटिका कर. तेव्हापासून वात्रटिका लिहू लागलो. आणि शेवटी वात्रटच ठरलो.''



सुहास जेवळीकर

सर्वांनी त्याला जबरदस्त रिस्पॉन्स दिला आणि वन्समोअरचा ठेका धरला. त्यानं दुसरी वात्रटिका सुरू केली. मुलींकडे वळत आणि बघत तो म्हणाला,

'कितीदा तरी पाहायचं तुझ्याकडं आशेनं...' ही ओळ ऐकल्यावर पोरांनी धिंगाणा सुरू केला. तो म्हणाला, 'अरे थांबा, पुढचे ऐका म्हणजे शांत व्हाल...

'कितीदा तरी पाहायचं, तुझ्याकडे आशेनं,<br>
पण पदरी निराशाच आली<br>
ध्यानीमनी नसताना,<br>
तू तर आम्हाला राखी बांधली.''

हे ऐकून पोरांनी अक्षरश: त्याला डोक्यावर घेतलं. मला लक्षात आलं, की हे पाणी वेगळं आहे. याच्यात काहीतरी फॅक्टर आहे. आणि तेव्हापासून सुहास जेवळीकर नामक नांदी सुरू झाली.

सुहासचा पेहेराव, त्याची वेशभूषा ही साहित्यिकाला साजेशीच असायची. त्याचा तो जाडसर भिंगाचा चष्मा, त्याची ती फ्रेंचकट पाडगावकर स्टाईल दाढी, गळ्यातली ती सदैव असलेली शबनम बॅग आणि अंगावर कधीही फिटींगचे नसलेले ते कपडे.

साहित्यिकांत जे गुण असायला हवे ते मात्र सुहासमध्ये अगदी ठासून भरले होते. साहित्यिक कसा असावा तर तो व्यासंगी असावा, विवेकशील असावा, चिंतनशील असावा, समतोल विचार करण्याची त्याला पात्रता असावी, सारासार विवेकबुद्धीनं विचार करणारा असावा आणि हे सगळं आमच्या सुहासमध्ये होतं.

त्याचं वाचन अफाट होतं. संतवाङ्मय असो, कथा-कादंबऱ्या, ललित लेख, शेक्सपीयर जे जे काही वाचनीय असेल त्याचा तो फडशा पाडायचा, तो बहुश्रुत होता. कविसंमेलन असो, साहित्यसंमेलन असो, एखाद्या ज्येष्ठ साहित्यिकाचं भाषण असो, कुठे परिसंवाद चालू असो, हा इकडे पिरेड बंग करायचा आणि तिथे जाऊन बसायचा. त्यामुळे याची व्होकॅलबरी, मराठीचा शब्दसंचय प्रचंड वाढला होता. तो आता शब्दांचा जादूगार झाला. शब्दांचा वापर आता तो अत्यंत बेमालूमपणे आणि चपखलपणे करायला लागला. साक्षात सरस्वती आता त्याच्या लेखणीमध्ये विराजमान व्हायला लागली होती.

त्याचं अक्षर मोत्यासारखं होतं. सुवाच्य अक्षर म्हणजे काय हे मला सुहासचं अक्षर बघितल्यावर समजलं. मला आठवतं, मी शाळेत होतो तेव्हा मास्तर मला नेहमी म्हणायचे, 'तू सुवाच्य अक्षरात लिही.' मला समजायचं नाही, की म्हणजे मी करू काय नेमकं? कारण मास्तरांचं स्वत:चं अक्षर हे सुवाच्य अक्षराला काळिमा फासणारं होतं. त्यात माझ्या बाजूला एक कुशाग्र बुद्धिमान मित्र बसायचा, त्याचं नाव होतं देविदास तुळजापूरकर. तो मास्तरांच्या पुढे होता. म्हणजे त्यांनी लिहिल्यावर त्यालाच ते वाचायला दिलं तर हा अस्खलित बोलणारा देविदास, सतत अडखळायचा. त्यामुळे सुवाच्य हा शब्द माझ्यासाठी अनुत्तरीतच राहिला. आणि सुहासचं अक्षर बघितल्यावर साक्षात्कार झाला की याला म्हणतात सुवाच्य. आणि हे आपल्याला बापजन्मात कधी शक्य होणार नाही.

सुहासचा वावर हा वैद्यकीय आणि साहित्यिक क्षेत्रांत सहज होता, आणि अधिकारवाणीनंपण होता. साहित्यिक क्षेत्रात तर तो अधिकच सहज होता. हा सहजपणा सहज नाही येत, त्याला प्रचंड व्यासंग लागतो, जबरदस्त अभ्यास लागतो, खडतर तपश्चर्यापण. हे सगळे केल्यानं त्याला तो अधिकार प्राप्त झाला होता. व्यासपीठावर भाषण करताना किंवा एखादी मुलाखत घेताना त्याचा तो रास्त गर्व आणि त्याची मिजास एखाद्या उत्कृष्ट साहित्यिकाला शोभून दिसावी, तशी दिसायची.

कोणतीही चुकीची गोष्ट किंवा अपप्रवृत्ती दिसली की हा त्यावर खरमरीत टीका करायचा. तेव्हा तो कोणाचाही मुलाहिजा ठेवायचा नाही. वैद्यकीय क्षेत्रातील अपप्रवृत्तीबद्दल त्यानं 'लोकमत'मध्ये अनेक लेख लिहिले. ते सर्व एकत्रित करून त्याने 'स्वास्थ्यसंवाद' नावाचं एक पुस्तक प्रकाशित केलं. हे सगळं करण्यामागे त्याची एकच भूमिका होती की समाजातली अत्यंत गरीब, पिचलेला जो रुग्ण आहे त्याला उत्तम वैद्यकीय सेवा मिळावी आणि डॉक्टर व रुग्ण यांच्यात सलोख्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत. साहित्यिक क्षेत्रातपण त्याची तीच भूमिका होती, की चांगलं साहित्य लोकांसमोर यावं. समाजाला चांगले विचार मिळावेत, चांगली प्रेरणा मिळावी.

अनेक वैद्यकीय शब्द त्यानं त्याच्या कवितेत आणि लेखनात वापरले. हजारो वैद्यकीय शब्द साहित्यात वापरणारा तो एकमेव साहित्यिक होता. त्याबद्दल मला त्याचा अभिमान आहे आणि इथे टाळ्या वाजवून तो सार्थ अभिमान प्रदर्शित करूया.

'क्रिएटिव्हीटीला पण मेनोपॉज असतो.' असं वाक्य मधेच त्यानं टाकलं. मी म्हटलं, अरे बाबा आता हे काय? तेव्हा तो हसून म्हणाला, 'विंदा करंदीकर हे ज्येष्ठ साहित्यिक. त्यांना वाटलं, की आपली साहित्यिक क्षमता संपलीय म्हणून ते थांबले. यापुढे मी लिहिणार नाही हे जाहीर केलं. पण त्यांच्या समकालीन ज्येष्ठ कवी, साहित्यिक जे की खूप मोठे होते; पण त्यांची साहित्यिक क्षमता संपूनही त्यांचं स्फुटलेखन, त्यांनी साप्ताहिकांत, वर्तमानपत्रांत, दिवाळी अंकात सुरूच ठेवलं. त्यांचं हे केविलवाणं लिखाण बघून हेच का ते मोठे कवी, मोठे लेखक असा प्रश्न पडावा.' म्हणून सुहासनं नावे घेऊन त्यांच्यावर टीका केली. टीका करण्याचा त्याचा अधिकार होता. मला मात्र त्यांची नावं घ्यायलाही भीती वाटते. असो.

मी त्याला नेहमी म्हणायचो, तू नेहमी लोकांच्या चुकांवर का बोट ठेवतोस. तो म्हणायचा, नाही, मला या समाजाला 'विसंगतीपासून सुसंगतीकडे न्यायचंय' आणि हाच माझा प्रयास राहील.

तो नुसता टीकाकार किंवा समीक्षकच नव्हता तर तो मोटिव्हेशनल स्पीकरपण होता. शाळा-कॉलेजमध्ये परिसंवादामध्ये भाग घेताना तो जीवनाचा आस्वाद कसा घ्यावा यावर बोलायचा. बऱ्याचदा मला आठवतं तो डावा मेंदू आणि उजवा मेंदू यावर बोलायचा.

तो म्हणायचा, तुम्ही आयुष्यभर करिअरएके करिअर हेच करता आणि शेवटी करिअर म्हणजे पैसा हेच उद्दिष्ट ठरतं. यावर त्यानं एक बोल्ड स्टेटमेंट केलं होतं की 'करिअर म्हणजे फक्त पैसा हे समीकरण असेल तर प्रेम म्हणजे फक्त सेक्स, हे म्हणण्याइतकं ते आततायी ठरेल.' मी तर थक्कच झालो हे ऐकून. बसल्या बसल्या तो अशी कोटेशन द्यायचा. मला ते खूप अपील व्हायचं. कारण त्यात खूप गर्भित अर्थ असायचा.

तो म्हणायचा, तुमच्यातल्या क्षमता ओळखा. त्या बाहेर काढा. त्यात साहित्य आहे, संगीत आहे, शिल्प आहे, चित्रकला आहे. तुमच्यात अनेक चॅनेल आहेत. त्यांचं सर्फिंग करा. आयुष्य फक्त करिअरनं एकसुरी करू नका. बाकीच्या गोष्टींचाही आस्वाद घ्या आणि हे जीवन सुखकर करा.

मला आठवतं, सुहासचं आणि संध्यावहिनींचं लग्न ठरलं तेव्हा तो खूप खुश होता, आनंदात होता. त्यानं एक सुंदर पत्रिका लिहिली. त्यात त्यानं लग्न किंवा विवाह हे शब्द कुठेही वापरले नाहीत. 'मी आणि संध्या आम्ही सहजीवनाला प्रारंभ करतोय' अशी सुरुवात करून पाच-सहा ओळींची ती पत्रिका नातेवाईक, मित्र आणि आप्तेष्टांमध्ये वाटली. समाजानं त्यावर खूप तोंडसुख घेतलं. काही जण तर घरी आले आणि म्हणाले, तू आणि संध्या काय लिव्ह इनमध्ये राहणार का? की कॉन्ट्रॅक्ट केलंय तुम्ही दोघांनी? त्याने त्यावर हसून फक्त मान डोलावली. तो बोलायचा बॅटनं. या दांपत्यानं ३५ वर्षं सोन्यासारखा संसार करून समाजाला दाखवून दिलं, 'मंत्रांनी वरणं श्रेष्ठ की मनानं वरणं श्रेष्ठ'.

शेवटी शेवटी हा मित्र आजारी होता. सतत डायलिसिस करावं लागायचं त्याला. एकदा डायलिसीससाठी सिग्मामध्ये तो ॲडमिट होता, तेव्हा मी त्याला भेटायला गेलो. त्यानं माझा हात हातात घेतला आणि त्याला किती बोलू आणि किती नाही असं झालं. बोलताना त्याला दम लागत होता. बाजूलाच संध्यावहिनी उभ्या होत्या. त्या म्हणाल्या, की अरे सुहास, तुला दम लागतोय, तू एकही शब्द बोलू नको. त्यावर सुहासनं उत्तर दिलं, की हा सुहास शब्दांशिवाय नाही जगू शकत. नि:शब्द राहण्यापेक्षा मी मरण पत्करेन. मी हळूच माझा हात त्याच्या हातातून काढून घेतला. येतो, म्हणून निरोप घेतला.

हा महान शब्दप्रभू माझ्या गावातच राहायचा, हा द्रष्टा साहित्यिक माझ्या वर्गातच होता, हा उत्कृष्ट समीक्षक आणि क्लास मुलाखतकार सदैव माझ्या सोबत होता. परंतु त्याचे महान विचार आणि अप्रतिम शब्द वेचायला मी खूप कमी पडलो. कमी काय मी करंटाच ठरलो. पण, त्याचा स्नेह मला लाभला. त्याच्या मांडीला मांडी लावून बसण्याचं भाग्य मला लाभलं. त्याच्या लेखनानं, भाषणानं आणि असंख्य गाठीभेटींनी, माझ्या जीवनाचे अनेक क्षण कृतार्थ झालेत. त्याबद्दल फक्त कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मी इथे उभा आहे. मला माहितेय की सुहासवर बोलण्याची, माझी पात्रता नाही. त्यासाठी तोलामोलाचा व्यासंग लागतो, तो माझ्यात नाही, पण कृतज्ञता व्यक्त कण्याचा माझा अधिकार कोणी हिरावून घेऊ शकत नाही.

आज खूप उत्कृष्ट दिवस आहे कारण सुहासचा दुसरा काव्यसंग्रह प्रकाशित होतोय. खंत इतकीच, की आज सुहास इथे नाही. मला आठवतं तो नेहमी म्हणायचा की 'कविता जेव्हा मेंदूला अस्वस्थ करते, तेव्हाच ती काळजाला हात घालते आणि मगच शाईवाटे कागदावर उतरते.'

सुहासचे शब्द आणि विचार घरोघरी पोचवण्याचं महान आणि प्रशंसनीय कार्य संध्यावहिनी करत आहेत. साहित्यात प्रगल्भ असणारे त्याचे मित्र करताहेत. त्यांना मी शुभेच्छा देतो, धन्यवाद देतो आणि आभारपण मानतो.

आज सुहास इथे असता तर त्याला मी कडकडून मिठी मारली असती, पण ते शक्य नाही म्हणून त्याला मानवंदना देऊन एक कडकडीत सॅल्युट करतो.

'सॅल्युट सुहास!'

**– डॉ. विजय पांडे** (बालरोगतज्ज्ञ)
drvijaykpande@gmail.com

## 'पानं पिवळी पडत चालली असताना'चे प्रकाशन

'ज्या ठिकाणी मृत्यू आहे, त्या ठिकाणी सर्जन आहे हे सांगणारी डॉ. सुहास जेवळीकर यांची कविता आहे,' असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांनी केले.

डॉ. सुहास जेवळीकर यांच्या 'पानं पिवळी पडत चालली असताना' या 'ग्रंथाली' प्रकाशित कवितासंग्रहाचे प्रकाशन भारत सासणे यांच्या हस्ते झाले, तेव्हा ते बोलत होते. भारत सासणे यांनी डॉ. जेवळीकर यांच्या 'हॉस्पिटलमधील कवितां'चा उल्लेख करून हे विधान केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रख्यात साहित्यिक, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. फ.मुं. शिंदे होते. डॉ. वृषाली किन्हाळकर यांनी डॉ. जेवळीकर यांच्या कवितांवर भाष्य केले.

डॉ. वृषाली किन्हाळकर म्हणाल्या, 'पानं पिवळी पडत चाललेली असताना' या कवितासंग्रहातून समाज सुसंगतीकडे नेणारी वाट दिसणार आहे. समाज सुसंगतीकडे जावा हेच डॉ. जेवळीकर यांचे स्वप्न होते.' अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना, 'भूलतज्ज्ञ लोकांना गुंगवण्याचे काम करतात, पण डॉ. सुहासमधील साहित्यिक माणसाला गुंगवण्याऐवजी जागवण्याचे काम करतो, हेच या लेखकाचे वेगळेपण आहे,' अशा शब्दांत ज्येष्ठ साहित्यिक प्रा. फ.मुं. शिंदे यांनी विचार मांडले.

सुरुवातीला डॉ. सुहास जेवळीकर यांच्या जीवन-चरित्रावर चित्रफीत दाखवण्यात आली. ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर, डॉ. सुरेंद्र जोंधळे, डॉ. विजय पांडे यांनी मनोगत व्यक्त केले. अनुजा क्षीरसागर यांनी डॉ. जेवळीकर यांच्या कविता सादर केल्या. ●



# इहलोक

राजश्री पाटील

'सगळेच अगदी
आज कसे ओथंबले आहे!
वर्गात नवी मुलगी यावी
तसे ... तसे वाटत आहे!'
– सदानंद रेगे (गंधर्व)

**मृग** नक्षत्र, जून महिना, शाळा-महाविद्यालयांची नवीकोरी सुरुवात हा केवळ आपल्या भूगोलाचा विषय नव्हे तर तो आपल्यापुरता निसर्गनियम आहे. या निसर्गनियमाशी बांधली गेलेली आठवणींची साठवण आहे. काव्यानुभवाशी सलगी करणारा गद्यलेखन प्रकार म्हणजे ललित निबंध. कवितेइतकेच शब्दांचे साहचर्य ललित निबंधातील आत्मप्रकटीकरणामध्ये महत्त्वाचे असते. आयुष्य समरसून जगण्याचे काव्यात्म तत्त्वज्ञान सांगणारे, भवतालातील लहानसहान सुखांच्या नोंदी घेणारे ललित निबंधलेखन हा मराठी साहित्याचा ऐवज आहे.

सद्यःस्थिती अशी आहे की ललित निबंधातील या अनुभवांना मुरवण्याची, त्यातील आशय आणि अभिव्यक्ती जाणून घेण्याची, स्थिरचित्ताने चराचरावर प्रेम करण्याची निकड निर्माण झालेली आहे. सौंदर्यवादातील निसर्गप्रेम ज्या जातकुळीचे असते तसे प्रेम, निसर्ग मानवावर करतो, तसे प्रेम, प्रेमाची ही रीत भारतीय तत्त्वज्ञानामध्ये आढळते. वेदांमध्ये भूमी (निसर्ग), निसर्गातील नियमबद्धता तसेच, ज्ञानेंद्रियांच्या साहाय्याने, शब्दरसरूपगंध यांचा अनुभव मनुष्य कसा घेतो याची वर्णने आलेली दिसतात. अथर्ववेदामध्ये भूमी म्हणजे पृथ्वीवरील पशू, पक्षी, प्राणी यांबद्दल सांगितले आहे. पृथ्वीने विविध मौल्यवान पदार्थ (रत्न, हिरण्य) धारण केलेले आहेत, इथे नानाधर्मी, नाना भाषीय माणसे राहतात हेही सांगितले आहे. भूमी ही माता आहे, ऋतूबद्दल हा निसर्गनियम आहे आणि या नियमांना ऋग्वेदात 'ऋत्' म्हटले आहे. निसर्गनियमांचे पालन देवताही करतात (!)

मनाचे व्यापार ज्यामुळे चालतात ते प्रेरक तत्त्व अस्तित्वात आहे. योग्य वस्तुंकडे जाण्यास प्रेरणा देणारे तत्त्व, भोवतालातील नोंदी घेणारे, त्यात रमणारे, त्यातच सुख मानणारे अनुभवप्रकटीकरण सहजतेने ललित निबंधात येते. भावकविता आणि ललित निबंधाचे जवळचे नाते आहे. कवितेला जशी भाववृत्तीत डूब घेण्याची आवश्यकता असते तशीच ललितलेखनाला भाववृत्तीत डूब घेण्याची आवश्यकता असते असे दुर्गा भागवत म्हणतात ते किती खरे आहे! त्यांच्या मते तशी भाववृत्ती नसेल तर सृजनाचा अंकुर उगवणारच नाही. 'पैस'च्या प्रस्तावनेत त्या म्हणतात, ''अभ्यासू लेखनात चेतन मन जागता पहारा ठेवून असते आणि ललित लेखनात स्वप्नभूमी तळातून वर आल्यासारखी होते... ललित लेखनाचा केवळ भावनेशीच नव्हे तर आगमागच्या जीवनाशीही घनिष्ट संबंध असतो...''

मराठी लघुनिबंध सैलसर होऊन त्याचा मुक्ततेकडे प्रवास झाला आणि ललितनिबंध आकाराला आला. ही सौंदर्यवादी लेखनप्रेरणा 'मी'ला अधिक मुक्त करणारी होती. अनुभवप्रकटीकरण सुलभ, सर्वांगसुंदर करणारी होती. काव्यानुभवाच्या जवळ जाणारा, गद्य व पद्य यांतील सीमारेषा देखणी करणारा अनुभव व्यक्त होऊ लागला. साहजिकच हा अनुभव भोवतालाकडे बारकाईने पाहून लिहिलेला होता. भाववृत्तीतील बदल आठवणवजा नोंदीमधून साकार झाले. हे स्मरणरंजन होते; बहुश्रुत लेखकाचे स्मरणरंजन. ऋतुबदल, बदलते प्रहर हे लेखनाचा विषय झाले. इरावती कर्वे, कुसमावती देशपांडे, यांनी गद्यलेखनाला काव्यात्म वळण लावले. तांत्रिक चौकटीतून त्याची मुक्तता केली. ललित निबंधांच्या नायकाच्या मुख्य भूमिकेत निसर्ग येणे स्वाभाविक होते. पंचेंद्रियांनी, समरसून, उत्फुल्ल जीवन जगण्याचा भारतीय तत्त्वज्ञानाचा आविष्कार ललित निबंधांच्या माध्यमातून, काही साहित्यकृतीं-मधून आला.

कुसुमाग्रज, इंदिरा संत, विंदा. करंदीकर, मंगेश पाडगावकर या श्रेष्ठ कवींनी, उच्च दर्जाचे ललित निबंध लेखनही केले याचे नवल वाटू नये. इरावती कर्वे, दुर्गा भागवत, श्रीनिवास कुलकर्णी, प्रकाश संत यांच्या लेखनाने ललित निबंधाची गुणवत्ता आणखी वाढवली. दुर्गा भागवत यांच्या 'ऋतुचक्र'मध्ये आणि श्री वि. कुलकर्णी, प्रकाश संत यांच्या समग्र लेखनामध्ये निसर्ग नेपथ्य म्हणून येतो तसा प्रमुख भूमिकेतही दिसतो. शब्द-रस-रूप-गंध या इंद्रियसंवेदनांचा अनुभव या लेखकांच्या लेखनातून येतो. हा रसरशीत अनुभव, समरसून जीवन जगण्याचे धडे देत नाही तर कविता शिकवतो! या लेखकांचे काव्यात्म चिंतन, मानवी जीवनात ठहराव किती मोलाचा असतो हे सांगते.

''ज्या वेळी पहिल्या स्पर्शाचे संवेदन झाले त्याच वेळी आत्म्याचा जन्म झाला...''. 'स्पर्शाची पालवी' या गो.वि. करंदीकर यांच्या निबंधातील हे वाक्य त्वचेचे महात्म्य सांगते. करंदीकर स्वतःला स्पर्शवादी म्हणवतात. मित्राशी काही बोलायचे असल्यास, त्याच्या खांद्यावर हात ठेवला की शब्दांना वाट सापडू लागते. ''माझी सुख-दुःखे ही फक्त स्पर्शपल्लवी भाषाच बोलू शकतात. तीच प्राणाची आदिभाषा आहे.'' स्पर्श हे माणसाचे पहिले इंद्रिय आहे. स्पर्शामध्ये अपार सामर्थ्य आहे. स्पर्शाच्या संवेदनेमध्ये सहजतेला फार महत्त्व आहे.

'स्पर्शाची पालवी'तील धाकटा भाऊ, गोठ्यातील जनावरांशी बोलत असतो ते स्पर्शाच्या भाषेतून! गंग्या महाराच्या मुलाची आठवण गो.वि. करंदीकर झपझप चालल्यासारखी सांगतात. तो वेग-आवेग वाचकाला जाणवतो. या परिच्छेदातील शेवटचे वाक्य आहे, ''...अस्पृश्यता हा स्पृश्यांना मिळालेला शाप आहे!''

सहानुभूतीच्या संथ प्रवाहातून आपण आपल्या मुळाकडे वाहू लागणे हे आपले कूळ आहे. कपड्याचा पोत, लाकडाचा गुळगुळीतपणा, लोखंडाचे काठिण्य स्पर्शातूनच समजते. इतकेच काय; खाद्यपदार्थ काट्याचमच्याने जेवणारी माणसे अर्धपोटी असतात आणि चहा पितानासुद्धा, कपाभोवती पंजा आवळून घोट घोट घ्यावा. असे करंदीकरांचे मत आहे. संवेदनशील कवीमनाचे सहजोद्‌गार या लेखनामध्ये 'ऐकू' येतात. या लेखाचा शेवट खुसखुशीत आहे. स्पर्शसंवेदना ही सहज घडणारी पण चमत्कार करणारी गोष्ट आहे यात शंका नाही.

कवयित्री इंदिरा संत यांनी गंध या इंद्रियसंवेदनेबाबत लिहिले आहे. 'गंधगाभारा' या ललित गद्यामध्ये इंदिरा संत म्हणतात की माझे गंधवेड बालपणापासूनचे आहे. माझ्या गंधगाभाऱ्याची मुळे माझ्या गावी आहेत. हे गंधवेड गावरान पद्धतीचे आहे. गावरानाने जोपासलेले.

वर्तमानपत्राचा वास, फिनेलचा वास, अगदी स्पिरीटचासुद्धा वास त्यांना आवडतो. हे गंधवेड अत्तराच्या बाटलीसाठी मात्र आतुरलेले नाही. सुगंधाची इतकी जवळीक मला नको वाटते, असे इंदिराबाई म्हणतात. या गद्यातून येणारी 'मी' ही प्रांजळपणे हे कथन करते. आपली गंधग्रहणशक्ती बालपणापासून तीव्र असावी त्यामुळे जेवणानंतर परकराला हात पुसून पुन्हा आपण हाताचा वास घेत असू असे त्या सांगतात. आईच्या पेटीतील साड्यांना गार सुगंध आहे, विविध फुले, वृक्ष, तुरीच्या शेंगा, भुईमुगाच्या शेंगा, तापवलेल्या दुधाचा वास.... असे अनेक प्रकारचे गंध, हे तवंदी या आपल्या गावालाच चिकटलेले आहेत असे त्या म्हणतात. येथील गाईगुरांचा, गोठ्यांचा वास, काढलेल्या दृष्टीचा वास, रॉकेलच्या चिमणीचा वास, तव्यावर परतल्या जाणाऱ्या कोरड्यासाचा खमंग वास अशा अनेक गंधांची एक कुपी जणू त्यांच्या मनात आहे.

'मृद्‌गंध मात्र सर्वश्रेष्ठ! एखाद्या विशुद्ध भावकवितेसारखा'. इथे हा लेख संपतो. हे गंधवेड मात्र वाचकांच्या मनात पिंगा घालत राहते.

ललित निबंधाची एक गंमत असते. यातील 'मी' वाचकाला स्वतःच्या अनुभूतीचा भाग बनवतो. विषयाचे बंधन नाही, तंत्राची चौकट नाही, सुष्ट-दुष्ट अशी विभागणी नाही, त्यामुळे अशा प्रकारचे गद्यलेखन हे जीवनावरची श्रद्धा वाढवते. जगण्याचा उत्सव व्हावा अशी विलक्षण सौंदर्यासक्ती अशा लेखनात असते.

'ऋतुचक्र' हा दुर्गा भागवत यांचा लेखसंग्रह दृक्‌संवेदनांचे अनोखे 'दर्शन' घडवतो. यांतील महिन्यांना स्वतःचे व्यक्तिमत्त्व आहे. या प्रत्येक महिन्यांचा स्वभावधर्म वेगळा आहे. या कलाकृतीचे वाङ्मयीन सामर्थ्य आणि सौंदर्य विलक्षण आहे. त्यामुळेच 'ऋतुचक्र' हा मराठी ललित गद्याचा मानदंड ठरला आहे.

'दुर्गा भागवत व्यक्ती, विचार आणि कार्य' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत अरुणा ढेरे म्हणतात, ''मराठी पर्यावरणात पूर्वी निर्माण होऊ न शकलेला आणि पुढेही आविष्कृत न झालेला दृक्‌प्रत्ययवाद दुर्गाबाईंच्या लेखनातून उमटलेला आहे. क्षणांच्या अपूर्वतेची इतकी सजग जाणीव इतक्या समरसतेने पूर्वी कोणीही व्यक्त केली नव्हती आणि असंही लक्षात येतं, की मानवी जीवनात ओवूनच असणारी, स्पंद पावणारी काळाची संकल्पना पूर्वी कोणीही इतक्या लखखपणे आविष्कृत केली नव्हती. ...सृष्टी आणि माणूस यांच्यामधून वाहणारा जीवनसातत्याचा तालही त्यांना नेमका समजला आहे.''

स्वच्छ सुंदर पांढरे पोलके आणि सुती छापील नऊवारी नेसलेली आजी, आपले बोट धरून ऋतुबदल दाखवतेय असे वाटावे इतकी दृश्यात्मकता या लेखनात आहे. बहुश्रुत लेखिकेचं लेखन असल्यामुळे या लेखनात अनेक संदर्भ येतात. विविध ज्ञानशाखांच्या अभ्यासकांस, संशोधकांस उपयुक्त ठरेल असा विविधांगी अभ्यास दुर्गाबाईंनी केला त्यामुळे त्यांचे ललित

गद्यलेखन वाचकाला समृद्ध करणारे आहे.

'ऋतुचक्र'मधील 'तालबद्ध पौष' या लेखांत रामायण या महाकाव्याचे, आदिवासींच्या कथांचे संदर्भ येतात. पौष हा 'इष्ट ऋतुची' समाप्ती आहे. या महिन्याला पुष्टीचा महिना म्हणता येईल. हे कथन पौषाची तालबद्धता ऐकवते आणि रेखाटते. ललित गद्याची आणखी एक गंमत असते. चित्रमय शैलीच्या शब्दांसोबत रेखाटनेही येतात. 'ऋतुचक्र'मधील पद्मा सहस्रबुद्धे यांची रेखाटने दुर्गाबाईंच्या शब्दांच्या हातांत हात घालून जाणारी आहेत. यांतील स्मरणरंजन हे पौषाबद्दल लिहिताना, इतर महिन्यांमधील निसर्ग पौषाहून कसा वेगळा आहे हेही सांगते. दुर्गाबाईंचा हा तौलनिक अभ्यास जितका इंद्रियसुख देतो तितकाच मेंदूलाही लख्ख करतो.

श्रीनिवास विनायक कुलकर्णी हे तर मराठी ललित गद्याचे, प्रत्यक्षात उतरलेले निर्मळ, निरागस, निरामय स्वप्न आहेत! प्रौढत्वातही अशा दृष्टीने भवतालाकडे पाहता येते, हे त्यांच्या लेखनाच्या निमित्ताने समजावे. हे समजले की निसर्ग माणसावर कशा प्रकारचे प्रेम करतो हे आपसूक समजते. निसर्ग आणि माणूस यांच्यातील साहचर्य या लेखनात दिसते तसेच माणसा-माणसांमधील साहचर्यही दिसते. बालपणीच्या आठवणी प्रौढ वयात शब्दबद्ध करताना निर्मितीतील कलात्मकता अबाधित राहणे कठीण असते. हे हसरेनाचरे लेखन कधी कधी फार अस्वस्थही करते, कारण बहुतांश ललित गद्यामध्ये गूढता, आध्यात्मिकता, लोकसंस्कृती यांच्या माध्यमातून शाश्वत सत्यांचे रेखाटनही आले आहे.

'डोह'तील 'वारा वाहे रुणझुणा'मध्ये सुरुवातीलाच वाऱ्याच्या स्पर्शाला भुरभुरते सुख म्हटले आहे. या सुखाच्या स्पर्शाचा शोध मी घेत असे आणि स्वतःभोवती घुटमळत असे, असे लेखक म्हणतात तेव्हा या निरीक्षणक्षमतेचे अप्रुप वाटू लागते. न दिसणाऱ्या वाऱ्याचे अंतःसंगीत पोचवण्याची किमया श्री.वि. कुलकर्णी यांनी घडवून आणली आहे. ताऱ्याच्या घरात राहणाऱ्या वाऱ्याची विविध रूपे आहेत. तो मोठाल्या झाडांच्या पोटांना वेढा घालतो, प्रचंड पिंपळाला गदगदायला लावतो, पांगाऱ्याच्या दोन उंच मुलींना गांगरून टाकतो, जानकी काकू आणि काकाला भिववतो, परचक्रासारखा वाटतो, पिलांच्या डोळ्यांत माती जाऊ नये म्हणून पोपटांच्या जोडीला पाठ करून बसवतो! या वाऱ्याचा स्वभाव आग्यामोहोळालासुद्धा हलवतो. दादा देशपांडे हे शिक्षक वाऱ्याला साक्ष ठेवून वाऱ्यावरला तास घेतात! सगळीकडे भरून राहिलेल्या वाऱ्यांची नावे ही आहेत.

शब्द-रस-रुप-गंध यांची जादू आकळावी, भवतालातील प्रत्येक फ्रेम टिपता यांवी, हे वेड संसर्गजन्य असो अशा आशीर्वादांचा ध्वनी ललित गद्यलेखनात ऐकू येतो. तो ऐकू यावा इतके सहृदय आपण असले पाहिजे. तंत्रज्ञान हे कोविडच्या काळामध्ये वरदान ठरले खरे, पण मानवाने त्याला आपल्या भावभावनांवर स्वार होऊ दिले. हे असे होणे धोकादायक आहे त्यामुळे भवतालातील सुखाच्या नोंदी घेणे बंद होते. इंस्टाग्राम सारख्या समाजमाध्यमात वावरणाऱ्या माणसांचा अटेंन्शन स्पॅन आता सात सेकंदांवर आला आहे. ही बाब चिंताजनक आहे. अशा कठीण काळात ललित गद्यातील अनुभूतींचा आस्वाद ज्ञानाच्या माध्यमातून घेता आला तर हा ग्रह अर्थात इहलोक जगण्यास अधिक सुंदर आहे, असे खुशाल समजावे.

शेवटी, दुर्गाबाई म्हणतात तसे ज्ञानावर नितांत श्रद्धा असणे महत्त्वाचे आहे. 'ज्ञान म्हणजेच आजचं आमचं, व्यक्तीच्या आणि विश्वाच्या समग्र जीवनाचं भान'.

**– राजश्री पाटील**

rajshreepatil.sndt@gmail.com


॥ग्रंथाली॥

**पानं पिवळी पडत चालली असताना**

**सुहास जेवळीकर**




वाऱ्याच्या उलट प्रवाहाशी झुंज देत स्वैर गिरक्या घेण्यातलं निस्सीम सुख तसंच क्षितिजाच्या अनंत अंतरापर्यंत झेपावत राहण्यातला निर्भेळ आनंद देत आणि घेत चाललेला हा कवी नावाचा मुशाफिर त्याच्या पायाखालच्या जमिनीचं विस्मरण मात्र तसूभरही होऊ देत नाही.

**– फ.मुं. शिंदे**

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**



शरद काळे

# निसर्गचक्राचा समतोल मानवाच्या हाती

**जागतिक** तापमानवाढ, त्या अनुषंगाने होणारे हवामानातील बदल आणि माणसाची बदलती जीवनशैली या गोष्टी परस्परसंबंधित आहेत. या सगळ्यांचा केंद्रबिंदू प्रत्येक व्यक्ती आहे. जी व्यक्ती पृथ्वीतलावर वावरत आहे, तिलाच फक्त या गोष्टींची जाणीव असते. तसेच या प्रत्येक गोष्टीत ती व्यक्ती प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सामील असल्यामुळे, त्या गोष्टींचा तिच्यावर जसा परिणाम होतो तसाच त्या व्यक्तीच्या प्रत्येक क्षणाला केलेल्या कामामुळे ह्या गोष्टींवर परिणाम होऊ शकतो. मानवाने लोकसंख्येचा ८०० कोटींचा टप्पा पार करून पृथ्वीवर अधिराज्य स्थापन केले आहे. त्याच्या परीसंस्थेत कदाचित संख्येने त्याच्याहून कैकपट अधिक इतर प्राणी आणि वनस्पती तसेच सूक्ष्मजीव या जगात वावरतात. परंतु सजीवांच्या इतर सर्व प्रजाती आपण बरे आणि आपण आपले काम बरे या उक्तीनुसार सातत्याने आपला जीवनक्रम व्यतीत करतात. कोट्यवधी वर्षांपासून हा सिलसिला सुरू आहे, पण या प्रजातींची संख्या निसर्गाच्या नियंत्रणाच्या बाहेर कधी गेली, असे घडले नाही. मानवाच्या बाबतीत मात्र ते घडते आहे आणि ते आणखी कोणत्या पातळीवर जाईल याचा नक्की अंदाज अजूनही बांधता येत नाही. मानवी महत्त्वकांक्षा त्याला स्वस्थ बसू देत नाही, त्यामुळे नवनवीन क्षेत्रे शोधून आपले बस्तान बसवत असताना, तो निसर्गातील विविध संसाधने मुक्तपणे वापरतो, आणि त्यातून नको असलेल्या गोष्टी निर्माण होतात. त्या गोष्टींचे नेमके काय करायचे हा प्रश्न निर्माण होतो. १९५७ साली पहिली अंतराळमोहीम खूप गाजली, आणि अंतराळ क्षेत्रात माणसाने रस घ्यायला सुरुवात केली. आता मानवनिर्मित ८२६१ कृत्रिम उपग्रह पृथ्वीभोवती फिरत आहेत, त्यातील अडीच हजारांहून अधिक उपग्रह आता निकामी झाले आहेत! तिथेही प्रचंड प्रमाणात कचरा निर्माण झालेला आहे. म्हणजे गेल्या सात ते आठ दशकांमध्ये नैसर्गिक संसाधनांच्या एकूणच नैसर्गिक समतोलाबद्दल प्रश्न निर्माण झालेले आहेत.

संसाधनांची उपलब्धता, एकूण लोकसंख्या, प्रत्येक व्यक्तीची दैनंदिन गरज या तिन्हींचा ताळमेळ बसणे अतिशय महत्त्वाचे आहे. संसाधनांची उपलब्धता ही केवळ नैसर्गिक उपलब्धीवर अवलंबून नसून पुनर्चक्रांकन तेवढेच महत्त्वाचे आहे. प्रत्येकाला संसाधन आवश्यक असते, तर त्या संसाधनाच्या पुनर्चक्रांकनाची जबाबदारी ही प्रत्येकाचीच असते, हे नाकारता येणार नाही. आपण निसर्गाचे देणे लागतो, आणि बाळ जन्माला आल्यापासून ते देणे सुरू होते, ही संकल्पना समाजामध्ये रुजवणे अतिशय गरजेचे बनलेले आहे. आपण कोणाकडून कर्ज घेतले, तर त्या कर्जाची परतफेड आपणच करायची असते. यात काही वावगे नसेल, तर मग निसर्गाच्या कर्जाची फेड करण्यासाठी कोणाची कशाला वाट बघायची? लोक कर्जाची परतफेड करत नाहीत, तेव्हा बँका तुटीमध्ये जाऊन बंद पडतात. अशा बंद पडलेल्या बँकांमध्ये अनेक सरळमार्गी आणि सचोटीने बचत करणाऱ्या लोकांचेही पैसे असतात, तेपण बुडतात! म्हणजे कर्जबुडवे लोक हे स्वतःबरोबर इतरांनाही बुडवतात. निसर्गाची संसाधने योग्य मार्गाने परत करण्यासाठी पुनर्चक्रांकन समजावून घेऊन त्याची अंमलबजावणी करणे हे आपले माणूस म्हणून कर्तव्य आहे.

जन्माला आल्यापासून माणूस श्वास घेत असतो, तसेच त्याला रोजच्या जीवनात पाणी आणि अन्न या गोष्टी सतत पुरवाव्या लागतात. म्हणजे हवा आणि अन्नामधील विविध घटक या सर्वांचा नित्यपुरवठा त्याला आवश्यक असतो.

याशिवाय जीवनावश्यक गोष्टी म्हणजे अगदी दात घासायचा ब्रश, पेस्ट, तेल, कंगवा, साबण, कपडे, वाहन, इंधन, संगणक आणि फोन या वैयक्तिक गोष्टी लागतातच, तसेच घरामध्ये स्वयंपाकघरातील उपकरणे, भांडीकुंडी, दिवाणखान्यातील मनोरंजनाची साधने, बसण्यासाठी सोफा सेट किंवा खुर्च्या, झोपण्यासाठी पलंग, गाद्या, उश्या, पांघरूण याही गोष्टींची गरज असते. जर वैज्ञानिक भाषेत बघितले तर पदार्थसारणीमधील जवळजवळ सर्वच मूलद्रव्ये कोणत्या ना कोणत्या स्वरूपात आपल्या दैनंदिन जीवनात आपण वापरत असतो. कदाचित किरणोत्सारी मूलद्रव्य हे आपण रोजच्या जीवनात वापरत नसूही, पण कधी न कधी त्यांचा आणि आपला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध येतोच. या सर्व गोष्टी आपल्यापर्यंत येण्यासाठी पैशांची गरज असते. त्यामुळे दरमहा किंवा दरदिवशी आपल्याला काही ठरावीक खर्च येतो. घरातील कमावती माणसे पैसे मिळवत असतात, आणि त्या पैशांतून हे सर्व खर्च भागवले जातात. म्हणजे घराचे जे अंदाजपत्रक असते, ते किती पैसे मिळतात आणि गरजा किती आहेत यावर ठरत असते. त्यातून बचत करून येणाऱ्या काळासाठी आपल्या जीवनावश्यक गरजा सहजपणे भागवले जातील याचीही काळजी घ्यावी लागते. तसेच, भविष्यात आरोग्यसेवा लागल्या तर त्यांचीही तजवीज विमा किंवा तत्सम मार्गाने करून ठेवावी लागते. पण या ठिकाणी आपण हे गृहीत धरले आहे, की खिशात पैसे असतील तर या सर्व गोष्टी उपलब्ध असतील.

मात्र ते उपलब्ध होण्यासाठी आपण काय केले पाहिजे याचा विचार करणे गरजेचे आहे. आर्थिक बाजू पक्की पाहिजे म्हणजे बँकेतील शिल्लक ठरावीक प्रमाणात हवी आहे हे ओघाने आले. त्यासाठी वैयक्तिक घराचे अंदाजपत्रक किंवा देशाचे अंदाजपत्रक बनवतात. घराचे अंदाजपत्रक हे देशाच्या अंदाजपत्रकावरच अवलंबून असते. कदाचित सर्वसामान्य माणसाच्या मनात या गोष्टींची स्पष्टता नसते, आणि तशी गरजही कधी वाटत नाही, पण वैयक्तिक घराचे अंदाजपत्रक आणि निसर्गाचे अंदाजपत्रक यात मात्र समन्वय असणे गरजेचे असते, नेमके ते समजले तर निसर्गाशी समतोल साधणारी जीवनशैली स्वीकारणे सोपे जाते.

शरीराला दररोज लागणाऱ्या पोषणमूल्यांमध्ये वैविध्य असूनही मानवी शरीराच्या ऊर्जेच्या गरजा पूर्ण झाल्या पाहिजेत, ह्याकडे निसर्गाचे सातत्याने लक्ष असते. आपल्या वेगवेगळ्या पेशी प्रथिने, कर्बोदके आणि फॅटी आम्ल यासारख्या विविध पदार्थांचे म्हणजेच एक प्रकारच्या इंधनाचे रेणू वापरतात. हे समजण्यासाठी आपण मानवी शरीराचा निसर्गनिर्मित यंत्र म्हणून विचार करू शकतो. एखाद्या यंत्राकडून काम करून घ्यायचे असेल तर त्याला ज्या ऊर्जे ची गरज असते, ती देत राहिले की, ते यंत्र काम करत राहते. प्रत्येक पेशीला सतत आणि कधी कधी चक्रीयपणे इंधनाचा प्रकार बदलावा लागतो. हे काम ऊर्जापरिवर्तन आणि वापर नियंत्रित करण्यासाठी अनेक नियामक यंत्रणांद्वारेच साध्य केले जाते. शिवाय, आपण विविध शारीरिक परिस्थितींचा विचार करतो तेव्हा सेल्युलर अनुकूलन अधिक महत्त्वपूर्ण बनते. उदाहरणार्थ, रात्री आपण सहसा खात नाही, तो एक प्रकारचा उपवास असतो. नाश्त्याने तो उपवास आपण सोडतो आणि इतर वेळी आपण फक्त विश्रांती घेत असतो किंवा व्यायाम करत असतो. या परिस्थितींमध्ये, पेशींसाठी उपलब्ध पोषक घटकांचे प्रकार आणि प्रमाण बदलत असतात. बहुतेक प्राण्यांच्या पेशींमध्ये, एडिनोसिन ट्रायफॉस्फेट (एटीपी) हा ऊर्जारेणू रासायनिक ऊर्जेचे मुख्य वाहक म्हणून कार्य करतो. सर्वसाधारणपणे, एटीपी रेणूंचे संश्लेषण करण्यासाठी लागणारी रासायनिक ऊर्जा क्लिष्ट अशा इंधनरेणूंमधून मिळणे आवश्यक आहे. एटीपी संश्लेषण चालवण्यासाठी आवश्यक ऊर्जा मिळवण्यासाठी मानवी शरीर तीन प्रकारचे रेणू वापरते: फॅटी आम्ले, प्रथिने आणि कर्बोदके. पेशींमधील माइटोकॉन्ड्रिया हे सस्तन प्राण्यांमध्ये एटीपी संश्लेषणाचे मुख्य ठिकाण आहे, लिपिड्स फॅटी आम्लांमध्ये, प्रथिने अमीनो आम्लांमध्ये आणि कार्बो हायड्रेट्स ग्लुकोजमध्ये विघटित होतात. ऑक्सिडेशन-रिडक्शन प्रतिक्रियांच्या मालिकेद्वारे, मायटोकॉन्ड्रिया फॅटी आम्ले, अमि नो ॲसिड आणि पायरुवेट (साइटोप्लाझममधील ग्लुकोजच्या ऱ्हासाचे अंतिम उत्पादन) अनेक मध्यवर्ती संयुगे, तसेच कमी झालेल्या इलेक्ट्रॉनवाहक कोएन्झाइम्स NDH आणि FDH2 मध्ये बदलतात. मध्यवर्ती ट्रायकार्बोक्झिलिक ॲसिडच्या (TC) चक्रात प्रवेश करतात, ज्यामुळे NDH आणि FDH2 देखील वाढतात. हे कमी झालेले इलेक्ट्रॉनवाहक ऑक्सिजन आणि एटीपी संश्लेषणाच्या एकाच वेळी वापरासह, इलेक्ट्रॉन-वाहतूक साखळीद्वारे ऑक्सिडाइज केले जातात. या प्रक्रियेला ऑक्सिडेटिव्ह फॉस्फोरिलेशन म्हणतात. फॅटी आम्लाच्या एका रेणूच्या संपूर्ण ऑक्सिडेशनमधून शंभरहून अधिक एटीपी रेणूंचे संश्लेषण केले जाते आणि जवळजवळ चाळीस एटीपी रेणू अमीनो ॲसिड आणि पायरुवेट ऑक्सिडेशनमुळे तयार होतात. दोन एटीपी रेणू सायटोप्लाझममध्ये ग्लुकोज रेणूंचे पायरुवेटमध्ये रूपांतर करून संश्लेषित केले जातात. या रेणूंच्या ऑक्सिडेशनसाठी आवश्यक असलेली विकर (एंझाइम) आणि भौतिक वातावरण दोन्ही मायटोकॉन्ड्रियामध्ये असतात.

बहुतेक पेशी एटीपी संश्लेषणासाठी ग्लुकोज वापरतात, परंतु शरीराचा जैवरासायनिक समतोल (होमिओस्टॅसिस) राखण्यासाठी तितकेच महत्त्वाचे इतर इंधनरेणू असतात. फॅटी आम्ले, अमिनो आम्ले आणि ग्लुकोजचे ऑक्सिडेशन मार्ग वेगळ्या पद्धतीने सुरू होतात, तरी ही यंत्रणा शेवटी

मायटोकॉन्ड्रियामध्ये उद्‌भवणाऱ्या सामान्य मार्ग, ट्राय कार्बोक्सिलिक अम्लीय चक्रावर एकत्रित होतात. आधी सांगितल्याप्रमाणे, लिपिड ऑक्सिडेशनमधून मिळणारी एटीपी ऊर्जा ही कार्बोहायड्रेट्स आणि अमिनो आम्लांपासून मिळणाऱ्या ऊर्जेपेक्षा दुप्पट आहे. मग सर्व पेशी फक्त लिपिड्स इंधन म्हणून का वापरत नाहीत? खरे तर, अनेक वेगवेगळया पेशी एटीपी उत्पादनासाठी फॅटी आम्लांचे ऑक्सिडायझेशन करतात. जेवणादरम्यान, हृदयाच्या स्नायूंच्या पेशी त्यांच्या एटीपी मागणीपैकी ९०% फॅटी आम्लांचे ऑक्सिडायझेशन करून पूर्ण करतात. हे प्रमाण पौष्टिक स्थिती आणि आकुंचनांच्या तीव्रतेनुसार सुमारे ६०% पर्यंत घसरत असले, तरी फॅटी आम्ल हे हृदयाच्या स्नायूद्वारे वापरले जाणारे प्रमुख इंधन मानले जाऊ शकते. कंकाल स्नायू पेशी देखील लिपिडचे ऑक्सिडायझेशन करतात. विश्रांती आणि सौम्य-तीव्रतेच्या व्यायामादरम्यान कंकाल (हाडांचा सांगाडा) स्नायूंमध्ये फॅटी ॲसिड हे उर्जेचे मुख्य स्रोत आहेत. व्यायाम ाची तीव्रता जसजशी वाढते तसतसे ग्लुकोजचे ऑक्सिडेशन फॅटी आम्ल ऑक्सिडेशनला मागे टाकते. स्नायूंच्या निवडीच्या सब्सट्रेटवर परिणाम करणारे इतर दुय्यम घटकांमध्ये व्यायामाचा कालावधी, लिंग आणि प्रशिक्षण स्थिती यांचा समावेश होतो. फॅटी आम्लाचा जास्त प्रमाणात वापर करणारी दुसरी ऊतक म्हणजे ॲडिपोज टिश्यू. ॲडिपोज टिश्यू हे शरीरातील चरबीचे भांडार असल्याने, उपवासाच्या वेळी, ॲडिपोज टिश्यू पेशींसाठी फॅटी ॲसिडचा स्रोत हा त्यांचा स्वतःचा साठा आहे असा निष्कर्ष काढू शकतो. कंकाल स्नायू आणि ॲडिपोज टिश्यू पेशी देखील ग्लुकोजचा वापर लक्षणीय प्रमाणात करतात, परंतु केवळ शोषक टप्प्यावर - म्हणजे, नियमित जेवणानंतर. इतर अवयव जे प्रामुख्याने फॅटी ॲसिड ऑक्सिडेशन वापरतात ते मूत्रपिंड आणि यकृत आहेत. मूत्रपिंडाच्या कॉर्टेक्स पेशींना सतत रक्त गाळण्यासाठी ऊर्जेचा सतत पुरवठा आवश्यक असतो आणि त्याचप्रमाणे यकृताला त्याची महत्त्वपूर्ण बायोसिंथेटिक कार्ये पूर्ण करण्यासाठी आवश्यक असते. इंधन म्हणून त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असूनही, फॅटी ॲसिडचे ऑक्सिडायझेशन केवळ मायटोकॉन्ड्रियामध्ये होते. परंतु सर्व मानवी पेशींमध्ये मायटोकॉन्ड्रिया नसते! ते विचित्र वाटत असले तरी, मानवी लाल रक्तपेशी या माइटोकॉन्ड्रिया नसलेल्या सर्वात सामान्य पेशी आहेत. इतर उदाहरणांमध्ये डोळयांच्या उतींचा समावेश होतो, जसे की लेन्स, जे जवळजवळ पूर्णपणे मायटोकॉन्ड्रियापासून रहित असते; आणि रेटिनाचा बाह्य भाग, ज्यामध्ये प्रकाशसंवेदनशील रंगद्रव्य असते. तुम्ही आधीच अंदाज लावला असेल की या पेशी आणि उतींनी फक्त ग्लुकोजचे चयापचय करून एटीपी तयार करणे आवश्यक आहे. या परिस्थितीमध्ये, ग्लुकोजचे पायरुवेटमध्ये अवनत होते, जे नंतर लगेचच लॅक्टेटमध्ये रूपांतरित होते. या प्रक्रियेला लॅक्टिक ॲसिड किण्वन म्हणतात. चयापचयदृष्ट्या अत्यंत सक्रिय नसले तरी, लाल रक्तपेशी मुबलक प्रमाणात असतात, परिणामी रक्तप्रवाहातून ग्लुकोजचे रेणू सतत घेतात. याव्यतिरिक्त, अशा पेशी आहेत ज्यांना मायटोकॉन्ड्रिया असूनही, एटीपी उत्पादनासाठी जवळजवळ केवळ लॅक्टिक ॲसिड किण्वनावर अवलंबून असतात. हे रीनल मेडुला पेशींसाठी आहे, ज्यांचा ऑक्सिजनयुक्त रक्तपुरवठा ऑक्सिडेटिव्ह फॉस्फोरिलेशन पूर्ण करण्यासाठी पुरेसा नाही. पेशीकार्य आणि जैवरासायनिक संदर्भानुसार इंधनरेणूचा प्रकार बदलतो.

हे शारीरिक यंत्र अतिशय कार्यक्षमतेने विनातक्रार २४ गुणिले ७ असे आयुष्यभर सुरू असते. त्यात खंड पडत नाही. झोपेतही अनेक गोष्टी चालू असतात. त्यामुळे आपण व्यवस्थित जगू शकतो, विचार करू शकतो, शिकू शकतो, आणि जीवनाचा आनंद घेऊ शकतो. त्याचबरोबर असेही लक्षात घ्यायला हवे की निसर्ग या यंत्रामध्ये सहसा बिघाड होऊ देत नाही, त्यासाठी त्याची जी सातत्याने देखभाल करावी लागते ती करण्याची जबाबदारी आपली असते. तक्ता क्रमांक एकमध्ये प्रौढ माणसाच्या शरीराला रोज लागणारे अन्न, पाणी आणि हवेची गरज किती असते याचा अंदाज दिला आहे. साधारण साडेचारशे ते पाचशे ग्रॅम अन्न ही माणसाची रोजची गरज असते. पण हे अर्धा किलो अन्न त्याला देण्यासाठी निसर्गाला साधारण दहा पट संसाधनांचे भागभांडवल शेतीच्या माध्यमातून पुरवावे लागते. त्याशिवाय शरीर जे २०० ग्रॅम विष्ठेचे उत्सर्जन आणि २-२.५ लिटर मूत्रविसर्जन करते, त्यातील विषारी पदार्थांचे विघटन घडवून आणून त्यातील नैसर्गिक घटक पुन्हा जैवरासायनिक चक्रात जाणे महत्त्वाचे असते आणि शेतीच्या माध्यमातून आलेल्या ४-४.५ किलो अपशिष्टांचे विघटन करून पुन्हा शेतीला किंवा वनस्पतींना उपलब्ध करून द्यावी लागतात. हा हिशेब फक्त एक किंवा दोन माणसांसाठी असता तर निसर्गाला काही फरक पडला नसता! पण जेव्हा ८०० कोटींपेक्षा अधिक लोकांचा प्रश्न येतो, त्यावेळी जो नैसर्गिक संसाधनांचा जमाखर्च असतो, त्याचे अंदाजपत्रक निसर्गाला बनवावे लागते या अंदाजपत्रकात पुनर्चक्रांकन हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे आणि म्हणूनच या निसर्गसंपत्तीचे व्यवस्थित आकलन करून घेऊन, मग त्यातील अपेक्षित अपशिष्टांचे नियोजन करताना, वैयक्तिक जबाबदारी किती महत्त्वाची आहे हे लक्षात येते.

| | | |
|---|---|---|
| १ | प्रथिने | ५० ग्रॅम |
| २ | फॅट | ७८ ग्रॅम |
| ३ | कर्बोदके | २७५ ग्रॅम |
| ४ | खाद्य धागे (डाएटरी फायबर्स) | २८ ग्रॅम |
| ५ | व्हिटॅमिन सी | ९० मिलीग्रॅम |
| ६ | व्हिटॅमिन डी | २० मायक्रोग्रॅम |
| ७ | व्हिटॅमिन के | १२० मायक्रोग्रॅम |
| ८ | बायोटिन | ३० मायक्रोग्रॅम |
| ९ | फॉलिक आम्ल | ४०० मायक्रोग्रॅम |
| १० | नायसीन | १६ मिलीग्रॅम |
| ११ | पॅन्टोथेनिक आम्ल | ५ मिलीग्रॅम |
| १२ | रायबोफ्लेविन | १.३ मिलीग्रॅम |
| १३ | थायमिन | १.२ मिलीग्रॅम |
| १४ | व्हिटॅमिन ए | ९०० मायक्रोग्रॅम |
| १५ | व्हिटॅमिन बी ६ | १.७ मिलीग्रॅम |
| १६ | व्हिटॅमिन बी १२ | २.४ मायक्रो ग्रॅम |
| १७ | व्हिटॅमिन इ | १५ मिलीग्रॅम |
| १८ | मॅग्नेशियम | ४२० मिलीग्रॅम |
| १९ | मॅंगेनिज | २.३ मिलीग्रॅम |
| २० | फॉस्फरस | १.२५ ग्रॅम |
| २१ | पोटॅशियम | ४.७ ग्रॅम |
| २२ | कॅल्शियम | १.३ ग्रॅम |
| २३ | क्रोमियम | ३५ मायक्रोग्रॅम |
| २४ | तांबे | ०.९ मिलीग्रॅम |
| २५ | मॉलिब्डेनम | ४५ मायक्रोग्रॅम |
| २६ | सेलेनियम | ५५ मायक्रोग्रॅम |
| २७ | सोडियम | २.३ ग्रॅम |
| २८ | झिंक | ११ मिलीग्रॅम |
| २९ | लोखंड | १६ मिलीग्रॅम |
| ३० | क्लोराईड | २.३ ग्रॅम |
| ३१ | आयोडीन | १५० मायक्रोग्रॅम |
| ३२ | कोलेस्टेरॉल | ३०० मिली ग्रॅम |
| ३३ | साखर | ५० ग्रॅम |
| ३४ | कोलीन | ५५० मिलीग्रॅम |
| ३५ | संपृक्त फॅटी आम्ले | २० ग्रॅम |
| ३६ | पाणी | ३-३.५ लिटर |
| ३७ | ऑक्सिजन | २.८ किलोग्रॅम |
| ३८ | नायट्रोजन | ५ किलोग्रॅम |

सोबतचा तक्ता – प्रौढ माणसाच्या शरीराला लागणाऱ्या अन्न, पाणी आणि हवेची रोजची गरज–

निसर्गचक्राचा समतोल राखण्यासाठी ह्या अंदाजपत्रक–विषयी माहिती प्रत्येकाला असायला हवी. निसर्गाच्या अंदाजपत्रकात सर्वच गोष्टी खूप मोठ्या प्रमाणावर लागत असतात. त्यामुळे दिसायला ते अवाढव्य दिसते. क्विंटल किंवा टनाच्या भाषेत बोलायचे तर छाती दडपून जाईल इतके मोठे आकडे त्यात असतात. कोट्यवधी टन अन्नाची निर्मिती होत असते, आणि त्यामध्ये कोट्यवधी टन अपशिष्टही निर्माण होत असते. परंतु माणसाने वैयक्तिक गरजांचा विचार केला, आणि वैयक्तिक पातळीवरच नियोजनाचा विचार केला, तर मग हे अंदाजपत्रक निसर्गाला नक्कीच सहजपणे हाताळता येईल. हे करता येणे अशक्य वाटत असले, तरी वाटते तेवढे अशक्य नाही. त्यासाठी मानसिकता बदलणे आणि समाजाला त्या दिशेने अभिमुख करणे या दोन बाबींचे अतिशय महत्त्व आहे. हे खूप मोठे आव्हान आहे हे खरे, कारण 'मी आणि माझे' या विचारांमध्ये गुरफटलेल्या समाजाला त्यातून बाहेर काढणे तितके सोपे नाही.

**– शरद काळे**

sharadkale@gmail.com

॥ग्रंथाली॥



वारीत होतो चाललो
चित्रपंढरीच्या
आणि कळाले,
पुढे
कवितेचा गाव आहे
रंगत होत्या इथे
मैफिली छोट्या–भल्यांच्या
आणि कळाले,
थोडा
आपल्यालाही वाव आहे
**– हेमंत जोशी**

**शब्दरंग**

**हेमंत जोशी**

**मूल्य २०० रुपये**
**सवलतीत १२० रुपये**



# तोचि धोका ओळखावा, मृत्यू तेथेची जाणावा

**अपर्णा पाटील**


‘**यंदा** पावसाळ्यात पिकनिकला जरा हटके ठिकाणी जाऊ या. नेहमीचं ठिकाण नको. पावसाळ्यात रिव्हर राफ्टिंग किंवा साहसी पर्यटन करू’, असा संवाद हमखास कानी पडला असेल. फिरायला जायचं तर समुद्रकिनारे, डोंगरदऱ्या अशी ठिकाणं आता फारशी उत्सुकता वाटावी, अशा राहिलेली नाहीत. ज्यांना फिरायची आवड आहे, त्यांना कृषिपर्यटन किंवा ट्रेकिंग यापेक्षा ‘डार्क टूरिझम’ आकर्षक वाटू लागलं आहे.

जगभरातील पर्यटक हिल स्टेशन, रोमँटिक स्थळं किंवा समुद्रकिनारी फिरायला जाण्यापेक्षा ‘डार्क टूरिझम’ला प्राधान्य देत आहेत. ‘न्यू यॉर्क टाइम्स’च्या अहवालानुसार, ८० टक्के अमेरिकन लोकांना ‘डार्क डेस्टिनेशन’ला फिरायला जायचं आहे. आता डार्क टूरिझम म्हणजे काय तर, ज्या भागात दुर्घटना घडल्या आहेत, ज्या जागा आता निर्जन झालेल्या आहेत, अशा ठिकाणांना भेट देणं. हे काम पूर्वी संशोधक करत. एखादी मोठी दुर्घटना किंवा आपत्ती घडून गेल्यानंतर तिथली परिस्थिती काय आहे, दुर्घटनेचं मूळ काय आणि अशा ठिकाणी काय धोके आहेत, याचा अभ्यास या संशोधकांकडून केला जायचा. त्याला अभ्याससफर म्हटलं जायचं. आता मात्र अशा स्थळांना पर्यटक म्हणून भेट देण्याचा कल वाढलेला आहे.

लोकप्रिय पर्यटनस्थळांवर वाढलेली गर्दी आणि पर्यटन-उद्योगाला चालना देण्यासाठी, या नव्या शक्यतांचा शोध घेतला जात आहे. पर्यटकही त्याला प्रतिसाद देत आहेत. त्यातून समुद्राच्या तळाशी किंवा अवकाशात, अगदी परग्रहांवर सफर करण्याविषयीच्या मोहिमांविषयी उत्सुकता वाढवली जात आहे. त्यामुळेच डार्क टूरिझम किंवा ब्लॅक टूरिझम हा नवा पर्यटन प्रकार गेल्या वीसेक वर्षांत अधिक लोकप्रिय होत चालला आहे. मृत्यू आणि शोकांतिकेशी जोडल्या गेलेल्या ऐतिहासिक स्थळांना अधिकाधिक संख्येनं भेट दिली जात आहे. अनेकदा अशा ठिकाणी पोहोचल्यावर तिथे फोटो काढणं, ब्लॉग, फेसबुक लाइव्ह करणं, एवढंच पर्यटक करत असतात. त्या ठिकाणी असलेल्या धोक्यांकडे मात्र सर्रास काणाडोळा केला जातो. त्यातूनही एखादी दुर्घटना घडल्याची कित्येक उदाहरणं आहेत. हीदेखील एक नवी शोकांतिका होऊ लागली आहे.

तणाव, दु:ख, वेदना आणि जनसंहाराच्या कथा सांगणाऱ्या ठिकाणांना डार्क साइट म्हणतात आणि त्या ठिकाणांसाठी सफर आयोजित करण्यास डार्क टूरिझम म्हणतात. या व्याख्येवरून थेट मृत्यू आणि शोकांतिकेशी संबंधित ठिकाणांच्या प्रवासाचा समावेश असलेलं पर्यटन असंच याचं वर्णन करता येईल. एका खासगी संकेतस्थळाच्या सर्वेक्षणानुसार, ३० टक्के अमेरिकन नागरिकांना एकदा तरी युक्रेनला जायचं आहे. सध्या त्या ठिकाणी सुरू असलेलं युद्ध थांबण्याची ते वाट पाहत आहेत. युद्धामुळे झालेली पडझड कशी असते, हे ‘याचि देही याचि डोळा’ त्यांना पाहायचं आहे. काही आंतरराष्ट्रीय टूर ऑपरेटरांनीही तसं नियोजन केल्याचंही आपण सहज वेबसाइटवरील माहिती पडताळून पाहिल्यास दिसून येतं.

ज्या ठिकाणी जनसंहार झाला आहे, अशी ठिकाणं पाहण्यासाठी जाणारे पर्यटक हे चित्र आता सर्रास दिसत आहे. बोस्टन, पोलंडमधील नाझी छळछावण्या, जपानचे आत्मघातासाठी कुप्रसिद्ध असलेलं जंगल, पाब्लो एक्सोबार या ड्रग्जमाफियाला ठेवलेला कोलंबियातील तुरुंग अशा ठिकाणी जायला पर्यटक उत्सुक आहेत. डार्क टूरिझमच्या लोकप्रिय स्थळांमध्ये स्कॉटलंडमधील युद्धभूमी कोलोडन आणि ड्रॅक्युला कॅसल नावानं ओळखले जाणारे रोमानियातील ब्रॅनकॅसल आणि पोएनारी कॅसल यांसारखे किल्ले यांचा समावेश आहे. वेल्समधील अँग्लेसी येथील ब्युमारिस तुरुंग आणि जपानमधील हिरोशिमा पीस मेमोरियल पार्क, युक्रेनमधील चेर्नोबिल आणि ११ सप्टेंबर २००१ नंतर एक वर्षानंतर उभारलेले न्यू यॉर्कमधील ग्राउंड झीरो स्मारक अशा नैसर्गिक आपत्ती किंवा मानवनिर्मित आपत्तींची ठिकाणंही या पर्यटनात लोकप्रिय आहेत. पोलंडमधील ऑशवित्झ



टायटॅनिक जहाज

छळछावणी, चीनमधील नानजिंग जनसंहार मेमोरियल हॉल अशा मानवी अत्याचार, हत्या आणि जनसंहाराच्या ठिकाणांचाही समावेश आहे.

बालीमध्ये तर मृत्यू आणि अंत्यसंस्काराची ठिकाणं चक्क पर्यटनासाठी खुली झाली आहेत. तिथे एखाद्याचा मृत्यू झाल्याचं समजताच टूरिस्ट व्हॅनची व्यवस्था करण्यात येते आणि अंत्यसंस्काराच्या उपस्थितीसाठी तिकिटं विकायला सुरुवात केली जाते. अशाच डार्क टूरिझमचं सगळ्यात आवडतं ठिकाण ठरलंय ते टायटॅनिक जहाज बुडलेली जागा. या जागेवर पोहोचणं सर्वसामान्य माणसांनाच काय तर संशोधकांना अवघड आहे. मात्र या ठिकाणाला भेट देण्याचा पर्यटन व्यवसाय सुरू झाला आहे आणि अशाच पर्यटनामुळे मागच्या महिन्यात पाच जणांना आपला जीव गमवावा लागला आहे.

टायटॅनिक हे एक ब्रिटिश जहाज होतं. शंभरहून अधिक वर्षांपूर्वी बांधणी केलेलं हे जहाज त्या काळी अत्यंत उंची आणि भव्य अशा पद्धतीनं उभारलं होतं. ब्रिटनमधील साउथहॅम्प्टन ते न्यू यॉर्क या पहिल्या सफरीची सुरुवात १० एप्रिल, १९१२ या दिवशी झाली. चार




टायटन पाणबुडी


ग्रंथाली

## शिल्पा जितेंद्र खेर यांची दोन पुस्तक


**शिवाची शक्ती**
**भाग २**




**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

पोलीसपत्नींच्या जीवनावर आधारित या दहा कथा आपल्यासमोर मांडण्याच्या अभूतपूर्व कल्पनेबद्दल मी शिल्पा खेर यांना मनापासून शुभेच्छा देते. पोलीस अनेकदा उपाशीपोटी कित्येक तास कार्यरत असताना त्यांची मुले, पत्नी हेदेखील घरी त्यांची वाट पाहत असतात. या कौटुंबिक दृष्टिकोनातून समाजाने त्यांचे जीवन जाणणे आवश्यक आहे.

**– डॉ. मीरा चड्डा बोरवणकर**
IPS, Director General of Police (Retd.)





**योगः कर्मसु कौशलम्**

**मूल्य ३५० रुपये**
**सवलतीत २१० रुपये**

हजारो वर्षांपासून आपल्या ऋषीमुनींनी स्वानुभवातून प्राप्त केलेल्या तत्त्वप्रणालीद्वारे जो गहन उपदेश जगासमोर ठेवला तो उपदेश साध्या सरळ शब्दात परंतु त्याच्या शुद्धतेला बाधा न आणता शिल्पा खेर यांनी या पुस्तकाद्वारे वाचकांसमोर मांडला आहे.

**– जस्टीस बी. एन. श्रीकृष्ण**
(माजी न्यायमूर्ती, सुप्रीम कोर्ट)



**टायटॅनिक जहाजाचे अवशेष**

दिवसांनी म्हणजेच १४ एप्रिलला अटलांटिक महासागरात एका हिमनगाला धडकून हे विशाल जहाज कलंडलं. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जहाजावरील प्रवाशांना वाचवण्यासाठी मदतकार्य राबवलं गेलं. तरीही या दुर्घटनेत जहाजावरील सुमारे २२२४ पैकी जवळपास दीड हजार जणांचा मृत्यू झाला. सातशे जणांना वाचवलं गेलं. हे जहाज बुडल्यानंतर इतक्या मोठ्या जहाजावर प्रवाशांना वाचवण्यासाठी पुरेशा सुविधा नसल्याची चर्चा झाली होती. त्याच जहाजाचे अवशेष पाहायला गेलेल्या पाच जणांच्या मृत्यूनंतरही हीच बाब समोर आली आहे.

टायटॅनिक दुर्घटना ही आधुनिक जगातील सगळ्यात मोठी शोकांतिका ठरली. त्यामुळेच जगभरात टायटॅनिक हा विषय चर्चेचा विषय ठरला. टायटॅनिक दुर्घटनेवर बरेच चित्रपट आले. मात्र दिग्दर्शक जेम्स कॅमेरून यांच्या १९९७मध्ये आलेल्या 'टायटॅनिक' चित्रपटानं टायटॅनिकविषयीची उत्सुकता प्रचंड वाढली. या सिनेमाच्या निमित्ताने कॅमेरून यांनी प्रथमच प्रत्यक्ष हे जहाज बुडलं होतं, तिथे जाऊन चित्रीकरण केलं. या चित्रीकरणाच्यावेळी कॅमेरून यांच्याही जिवावर बेतलं होतं. तिथे जाऊन चित्रीकरण करण्याचा प्रयत्न अत्यंत धोक्याचा ठरला होता. कॅमेरून यांनी या ठिकाणी केलेल्या चित्रीकरणाचा भाग आपण या लोकप्रिय चित्रपटात पाहू शकतो. 'टायटॅनिक' चित्रपट सुपरहिट ठरला आणि 'टायटॅनिक' जहाजाच्या अवशेष असलेल्या ठिकाणाचा पर्यटनाचं ठिकाण बनवण्याची नवी शक्यता निर्माण झाली. खरं तर टायटॅनिक जहाजाच्या अवशेषाचा अभ्यास करण्यासाठी अॅटलांटिक महासागरात अनेक अभ्यासमोहिमा आधीपासून सुरू होत्या, पण हौशी पर्यटकांना तिथे नेणं हे प्रवाशांचा जीव धोक्यात घालणारं होतं.

वॉशिंग्टनमधील एव्हरेट येथील 'ओशनगेट एक्स्पिडिशन्स' कंपनी ही पाणबुडी चालवते. या कंपनीनं २०२१मध्ये टायटॅनिकचे अवशेष पाहण्यासाठी पर्यटनफेरीचं आयोजन सुरू केलं. याच कंपनीच्या 'टायटन' या पाणबुडीतून चालकासह चार पर्यटकांनी रविवार, १८ जून रोजी अटलांटिक महासागरात सफरीला सुरुवात केली. ओशियनगेट कंपनीची ही तिसरीच टायटॅनिक सफर होती. टायटन पाणबुडीत दुबईस्थित ब्रिटिश अब्जाधीश हमीश हार्डिंग, पाकिस्तानी उद्योगपती शहजादा दाउद, त्यांचा एकोणीस वर्षांचा मुलगा सुलेमान, पॉल-हेन्री नार्जियोलेट आणि ओशनगेट कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी स्टॉकटन रश यांचा समावेश होता.

'टायटॅनिक'चे अवशेष समुद्रात सुमारे ३ हजार ८०० मीटर खोल आहेत. कॅनडातील न्यू फाऊंडलँडमधील सेंट जॉन्सपासून हे ठिकाण सातशे किलोमीटर अंतरावर आहेत. हे अवशेष प्रत्यक्ष पाहण्यासाठी या पर्यटकांनी जवळपास अडीच लाख डॉलर (सुमारे दोन कोटी रुपये) मोजले होते. मात्र यंदा न्यू फाऊंडलँडमध्ये गेल्या चाळीस वर्षांतील सर्वांत भीषण थंडी असल्याने ही सफर आव्हानात्मक ठरणार, याचा आधीपासूनच अंदाज होता. विशेष म्हणजे यंदाच्या या सफरीची समाजम ाध्यमांवर बरीच चर्चा सुरू होती. पाणबुडी समुद्रात उतरल्यानंतर चारच दिवसांत टायटॅनिकच्या अवशेषांजवळ ही पाणबुडी भग्न होऊन सर्वांचा मृत्यू झाल्याचं स्पष्ट झालं.

टायटन पाणबुडीच्या सुरक्षिततेबाबत समस्या असल्याचा इशारा यापूर्वी देण्यात आल्याचं कागदपत्रांवरून समोर आलं आहे. खुद्द 'ओशनगेट'चे संचालक डेव्हिड लॉचरिज यांनी २०१८मध्ये या पाणबुडीच्या आणखी चाचण्यांची गरज असल्याचं म्हटलं होतं. पाणबुडी समुद्रात अती खोलवर गेल्यास



**टायटन पाणबुडीवर पर्यटक**



न्यूझीलंडमधील ज्वालामुखीला भेट देणारे पर्यटक

संकट ओढवल्यास काय करावं, हे सांगितलं जातं, पण ज्वालामुखी फुटल्यास त्याचे परिणाम काय होतील, याचा साधा अंदाज पर्यटकांना दिलेला नसतो. ९ डिसेंबर, २०१९ रोजी या बेटावर पर्यटक असताना ज्वालामुखीचा स्फोट झाला. या दुर्घटनेत २२ जणांचा बळी गेला होता. जे जिवंत राहिलेत त्यांचे अवयव पोळलेत. लाखो डॉलर खर्च करून त्यांच्यावर शस्त्रक्रिया कराव्या लागल्या आहेत. अनेकाचे चेहरे, त्वचा विद्रूप झालेत. रोरी केनेडी यांनी 'द व्होल्कॅनो : द रेस्क्यू फ्रॉम वकारी' या माहितीपटातून या दुर्घटनेचं थरकाप करणारं चित्र मांडलंय. या माहितीपटात निसर्गाला



न्यूझीलंडमधील व्हाइट आयलंड

प्रवाशांना धोका निर्माण होऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिलेला होता. परंतु ही माहिती जाहीर केल्याबद्दल लॉचरिज यांच्यावरच 'ओशनगेट'नं सिटल न्यायालयात खटला दाखल केला होता. टायटनविषयीची माहिती उघड करून कराराचा भंग केल्याबद्दल लॉचरिज यांनाच कंपनीतून बेदखल केलं होतं.

पाणबुडीतल्या पर्यटकांचा मृत्यू कसा झाला, याचे रोज नवे खुलासे वर्तमानपत्रांतून समोर येत राहतील, पण केवळ आव्हानात्मक सफर करण्याच्या औत्सुक्यानं स्वत:चा जीव धोक्यात घालणं योग्य आहे का, याचा विचार होईल का असा प्रश्न आहे. तर त्याचं उत्तर नाही, असंच असेल. कारण अशीच एक दुर्घटना न्यूझीलंडमध्ये घडली होती.

न्यूझीलंडमधील 'व्हाईट आयलंड' हे बेट पर्यटकांसाठी आव्हानात्मक ठिकाण मानलं जातं. या बेटावर जगातील सर्वात मोठा सक्रिय ज्वालामुखी आहे. १९७५ ते १९२० या कालावधीत नियमित या बेटावर ज्वालामुखीचा उद्रेक होत असतो. या बेटाचं आणखी एक नाव आहे 'पुइया ओ वकारी', ज्याला 'नाट्यमय ज्वालामुखी' असं म्हटलं जातं. या बेटावर कोणत्याही क्षणी ज्वालामुखी उफाळण्याची लक्षात घेऊनही त्यांच्या अगदी काही मीटरच्या अंतरापर्यंत पर्यटकांना नेलं जातं.

या बेटावर रोज किमान शंभर पर्यटक प्रत्यक्ष ज्वालामुखी असलेल्या ठिकाणी जातात. त्यासाठी दिवसातून फक्त दोन बेटी आहेत. त्यांच्यासोबत दोन स्थानिक मार्गदर्शक असतात. तेच लाइफगार्डही असतात. बेटावर नेमका ज्वालामुखीचा उद्रेक कधी होईल, याची माहिती देणारी यंत्रणा या बेटापासून दीड तासांच्या अंतरावरील गावात आहे. त्यांची माहिती अचूक असेल याची खात्रीही नसते. त्याहीपेक्षा जास्त हजारो डॉलर खर्च करून ज्वालामुखी पाहायला जाणाऱ्या पर्यटकांना त्यांच्या सुरक्षेसाठी काय उपाय आहेत, याची माहिती दिली जात नाही किंवा तेही त्याबद्दल बेफिकीरच असतात.

पर्यटकांना दिल्या जाणाऱ्या एका फॉर्मवर बेटावर काही कधीही गृहीत धरू नका, असा इशारा दिलाय. परंतु ही घटना घडून गेल्यानंतरही इथले पर्यटन थांबलेलं नाही. या घटनेची चौकशी झाली का, सुरक्षेचे उपाय वाढवलेत का, याचं उत्तर पर्यटकही विचारात घेत नाहीत.

या घटनांच्या उदाहरणांवरून हे लक्षात येतं की टायटन पाणबुडीवरील घटना असो वा न्यूझीलंडमधला ज्वालामुखीचा उद्रेक असो, पर्यटन म्हणून हा व्यवसाय वाढीस लागला आहे. परंतू पर्यटकांच्या सुरक्षेचा काडीमात्र विचार केला गेला नाही. टायटनसारख्या पाणबुडीची रचना, त्यातील पर्यटकांच्या सोयी पाहिल्या असता, केवळ काही तासांचा ऑक्सिजनचा साठा घेऊन ही माणसं समुद्राच्या इतक्या खोलवर जायला कशी जायला तयार झाली? न्यूझीलंडच्या बेटावर विषारी वायूनं आपल्याला काही त्रास तर होणार नाही ना, असा विचार केला नसेल का? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. परंतु पर्यटनाच्या नावाखाली गब्बर झालेल्या या तथाकथित कंपन्यांना हा प्रश्न कोणी विचारेल अशी शक्यताही दिसत नाही. आधुनिक जगातील या नव्या शोकांतिका मात्र एक दुर्दैवी घटना म्हणून विस्मरणात जातील, याची शक्यता मात्र दाट आहे.

**– अपर्णा पाटील**

aparna.patil1@gmail.com



राजीव श्रीखंडे

# द प्रेसिडेंट - मिगेल अस्टुरिअस

## The President by Miguel Asturias

**नोबेल** पारितोषिकप्राप्त जगप्रसिद्ध ग्वाटेमालियन लेखक मिगेल अस्टुरिअसचा जन्म ग्वाटेमाला सिटी येथे १९ ऑक्टोबर १८९९ रोजी एका सुखवस्तू कुटुंबात झाला. मिगेलचे वडील वकील आणि न्यायाधीश होते तर आई एका शाळेत शिक्षिका होती. तो सहा वर्षांचा असताना त्याचे कुटुंब त्याच्या आजी-आजोबांकडे राहायला गेले आणि ऐषआरामात राहू लागले.

ते सुखवस्तू जीवनाचा आनंद घेत असले तरी मिगेलच्या वडिलांचा मॅन्युएल कॅबरेराच्या हुकूमशाही राजवटीला प्रखर विरोध होता. पुढे १९०४ मध्ये त्याच्या वडिलांनी काही विद्यार्थ्यांवर भरलेला खटला बरखास्त केला तेव्हा त्यांचा हुकूमशाहीशी प्रत्यक्ष संघर्ष सुरू झाला. त्यांचे न्यायमूर्तीपद रद्द करण्यात आले आणि त्यांना दुसऱ्या लहानशा गावात स्थलांतर करणे भाग पडले. इथेच ग्वाटेमालाच्या स्थानिक लोकांशी मिगेलची प्रथम ओळख झाली. त्याची दाई एक स्थानिक स्त्री होती आणि ती मिगेलला त्यांच्यातल्या प्रचलित अनेक दंतकथा सांगायची, ज्याचा पुढे मिगेलच्या साहित्यावर प्रभाव दिसतो. पुढे १९०८ मध्ये मिगेलचे कुटुंब परत ग्वाटेमाला सिटीच्या उपनगरात राहायला आले. तिथे त्याच्या वडिलांनी एक दुकान चालू केले. इथेच त्याच्या महाविद्यालयीन शिक्षणाला सुरुवात झाली. महाविद्यालयात असतानाच मिगेलने लेखनाला सुरुवात केली.

हुकूमशहा कॅबरेराच्या विरुद्ध १९२० मध्ये उठाव झाला, त्यात मिगेलने भाग घेतला. त्याने आणि त्याच्या वर्गमित्रांनी The Generation of Zo हा समूह स्थापन केला. पुढे १९२२ मध्ये मिगेल आणि त्याच्या काही मित्र-मैत्रिणींनी Popular University ची स्थापना केली. जिथे मध्यमवर्गीय लोक गरीब लोकांना मोफत शिक्षण देत होते. १९२३ मध्ये त्याने कायदयाची पदवी मिळवली. तो त्याच्या वर्गातला सर्वोत्तम विद्यार्थी ठरला आणि त्याच्या प्रबंधाला प्रतिष्ठेचे बक्षीसही मिळाले.

कायद्याची पदवी मिळाल्यानंतर मिगेल पॅरिसमध्ये राहायला लागला. तिथे त्याची अनेक मान्यवर चित्रकार, लेखक यांच्याशी ओळख झाली आणि त्यांचा त्याच्यावर विलक्षण प्रभाव पडला. तिथे त्याने एक नियतकालिकही New Times या नावाने प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. १९३० मध्ये त्याची पहिली कादंबरी Leyendas de Guatemala प्रसिद्ध झाली. १९३२ साली पॅरिसमधल्या दहा वर्षांच्या वास्तव्यानंतर मिगेल ग्वाटेमालाला परतला.

त्यानंतर मिगेलने जॅकोबो अरबेंझच्या सरकारला पाठिंबा दिला. त्याची राजदूत म्हणून नेमणूकही केली गेली. अरबेंझचे सरकार १९५४ पर्यंत टिकले. त्यानंतर पुढच्या सरकारने सत्तेवर आल्यावर मिगेलची देशातून हकालपट्टी केली. मिगेल मग ब्युनोस आयर्स आणि तिथून चिलीमध्ये राहायला गेला. त्यानंतर तो युरोपला गेला.

सन १९६६ मध्ये ग्वाटेमालात पुन्हा सत्ताबदल झाला आणि मिगेलला त्याच्या देशाचे नागरिकत्व परत मिळाले. त्याची मग फ्रान्सचा राजदूत म्हणून नेमणूक करण्यात आली. तो पॅरिसमध्ये १९५० पर्यंत राहिला.

मिगेल अस्टुरिअसने आपले शेवटचे दिवस माद्रिदमध्ये काढले आणि तिथेच त्याचे ९ जून १९७४ रोजी वयाच्या ७४व्या वर्षी निधन झाले. त्याचा दफनविधी त्याच्या आवडत्या शहरात म्हणजेच पॅरिसमध्ये करण्यात आला.

मिगेल अस्टुरिअसने Clemencia Amado हिच्याशी १९३९मध्ये विवाह केला. त्यांना दोन मुलगे झाले. त्याचा १९४७ मध्ये घटस्फोट झाला. त्याने १९५० मध्ये दुसरा विवाह केला. तो शेवटपर्यंत टिकला.

मिगेलने अनेक कादंबऱ्या लिहिल्या ज्या खूप गाजल्या. Legends of Guatemala नंतर त्याने The President ही कादंबरी लिहिली, जी १९४६ मध्ये प्रसिद्ध झाली. हुकूमशाही राजवटीचे चित्रण करणारी ही जगातील पहिलीच कादंबरी म्हणून तिची प्रशंसाही झाली. त्यानंतर त्याची Men of Maize ही कादंबरी १९४९ मध्ये प्रसिद्ध झाली. ही मिगेलची फारच महत्त्वाकांक्षी कादंबरी आहे, पण कळायला अवघड आहे. त्यानंतर मिगेलने त्याची प्रसिद्ध Banana Trilogy लिहिली. Strong Wind ही १९५० साली, The Green Pope ही १९५४ साली तर The Eyes of the Interred ही १९६० साली प्रसिद्ध झाली. ग्वाटेमालाच्या केळीच्या शेतांवर काम करणाऱ्या मजुरांच्या जीवनाची ही विलक्षण कथा आहे.

१९६३ साली मिगेलची सर्वपरिचित Mulatu de Tal ही कादंबरी प्रसिद्ध झाली. दंतकथेच्या अंगाने लिहिलेली ही कादंबरी फारच गाजली. या कादंबरीला Silla Monsegur पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.


मिगेलच्या लिखाणामुळे लॅटिन अमेरिकेतील स्थानिक लोकांच्या एकंदर स्थितीचा मुद्दा जागतिक पटलावर आला. Magic Realism या वाङ्मयप्रकारातील एक आद्य आणि प्रभावी कादंबरीकार म्हणून मिगेलचे स्थान जागतिक साहित्यात अढळ आहे हे मात्र खरे!

आता मी The President या कादंबरीकडे वळतो.

एका चर्चच्या पोर्चमध्ये नेहमीप्रमाणे भिकारी जमलेले असतात. ती त्यांच्या झोपण्याची जागा असते. देशाच्या हुकूम शाहाचा एक अधिकारी एका थकलेल्या भिकाऱ्याची त्याच्या आईवरून निर्भर्त्सना करतो. रागाच्या भरात तो भिकारी त्या अधिकाऱ्याचा खून करतो. दुसऱ्या दिवशी सकाळी सगळ्या भिकाऱ्यांना पकडण्यात येते आणि त्यांचा शारीरिक छळ करून त्यांच्याकडून असे वदवण्यात येते की हुकूमशाहाचा एक निवृत्त लष्करी अधिकारी कॅनालस आणि एक वकील अबेल कारव्हाजाल यांनीच त्या अधिकाऱ्याची हत्या केलेली आहे. कारण एक भिकारी अशी हत्या करू शकतो यावर शासनाचा विश्वासच बसत नाही. तो भिकारी झानी अतिशय घाबरुन जणू वेड लागल्यासारखा तिकडून पळ काढतो.

दुसऱ्या दिवशी प्रेसिडेंट म्हणजेच हुकूमशाहा त्याच्या जवळच्या सहाय्यकाला म्हणजेच मिगेल फेसला सांगतो की त्याने जनरल कॅनालसला देश सोडून जाण्यासाठी मदत करावी. ही सगळी प्रेसिडेंटचीच चाल असते आणि त्याची कारणे फक्त त्यालाच माहीत असतात. त्याला कॅनालस पळून जायला हवा असतो, कारण त्याचे असे पलायन म्हणजे त्याच्या कृत्याचा कबुलीजबाब धरला जाईल अशी प्रेसिडेंटची अटकळ असते.

एका स्थानिक बारमध्ये मिगेल फेसची भेट लुसिओ वासक्वेझ या पोलिसातल्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याशी होते.






**मिगेल अस्टुरिअस**

फेस वासक्वेझला असे सांगतो की तो जनरल कॅनालसच्या मुलीला म्हणजेच कॅमिलाला पळवणार आहे कारण त्यामुळे शासनव्यवस्थेची फसगत होईल. कॅनालसचे पलायन झाकण्यासाठी या युक्तीचा फार चांगला उपयोग होईल असे फेसचे मत असते.

थोड्या वेळाने वासक्वेझची भेट त्याचा मित्र जनरल रोडासशी होते. ते बारमध्ये बसून थोडा वेळ गप्पा मारतात. ते बारच्या बाहेर येतात तेव्हा त्यांच्या दृष्टीला झानी हा भिकारी दिसतो. जनरल रोडासला धक्काच बसतो जेव्हा वासक्वेझ झानीला गोळ्या मारून ठार करतो. जनरल रोडास घरी परततो आणि त्याच्या बायकोला झानीच्या खुनाबद्दल सांगतो. तो तिला असेही सांगतो की पोलीस जनरल कॅनालसला दुसऱ्या दिवशी सकाळी या खुनाबद्दल अटक करणार आहेत.

याच वेळेला जनरल कॅनालस मिगेल फेसच्या घरातून

बाहेर पडतो. तो अतिशय थकलेला असतो आणि देश सोडून जायच्या कल्पनेने जरा भांबावलेला असतो. त्याच दिवशी संध्याकाळी जनरल कॅनालस देश सोडून पलायन करण्यात यशस्वी होतो. पोलीस त्यानंतर त्याच्या घराची झडती घेतात, पण त्यांना काहीच मिळत नाही. मिगेल फेस हळूच त्या घरात शिरतो. कॅमिलाला सुरक्षितपणे तिथून हलवण्यासाठी तो तिला एका सुरक्षित ठिकाणी ठेवतो.

दुसऱ्या दिवशी पहाटे जनरल रोडासची बायको फेडिना ही धावतच जनरल कॅनालसच्या घरी जाते. त्याला त्याच्या होणाऱ्या अटकेसंबंधी सूचना देण्यासाठी. पण जनरल कॅनालसने आधीच देश सोडलेला असतो आणि तिथे जज आलेला असतो. तो फेडिनाच्या अटकेचा हुकूम देतो. तिचा तुरुंगात खूप छळ होतो, पण ती काहीच सांगू शकत नाही. तिच्या बाळाचा तुरुंगात मृत्यूही होतो आणि ती जणू वेडीपिशी होते.

कॅमिलाला ज्या सुरक्षित ठिकाणी ठेवण्यात आलेले असते तिथे मिगेल फेस नियमित येत असतो. तो तिची तिच्या नातेवाईकांपैकी कुणाकडे तरी सोय करण्याचा प्रयत्न करतो, पण भीतीमुळे तिला आपल्याकडे ठेवण्यात कुणालाच रस नसतो. मिगेल फेसला कॅमिला हवी असते आणि त्याचबरोबर त्याला चांगला माणूस बनण्याची इच्छाही असते.

कॅमिलाची तब्येत अचानक बिघडते. मिगेल अँजेल फेस तिची शुश्रूषा करू लागतो. तिकडे फेडिनाची सुटका होते आणि तिची रवानगी एका वेश्यागृहात केली जाते. तिकडे ती जाते ती आपल्या मृत बाळासकटच. मग तिला वेड्यांच्या इस्पितळात पाठवले जाते. मिगेल अँजेल फेस प्रेसिडेंटच्या एका निकटवर्तीयाला त्याच्या आयुष्याला धोका असल्याचे सांगतो. अशा तऱ्हेच्या चांगल्या कृत्यांनी त्याला कॅमिला मिळेल अशी त्याला आशा असते.

एब कारव्हाजेल या वकिलाला अटक झालेली असते आणि तो तुरुंगात असतो. त्याची बायको त्याच्या सुटकेसाठी अथक प्रयत्न करत असते. कारव्हाजेलला माफी मागण्याची संधी दिली जाते, पण तो ती नाकारतो, त्यामुळे त्याला देहान्ताची शिक्षा होते. मिगेल अँजेल फेस कॅमिलावर आपले प्रेम व्यक्त करतो आणि थोड्याच दिवसांत त्यांचे लग्न होते. देशाबाहेर सैन्य जमवून उठावाच्या तयारीत असताना जनरल कॅनालसचा अचानक मृत्यू होतो.

प्रेसिडेंट निवडणुकीला उभा राहतो आणि त्याचवेळी तो मिगेल अँजेल फेसला एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय कामगिरीवर पाठवतो. अँजेल फेस कॅमिलाचा भावूक निरोप घेतो, पण प्रवासातच अँजेल फेसला प्रेसिडेंटच्या आदेशानुसार मारहाण करून पकडले जाते आणि दुसराच कोणी माणूस त्या काम गिरीवर त्याची जागा घेतो. इथे कॅमिला अँजेल फेसची प्रतीक्षा करत राहते. शेवटी निराश होऊन ती आपल्या छोट्या मुलासह एका दूरच्या गावात जाऊन राहू लागते. आपल्या मुलाला ती मिगेल हे नाव देते. अँजेल फेस एकटाच तुरुंगवास भोगत असतो. त्याला असे खोटेच सांगितले जाते की कॅमिला आता प्रेसिडेंटची रखेल बनलेली आहे. त्या दुःखाने अँजेल फेसचा पुढे मृत्यू होतो.

इथे कॅथेड्रलच्या पोर्चमध्ये नवीन भिकाऱ्यांच्या जमाव तयार झालेला असतो. आयुष्य तसेच चालू राहते आणि ही कादंबरी इथेच संपते.

आपल्याला अस्वस्थ करणारी ही कादंबरी आपल्यापुढे उलगडताना मिगेल अस्टुरिअसने काही अनोख्या तंत्रांचा वापर केलेला आहे. या कादंबरीचे कथानक अस्टुरिअसने तीन भागांत विभागलेले आहे आणि मग अतिशय संक्षिप्त उपसंहार आहे. पहिल्या भागातल्या घटना घडतात केवळ तीन दिवसांत, तर दुसऱ्या भागातल्या घटना घडतात केवळ चार दिवसांत. तिसऱ्या भागाचे वर्णन मिगेलने सप्ताह, महिने, वर्षे असे केलेले आहे. अँजेल फेसच्या अटकेपर्यंत आणि त्याचा पुढचा भाग तिसऱ्या भागातल्या कथानकात वर्णन केलेला आहे. पहिल्या आठवड्यात घडणाऱ्या घटनांमधून त्याने एका हुकूमशाहाच्या अधिपत्याखाली असलेल्या देशाच्या शासकीय यंत्रणा कशा काम करतात, सामान्य माणसांच्या आयुष्यावर त्याचा किती खोल प्रभाव असतो, हुकूमशाहाच्या लहरीनुसार माणसांची आयुष्ये किती आणि कशी बदलू शकतात याचे अत्यंत मार्मिक आणि तेवढेच भयावह वर्णन केलेले आहे. तसे हे कथानक सरळ रेषेत जाणारे आहे त्यामुळे क्रम एकामागून एक असाच आहे. पहिल्या दोन भागांत कथानकाचा वेग आपल्याला स्तंभित करणारा आहे तर तिसऱ्या भागात तो संथ वाटतो. त्या भागातही घटनांचा वेग तसा जलदच आहे, फक्त एखाद्या वाक्यानेच किती काळ लोटला आहे हे सांगण्याचे अजब सामर्थ्य अस्टुरिअसच्या लेखणीत आहे. या असमान वेगाने कादंबरी अतिशय वाचनीय झालेली आहे आणि आपल्या मनाची पकड ती सहजच घेऊ शकते ते बहुधा त्यामुळेच. आणखी एक गोष्ट म्हणजे आपल्याला प्रेसिडेंट या कादंबरीत अगदी ओझरताच भेटतो, पण या कादंबरीच्या प्रत्येक शब्दात त्याचे अस्तित्व आपल्याला जाणवत राहते आणि मिगेलच्या लेखणीची प्रतिभा अशी आपल्याला ठायी ठायी जाणवते.

मिगेलच्या कथनशैलीला असामान्य सहजता आहे. प्रसंगांची भीषणता वाढत जाते तशी ती अधिकाधिक निर्विकार, वस्तुनिष्ठ होत जाते. त्यामुळेच त्या प्रसंगांची भयावहता कित्येक पट वाढत जाते. आपल्याला सुन्न करते. साधारण प्रसंगांची असाधारण प्रसंगांशी सहजच होणारी जोडणी एकाच शैलीत करणे हे त्याच्या जबरदस्त कथनशैलीचे खास वैशिष्ट्य

आहे. मॅजिक रिॲलिझमचा इतका अप्रतिम आविष्कार फार क्वचितच आपल्याला आढळतो आणि मिगेल अस्टुरिअसच्या लेखणीची ताकद अतिशय ठळकपणे आपल्याला जाणवत राहते. हा कथानकाचा प्रवाह प्रभावी करण्यात मिगेलच्या अशा लेखनशैलीचे फार मोठे योगदान आहे.

मिगेलची भाषा अतिशय काव्यात्म, रसाळ आणि प्रासादिक आहे. तशी ती अतिशय साधी, सरळ आणि सोपीही आहे. त्यात कुठलाही अभिनिवेश नाही. घडणारे प्रसंग मूर्तिमंत आपल्यासमोर उभे करण्याचे सामर्थ्य या भाषेत आहे. तिला एक अस्पष्टसा नादही आहे. कादंबरीमधल्या व्यक्तींची अनेकविध भावविश्वे त्याची लालित्यपूर्ण भाषा आपल्यासमोर अत्यंत सहजतेने उलगडते. त्यांच्या हेलकाव्यात आपल्याला पार जखडून टाकते. प्रेसिडेंटच्या सर्वव्यापी अस्तित्वाची जाणीव फारशी वेगळी टिप्पणी न करता ही भाषा फार परिणामकारक रितीने करते. ही खरे तर एक गंभीर प्रकृतीची कादंबरी आहे. तिचा कथाअवकाश अनामिक भयाने झाकोळून गेलेला आहे आणि हे सगळे गढूळलेले वातावरण आपल्यासमोर मिगेल अस्टुरिअसची भाषा अत्यंत अलिप्तपणे उभे करते, या निनावी भयाची तीव्रता अतिशय कौशल्याने वाढवत नेते.

रसिकहो, हुकूमशाही म्हणजे नक्की काय याचे विदारक चित्रण अतिशय भेदकपणे मांडणारी ही लॅटिन अमेरिकन वाङ्मयातील पहिलीच कादंबरी. यामुळे या कादंबरीची योग्यता फार मोठी आहे. केवळ काही प्रसंगांच्या साहाय्याने ही रासवट राजवट आपल्यापुढे मांडताना मिगेलच्या लेखणीने कमाल केलेली आहे. मिगेल अस्टुरिअस जे चित्र उभे करतो त्यामागची सत्यता किती भयावह आहे याची अस्वस्थ जाणीव ही कादंबरी वाचताना आपल्याला सतत होत राहते आणि हे त्याचे फार मोठे यश आहे. जिथे मानवी आयुष्यालाच कस्पटासमान मानले जाते तिथे बाकीच्या गोष्टींचे काय, हे झोंबरे सत्य मांडताना तो कुठलीच तडजोड कधीच स्वीकारत नाही आणि म्हणूनच जागतिक वाङ्मयात या कादंबरीला अढळपद मिळालेले आहे. हुकूमशाही राजवटींचे काळे सत्य जगापुढे आणणारी ही तशी पहिलीच कादंबरी.

या कादंबरीत व्यक्तिरेखा तशा बऱ्याच आहेत, पण मुख्य व्यक्तिरेखांची संख्या तशी मर्यादितच आहे. खोट्या आळामुळे आलेले प्राणांतिक संकट टाळण्यासाठी देश सोडून परांगदा होणारा धाडसी, बेदरकार जनरल कॅनालस, पुढे गूढ रीतीने म रण पावतो. त्याची मुलगी कॅमिला, अँजेल फेसने प्रथम संरक्षण दिलेली आणि मग त्याच्या प्रेमात अडकून त्याच्याशी विवाह करणारी, तो बेपत्ता झाल्यावर त्याच्या मुलाचा हिमतीने सांभाळ करणारी पण त्याच्यासाठी सतत झुरणारी, Vulnerability आणि Resolve यांचे अजब मिश्रण असणारी. झानी, फेडिना, वासक्वेझ अशाही व्यक्तिरेखा आहेत. कादंबरीचा एका अर्थी नायक असलेल्या मिगेल अँजेल फेस. प्रेसिडेंटचा आवडता पाताळयंत्री, क्रूर, स्वार्थी, मतलबी पण उरात चांगुलपणाचा ध्यास बाळगणारा, आपल्या पापांचं परिमार्जन करण्यासाठी अनेक उदात्त गोष्टी करणारा, पण शेवटी जी व्यवस्था त्यानेच राबवलेली असते तिचा बळी गेलेला असा हा अँजेल फेस. मिगेल अस्टुरिअसने ही एक अत्यंत व्यामिश्र, अविस्मरणीय व्यक्तिरेखा उभी केली आहे. त्याची खरी कमाल आहे ती त्याने ज्या तऱ्हेने प्रेसिडेंटची व्यक्तिरेखा साकारली आहे त्यात. हा प्रेसिडेंट कसा दिसतो आपल्याला कधीच कळत नाही. सबंध कादंबरीभर तो आपल्याला एकदा-दोनदा आणि तोही ओझरताच भेटतो. परंतु त्याची अमानुष शक्ती मात्र पानापानावर आपल्याला जाणवत राहते ती अनेक व्यक्तींच्या संभाषणांतून, घडणाऱ्या प्रसंगांतून, काहींच्या भावविश्वातल्या विचारांतून. म्हणूनच या कादंबरीत संवादांनाही अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सगळ्याच व्यक्तिरेखा मिगेलने इतक्या जिवंत केल्या आहेत की त्यामुळे ही केवळ कादंबरी नसून जणू एक ऐतिहासिक दस्तऐवज आपण वाचत आहोत असे भासत राहते.

मिगेल अस्टुरिअसची ही जागतिक वाङ्मयात नवा पायंडा पाडणारी कादंबरी प्रसिद्ध झाली ती १९४६ मध्ये. प्रकाशित झाल्यानंतर ही कादंबरी फारच लोकप्रिय झाली. मिगेल अस्टुरिअसच्या या विलक्षण कादंबरीने लॅटिन अमेरिकन साहित्यावर फार मोठा परिणाम केलेला आहे. या कादंबरीनंतर या धर्तीच्या अनेक उत्तम कादंबऱ्या लॅटिन अमेरिकेत प्रकाशित झाल्या, गाजल्या. The President ही कादंबरी विवादितही ठरली, कारण अमेरिकन गुप्तहेर संस्था CIA ने ती दडपण्याचा अयशस्वी प्रयत्न केला.

मिगेल अस्टुरिअसने स्वप्नवत प्रतिमा, उपमा, काही शब्दांची, वाक्यांची होणारी पुनरुक्ती, शैली आणि भूमिकेत होणारे आकस्मिक, धक्कादायक बदल या सर्वांच्या साहाय्याने हुकूमशाही राजवटीचे विदारक सत्य अत्यंत भेदक रितीने या कादंबरीद्वारा जगासमोर आणले आणि त्यामुळेच ही साहित्यकृती जागतिक वाङ्मयात एक मैलाचा दगड ठरलेली आहे. १९६७मध्ये मिगेल अस्टुरिअसला नोबेल पारितोषिक देण्यात आले, तेव्हा त्याच्या ज्या साहित्यकृतींचा या पारितोषिकाच्या प्रमाणपत्रात उल्लेख केलेला आहे त्यात The President या कादंबरीचा आवर्जून समावेश करण्यात आलेला आहे.

**– राजीव श्रीखंडे**
rshrikhande@yahoo.com



# भारताची जागतिक प्रतिमा

डॉ. अनंत लाभसेटवार

**दुसऱ्या** देशाविषयी एखाद्याला काय वाटतं हे त्याच्या शब्दातून कळत नाही. कारण दुसऱ्यांवर टीका करण्याचं कुणालाच आवडत नाही. शिवाय पाश्चात्यांना कठोर शब्द स्तुतिसुमनांमध्ये गुंडाळून ऐकणाऱ्याचं मन जिंकून घेण्याची सवय. त्यामुळे त्यांनी ओकलेलं विषही आपल्याला अमृतासारखं वाटतं. परिणामी त्यांना आपल्याविषयी खरोखरीच काय वाटतं हे सांगणं कठीण. त्याच्या जिभेऐवजी वागणुकीकडे लक्ष दिलं तर सत्य कळण्याची जास्त शक्यता. अशा अभ्यासपूर्ण दृष्टीतून बघितलं तर वेगळ्या प्रकारची जाणीव होते. रूडयार्ड किपलिंगनं मागच्या शतकाच्या सुरुवातीला भारताची रंगवेलेली प्रतिमा म्हणजे पटकेधारी अर्धनग्न गारुडी, साप आणि वाघ यांचा देश. आता त्या डोलणाऱ्या सापाऐवजी संगणक यंत्र पुढ्यात ठेवून मंत्रणालेखन (Software) करणारा डोकेबाज अभियंता त्या लेखकाला दिसेल. ही कल्पना नसून एक वास्तव आहे. त्यामुळे पाश्चात्त्य लोक आपल्याला जी वागणूक देतात त्यात लक्षणीय बदल झालेले आहेत. आपण राष्ट्रीय ढोबळ उत्पन्न (GDP) वाढवून ब्रिटनला मागे टाकलं या विक्रमापेक्षा जगाच्या मानसिकतेत झालेली स्थित्यंतरं कितीतरी महत्त्वाची. आता पाश्चात्त्य लोकांत भारतीय माणूस म्हणजे एक संगणकतज्ज्ञ अशी प्रतिमा झाली आहे. त्याचं डोकं म्हणजे मंत्रणेचा कारखाना समजण्यात येतो. सगळ्याच भारतीयांना संगणक जमत नाही. इकडे ते दुर्लक्ष करतात. ही प्रतिमा एवढी रूढ झाली आहे की एशियन म णसाला गणिताचा प्रश्न सोडवण्यास विचारल्यानं त्यांची एकांगी प्रतिमा अधोरेखित होते व ते त्यांना अवमानकारक वाटतं म्हणून त्यांना भंडावून सोडू नका असा उपदेश एका संस्थेनं आपल्या लोकांना दिला.

### भारतीयांचं संगणक वर्चस्व

आपल्या लोकांच्या डोक्यात ब्रह्मदेवानं मायक्रोचिप पेरल्या आहेत असा अनेकांचा संभ्रम झाला आहे. अंकीय क्रांतीमुळे सॉफ्टवेअरशिवाय कुठलंच काम होत नाही. जिथे मायक्रोचिप तिथे यंत्रणा आलीच. भारतीय अभियंते त्यात अग्रणी असल्यामुळे कुठलाच देश यांच्याशी स्पर्धा करू शकत नाही. सिलीकॉन व्हॅलीतल्या मोठ्या कंपन्यांमध्ये शेकडो नव्हे तर हजारो भारतीय अभियंते सापडतात. एकट्या अमेरिकेत आपल्या अभियंत्यांची संख्या सुमारे १० लाख असून ते जो H1-B2 व्हिसा वापरतात तो भारताचा समजण्यात येतो. अमेरिकेतले मायक्रोसॉफ्ट (सत्या नाडेला), गूगल म्हणजे अल्फाबेट (सुंदर पिचाय), आयबीएम (अरविंद कृष्णन), **ॲडोबी** (शंतनु नारायण), मायक्रॉन टेक्नॉलॉजी (संजय मल्होत्रा) हे सगळे कार्यकारी मुख्याधिकारी भारतात जन्मलेले. २०२१-२०२२ मध्ये या पाच कंपन्यांचा एकूण खप ४४० अब्ज, नफा १५० अब्ज व बाजारमूल्य ३१०० अब्ज डॉलर होतं. भारताच्या राष्ट्रीय ढोबळ उत्पनापेक्षा (२.७३ ट्रिलियन डॉलर) जास्त. अमेरिकन गोऱ्या कार्यकारी मुख्याधिकाऱ्यात व्यवस्थापनचातुर्य सापडतं, पण त्याच्या मेंदूचा दुसऱ्या म जल्यावर तंत्रज्ञान सापडत नाही. उलट भारतीय मुख्याधिकाऱ्यांत या दोन्ही कौशल्यांची जोडी सापडते. म्हणून त्यांच्यावर एवढी मोठी जाबबदारी सोपवण्यात आली. त्यामुळे आपली प्रतिमा सुधारण्यास मदत झाली. अर्थमंत्री निर्मला सीतारामणनी 'भारतीय प्रवास दिन'च्या समारंभाच्या वेळी अनिवासी भारतीयांना देशाचे खरे 'राष्ट्रदूत' म्हणून संबोधलं.

त्यामुळे जगभर भारताची प्रतिमा उंचावली. अनिवासी भारतीयांनी अमेरिकेत समाजातलं उच्च स्थान गाठलं आहे कारण त्यांचं सरासरी वार्षिक उत्पन्न १२५००० डॉलर (१ कोटी रुपये) तर गोऱ्या अमेरिकन माणसाचं फक्त ७०,००० डॉलर (५७ लाख रुपये). म्हणजे NRI नी आपली बुद्धिमत्ता कौशल्यानं सिद्ध केली. या यशाचा फायदा मायदेशाला देखील झाला. नित्यानं NRI घरी डॉलर पाठवून पुत्र (किंवा कन्या) कर्तव्य बजावतात. जगभरातून NRI नी २०२२ मध्ये १००

अब्ज डॉलर मायदेशी पाठवून विक्रम केला असं जागतिक बँकेनं नुकतच जाहीर केलं. पैशांचं हे संक्रमण जगात सर्वात मोठं. दुसऱ्या नंबरचा मॅक्सिको व तिसऱ्या नंबरचा चीन बरेच मागे पडतात. या १०० अब्ज गंगाजळीतला सर्वात मोठा हिस्सा अमेरिकेतून आला. मध्यपूर्व देशांत (युएई, सौदी अरेबिया, कतार वगैरे) अल्पपठीत व अल्पकुशल भारतीयांचे थवेच्या थवे दरवर्षी जातात. हा मनगट वापरून कमावलेला पैसा एकेकाळी सर्वाधिक असे. परंतु आता बुद्धी वापरून केलेली कमाई भारताला जास्त उपयोगी पडते. गुणवत्तेची ही निर्यात म्हणजे एक दुभती गायच. कारण हिरे, लोहमाती, किंवा सॉफ्टवेअर विकल्यानं एकदाच कमाई होते. या उलट NRI च्या झाडाला लागलेल्या फळांचा देशाला अनेक वर्षं उपयोग होतो.

आपण आईवडिलांचे जे ऋण मानतो ते पाश्चात्त्यांमध्ये सापडत नाही. आपल्या देशात उद्योगाच्या मालकाच्या ऑफिसमध्ये वडिलांचा माळ घातलेला फोटो हटकून सापडतो. अमेरिकेत तशी पद्धत नाही. आपलं पिढीसातत्य पाश्चात्त्यापेक्षा अधिक बळकट असतं यात शंका नाही. हे बघून गोऱ्यांना नवल व कौतुक वाटतं. कारण या देशात ४०% गोरे व ७२% कृष्णवर्णीय लग्नबाह्यसंबंधातून जन्म घेतात. त्यांना वडील कोण हेदेखील पुष्कळदा माहीत नसतं. या देशात NRI हे एक समाजाचे आदर्शवत घटक समजले जातात. अमेरिकन संस्कृतीत सर्वसामान्य घटस्फोट, गुन्हेगारी, असंतुष्टता, अमली पदार्थ सेवन वगैरेमुळे जी कीड लागलेली सापडते ती आपल्या देशाच्या लोकांत आढळत नाही. आपल्या लोकांनी स्वकर्तृत्वानं जे यश कमावलं त्याचं अमेरिकन नेते आपल्या भाषणात सारखं कौतुक करतात. कुठल्याही अध्यक्षांच्या शासनातील बडी पदं भारतीयांनी भूषवलेली आढळतात. बायडन शासनातदेखील पायलीभर NRI सापडतातच. इथे मराठी माणसानं तेवढी प्रगती केलेली दिसत नाही.

या यशामुळे सर्वसामान्य अनिवासीत भारतीयानं अमेरिकेत स्वप्न साकार केलं असंच म्हणावं लागेल. रहायला मागे अंगण असलेलं संकुल, एक वाहन आणि खायला कोंबडी मिळाली की अमेरिकन स्वप्न पूर्ण झालं असं म्हणतात. ते NRIनं सवाईनं पूर्ण केलं यात शंका नाही. त्यांच्या जवळ एक नव्हे तर दोन व कधी कधी त्यापेक्षा जास्त वाहनं व दोन दोन घर सापडतात. त्यांच्या यशाचा व अभ्यासू मुलांचा सुगंध समाजात दरवळतो व देशाची प्रतिमा उजळते.

**अर्थकारण**

काही वर्षं भारताचा वाढदर जगात सर्वाधिक झाला हे सर्वज्ञात आहे. यात महत्त्वाचं असं की कोरोना व युक्रेन युद्धामुळे २०२३ मध्ये ब्रिटनचा वाढदर शून्य, अमेरिकेचा उणा आणि चीनचा ३%च्या वेशीत असेल असं भाकीत जागतिक बँकेनं जानेवारी २०२३ मध्ये केलं पण भारताचा ६.९% असेल असं डोळे विस्फाटणारं विधान करून जगाच्या प्रक्षुब्ध व वादळी आर्थिक समुद्रात भारत हा एक दीपस्तंभ आहे असा गौरव जागतिक बँकेनं केला. त्यावेळी आपल्या राष्ट्रीय ढोबळ उत्पन्नानं (GDP) जगात पाचवा नंबर गाठून ब्रिटनला मागे पाडलं. एवढंच नव्हे तर आपण पुढील ३-४ वर्षांत तिसरा नंबर गाठू असा आत्मविश्वास मोदी सोडून द्या, पण न्यू यॉर्क टाइम्सनं व्यक्त केला.

आतापर्यंत आपल्याला समृद्ध पाश्चात्त्य देशांकडून एखाद्या लहान मुलासारखी वागणूक मिळे. आपण समान पातळीवरचे देश आहोत असं ते म्हणत, परंतु वास्तवात एक माजी वसाहत अशी वागणूक बैठकीला बसलं की देत. त्यामध्ये साम्राज्य वसाहतीसंबंधाच्या सूक्ष्म छटा डोकावत. पण आता आपला GDP त्यांच्यापेक्षा मोठा म्हणून ही मानसिकता लोपित पावली आहे. या परिवर्तनामुळे भारत इतर पाश्चात्य देशांशी आत्म विश्वासानं वागतो. चीन शत्रू असूनही ते जसा त्या देशाच्या आर्थिक व लष्करी बळांचा आदर करतात तसा आपला करण्यास शिकले आहेत. GDP नं गाठलेल्या उच्चांकापेक्षा जग आता आपल्याकडे ज्या दृष्टिकोनातून बघतं त्यामुळे मानसिकतेत घडलेलं परिवर्तन महत्त्वाचं वाटतं. याला आपण जगभर निर्यात केलेली गुणवत्ता जेवढी कारणीभूत आहे तेवढीच मोदींनी उचावलेलं आत्मभान व वधारलेला आत्मविश्वास आहे असं म्हणावं लागेल.

त्यामुळे नवीन व बदलत्या सत्तासमीकरणात भारताला खास स्थान मिळालं आहे हे नि:शंक. याचा एक परिणाम म्हणजे जगात सर्वात मोठी अर्थकारणं असलेल्या २० देशांचा जो गट आहे (G-20) त्याचं अध्यक्षपद भूषवण्याचा मान प्रथमच भारताला मिळाला. आता भारताला संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा समितीचं स्थायी सदस्यत्व प्राप्त करण्यास रस्ता मोकळा झाला, असं येथील काही तज्ज्ञांनी म्हटलंदेखील. त्यामुळे दुसरा मानाचा तुरा आपल्या टोपात रोवला शक्यता नाकारता येत नाही.

टीप : लेखकाच्या 'अमेरिका : सूर आणि धूर', ग्रंथाली या आगामी पुस्तकातून.

**– अनंत पां. लाभसेटवार**
लेखक फर्स्ट नॅशनल बँक, USA चे
१४ वर्ष Chairman of Board होते.
anantlabh@gmail.com



संजीवनी खेर

# डॉ. तस्लीमा नसरीन- जळीस्थळी उग्रवाद?



डॉ. तस्लीमा नसरीन

**उग्रवाद** आणि धार्मिक उन्माद साऱ्या जगातच वाढत आहे. रिकामटेकड्या लोकांना हाताशी धरून राजकारणी आपली पोळी भाजून घेत आहेत. बहुसंख्य लोक अल्पसंख्याकांमुळे आपले धार्मिक अस्तित्व धोक्यात आल्याची आवई उठवून लोकांना भटकवत आहेत. पिढ्यानुपिढ्या सौहार्दाचे वातावरण असलेल्या देशात अशा भ्रमित गोष्टींचा फुगा करून आणि त्याचेच भांडवल करून निरपराधांचे शिरकाण होत आहे. हे सारे आपला देश, बांगला देश, श्रीलंका इत्यादी देशांत होत आहे. इतरत्रही होताना दिसत आहे. शिया सुन्नी, ज्यू इस्लाम इत्यादी हे वास्तव जीवघेणे आहे. त्यामुळे त्याचे पडसाद साहित्यात पडणे स्वाभाविक आहे. परंतु ते जितक्या पोटतिडीकेने व्हायला हवे तितके होताना दिसत नाही. आज मी ज्या लेखिकेबद्दल आणि तिच्या लेखनाबद्दल लिहीत आहे ती आहे तस्लीमा नसरीन. ती बांगलादेशी असून ह्या घटकेला (नावाला बांगला देशी आहे पण आज) लेखनामुळेच परागंदा जीवन जगत आहे. भारत, युरोप, अमेरिका अशा ठिकाणी निर्वासित आयुष्य घालवत आहे. काय गुन्हा आहे तिचा? तर धार्मिक उन्मादाबद्दल बोलणे, आपल्या देशातील अयोग्य गोष्टींना विरोध करणे, अर्थातच तो धार्मिक कट्टरतेविरुद्ध तेथील सरकारने गप्प बसण्याने तेथील स्थिती चिघळल्याने याबद्दल लिहिल्याने, फक्त तिच्याच देशातील सरकारला आणि लोकांना झोंबत नाही तर तमाम धार्मिक असहिष्णू लोकांना झोंबतेय. त्यामुळे सतत तिला टार्गेट केले जातेय. तिच्याच नव्हे तर दुसऱ्या धर्मातही स्त्रीला दबावाखाली ठेवले जाते. यावर ती बोलते, लिहिते. त्यामुळे तिच्यावरचा राग फतव्याच्या रूपाने बाहेर पडतो. तिला सारख्या धमक्या येत असतात.

भारतात बाबरी मशीद पाडल्याने तिच्या देशात-बांगला देशात अल्पसंख्य असलेल्या हिंदू लोकांना त्रास झाला. मारहाण, घरे जाळणे, मंदिरे उद्‌ध्वस्त करणे अशा संकटांना तोंड द्यावे लागले होते. त्यावर तिने 'लज्जा' ही कादंबरी लिहिली. त्याबद्दल मी लिहीत आहे.

डॉ. तस्लीमा नसरीन ही लेखिका आणि जागतिक मानवी हक्क समितीत काम करणारी धडाडीची स्त्री आहे. ढाक्का वैद्यकीय महाविद्यालयातून तिने पदवी मिळवली. तिने डॉक्टर म्हणून १९९४ पर्यंत काम केले. गरीब वस्तीमध्ये काम करताना तिने निम्न वर्गातील त्यातही तेथील हिंदूंना लोकांना काय सोसावे लागते ह्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. तिचा जन्म ५ सप्टेंबर १९६० रोजी मयमनसिंग - तेव्हाचे पूर्व पाकिस्तान आताचा बांगलादेश - इथे झाला. तिने तिच्या देशात अल्पसंख्यांकांवर होणारे अत्याचार पाहिले होते. वास्तविक देशात कायद्याने

इतर धर्मांच्या लोकांना संरक्षण होते, पण अतिरेकी विचारांच्या लोकांचा जोर वाढू लागल्यावर तिने त्याविरुद्ध लिहायला सुरुवात केली. मूलतत्त्ववादी ह्या संधीची वाट पाहत होते. तिच्यावर टीकास्त्रे डागली गेली.

तिने 'चुकीच्या गोष्टींविरुद्ध आवाज उठवणे हा लेखनकर्मीचा धर्म आहे नि तो मी निभावणार' असे वक्तव्य केले. त्यातच ज्यांनी बांगलादेश स्थापनेत सहभाग घेतला होता, ज्यांच्या निष्ठा नि:संदेहपणे देशाशीच होत्या त्या इतर धर्मीय लोकांवर संशय घेतला जाऊ लागला. मुळातच तस्लीमा ही जातीय आणि धार्मिक अतिरेकाविषयी त्वेषाने लिहीत, बोलत होती आणि आहे. त्यामुळेच तिच्यावर फतवा जारी करण्यात आला. काही काळ तिने भारतात आश्रय घेतला, पण इथेही तिच्यावरील फतव्याने तिला संरक्षण देणे असंभव होऊ लागले. आता ती अनेक देशांत निराश्रित म्हणून राहत आहे.




तिच्यावर इस्लामविरोधी बोलणे, लिहिणे यावरून काही मौलवींनी तिचा शिरच्छेद करावा असा फतवा जारी केला आहे, तर सरकारने तिच्या अटकेचा आदेश जारी केला आहे. सलमान रश्दींवर अलीकडेच अमेरिकेत जीवघेणा हल्ला झाला होता, कसेबसे ते त्यातून बचावले. नसरीनने त्या घटनेची निंदा, विरोध केला होता. तेव्हा तिला कल्पना नव्हती की तिच्यावरही असा फतवा जाहीर होईल. पण ती म्हणते की मी अशा धमक्यांना घाबरून माझी मते बदलणार नाही. तिच्या काही पुस्तकांवर बांगलादेशात बंदी आहे तर काहींमुळे तिला धमक्या येत आहेत.

मुळात तिच्याविरुद्ध रान पेटले ते तिच्या 'लज्जा' ह्या कादंबरीवरून. १९९२ मध्ये ६ डिसेंबर रोजी आपल्याकडील अतिरेकी विचारांच्या लोकांनी अयोध्येची चारशे वर्षे जुनी बाबरी मशीद तोडली. त्याचे परिणाम म्हणून आपल्या देशात दंगे झाले नि जाळपोळ झाली. निरपराधांची जीवित हानी झाली. मालमत्तेचे नुकसान झाले. तसेच बांगला देशात हिंदू प्रजेला छळायचे चांगलेच कारण मिळाले. ती ह्या पुस्तकाच्या मनोगतात लिहिते– 'बाबरीच्या विध्वंसानंतर माझ्या देशातील हिंदूंना हुसकावून लावायला सुरुवात झाली. पिळवणूक होऊ लागली. ही शरमेची बाब होती नि आहे. बांगलादेशावर प्रेम करणाऱ्या आम्हा सर्वांना ही असली भयानक घटना आपल्या सुंदर देशात घडावी याची लाज वाटते. १९९२च्या दंग्यांची जबाबदारी आम्हां सर्वांची आहे. आम्ही दोषी आहोत. लज्जा हे आमच्या सामुदायिक पराभवाचे वर्णन आहे.'

तिला लेखनासाठी साखाराव्ह पुरस्कार, सिमोन बॉवा पुरस्कार, आनंद पुरस्कार, युनेस्को पुरस्कार मिळाले आहेत. नाट्यसभा गौरव, तसेच फ्रान्स आणि स्वीडनच्या सरकारांनीही तिच्या निर्भय लेखणीचा गौरव केला आहे.

तिच्या प्रमुख पुस्तकात तिच्या वयाच्या विविध टप्प्यांवर आलेल्या अनुभवांतून साकारलेल्या आत्मकथेचे विभ्रम सात खडांत प्रकाशित आहेत. मेरे बचपन के दिन, वे अंधेरे दिन, निर्बाचीत कलम, निमंत्रण, औरत का कोई घर नहीं होता, फेरा, बेशरम, मुझे घर ले चलो, निर्वासन, नही, कहीं कुछ नही अशी अनेक पुस्तके तिने लिहिली आहेत.

तिचे मतप्रदर्शन तिला अनेकदा जीवघेण्या संकटात टाकत असते. तरीही ती आपली स्त्रीविषयक, धर्मांधांच्या विरोधात बोलत असते नि फतवे ओढवून घेते. वृत्तपत्रांतून तिने सदर लेखन केले आहे. बऱ्याचदा असे वाटते की तिने असे प्रक्षोभक बोलणे टाळायला हवे. तिची लेखणी म्हणजे छोटे छोटे बॉम्ब असतात. इस्लामधील काही चालीरीतींबद्दल बोलणे, स्त्रियांना घोर अडचणीत टाकतील अशा रुढीबद्दल आवाज उठवणे यांमुळे तिचा जीव संकटात पडतो. पण ती स्वस्थ बसत नाही. अगदी सलमान रश्दी यांच्यावरील अलीकडच्या हल्याचा विरोध करून तिने पुन्हा राळ ओढवून घेतली आहे.

तिची काही उदाहरणे पाहा स्त्रियांनी मुले जन्माला घालणे बंद करावे, हे 'नकुशी' संदर्भात बोलली होती. मुलीला गर्भात वा जन्मत:च मारणे आपल्या (भारतीय उपखंडात नेहमीचीच बाब आहे. इस्लाममध्ये खूप सुधारणा करणे जरुरीचे आहे. 'स्त्रीला घर नसते, देश नसतो.' स्त्रीने घराबाहेरच्या जगाची उठाठेव करायचे कारण नाही असं समाज ठरवतो. श्रीमंत स्त्रियांनी गरीब स्त्रियांच्या गरिबीचा फायदा घेत सरोगासीने मुले पैदा करू नयेत वास्तविक विनाअपत्य जोडप्याला स्वत:चे बाळ असावेसे वाटणे तसे गैर नाही. गरीब स्त्रीचा गैरफायदा घेऊन, कमी पैसे देऊन हे काम करू नये, असे म्हणणे ठीक पण तस्लीमा असे लिहिणे सोडत नाही. आणि लोकांचा राग तिला सोसावा लागतो.

मुस्लीम जोडप्याला खूप मुले असतात ह्या मुद्यावर तिने स्पष्ट केले, की गरिबांना मुले म्हणजे एका कमाईचा रस्ता वाटत असे. त्यातून त्या काळी बालमृत्यूचे प्रमाण जास्त होते त्यामुळे पालक जास्त मुलं होऊ देत. आरोग्यसेवेच्या कमतरतेमुळे मुले जगत नव्हती त्यामुळे अधिक मुले होऊ दिली जात होती. ती म्हणते, 'माझ्या आजीला ११ मुले झाली, आईला चार, बहिणीला एक आणि मला एकही नाही.' वैयक्तिक जीवनात तीन लग्ने होऊन ती टिकली नाहीत. वडील डॉ. रजब अली आणि आई एदल सरस, एक बहीण आणि एक भाऊ असा तिचा परिवार आहे. आसाममधील जॉर्ज बेकरशी निकाह केला होता. अंकिता भटाचार्य नामक तरुणी स्वत:ला तस्लीमाची कन्या म्हणवते. खरे तीच जाणे. सध्या रुद्र मोहम्मद शाहीदुल्ला हा कवी

तिचा सहचर आहे.

तिच्या लेखनातून स्त्रीच्या जीवनात आनंद मिळवण्याच्या धडपडीची जाणीव वाचकाला होते. साधे साधे आनंदाचे क्षण तिच्याकडून सामाजिक, धार्मिक बंधनामुळे हिरावून घेतले जातात. तिला जरा वाटले की आपण गावातील डोंगरावर मनमुक्त भटकावे, नदीच्या पाण्यात पाय बुडवून स्वस्थ बसावे, पक्ष्याचे गाणे ऐकत राहावे. तर ते आजच्या आपल्या स्थितीत, देशात शक्य आहे? तिला स्वैरीणी म्हटले जाईल. त्यासाठी तिने एखादा पुरुष पकडायला हवा, मग तो छोटा भाऊ असेल, वडील वा नवरा असेल. तिने एकटीने फिरणे म्हणजे पुरुषजातीचा अपमानाच जणू! तिच्या भोवतीच्या घराच्या भिंती हेच तिच्या तथाकथित सुरक्षेचे कारण मानले जातेय. घराच्या झरोक्यातून येणारी उन्हाची तिरीपच तिच्यासाठी बाहेरच्या जगाच्या अस्तित्वाची खूण आहे. सारे कुटुंब जिच्या कष्टावर उभे असते तिचे अस्तित्व फक्त पुरुषाच्या सुखाभोवती फिरत असते.

तिला सर्वात अधिक धोका ह्या जातीपासूनच असतो. तिला मारझोड करणारा, तिच्यावर ॲसिड फेकणारा, बलात्कार करणारा पुरुषच असतो. स्त्रीला नमवणारा आपल्या पाशवी ताकदीचा वापर करून तिला हतबल करणारा आणि म्हणूनच पुरुषसत्तेने निर्माण केलेल्या तुरुंगातील सुरक्षितता देणारा पुरुषच असतो. तिच्या 'निर्वाचित कलाम' म्हणजे निवडक स्तंभलेखनाम धून याबाबतची भावना तीक्ष्ण ज्वालारूपी शब्दांतून ती प्रकट करत असते.

पौर्वात्य समाजात लग्न ठरवताना मुलगी पाहणे हा प्रकार आजही चालतोच. ती दिसते कशी, बोलते कशी? रंग गोरा हवा, केस लांबसडक हवेत, घरकामात तरबेज हवी इत्यादी यासाठी आपल्याकडे कुणी निरखून पाहातेय हे तिला अवघडल्यासारखं वाटू शकतं! आणि ती मात्र तिला पहायला आलेल्या तरुणाकडे मान वर करून पाहत नसेल तर ती विनयशील समजली जाते. पण तिने त्याला निरखले तर ती निलाजरी कशी ठरते? जणू तिला आपला होणारा पती देखणा निरोगी, बोलायला वागायला कसा आहे ते जाणून घ्यायचा अधिकारही नाही? हो असेच आहे वास्तव! ह्यालाच ती विरोध करते. बायकांना त्याविषयी जागरूक करते.

ती पोटतिडीकेने म्हणते, कोण म्हणते स्त्री पुरुषाखेरीज राहू शकत नाही? मी एकटी राहते, माझं सर्वस्व लुटून, मला गरिबीत ढकलून तो निघून गेला, तरी मी उभी राहिले. एखाद्या लंपटाबरोबर, त्याचे सगळे व्यभिचार स्वीकारून त्याचे घर-माणसे संभाळत राहिले म्हणजे मी आदर्श? मला नको असली पदवी! स्त्रीच्या आंतरिक शक्तीवर तस्लीमाचा विश्वास आहे. नवऱ्यामागे स्त्री एकटीने संसार संभाळते, मुलांना वाढवते. पुरुष कोलमडतो.

तिने स्त्रियांना आत्मभान देण्याचा प्रयत्न केला. १९६०मधील तिचा जन्म. १९९३ साली तिच्यावर फतवा निघाला. वयाच्या बत्तिशीत तिला बांगलादेशातून हद्दपार करण्यात आले. कधी दिल्लीत एकाकी आयुष्य; तर कधी स्वीडन तर कधी जर्मनीत तर कधी अमेरिका असे ती भटकत आहे. अतिरेकी तिला जीवे मारू शकतात, ॲसिड फेकून विद्रूप करू शकतात ही भीती तर आहेच, तरी लिखाणाची धार तिने कमी केलेली नाही. तिला राग, चीड येते ती वरपांगी आधुनिकतेचा आव आणणाऱ्या ढोंगी प्रगतिवाद्यांची. ते कधी ठामपणे तिच्या मागे उभे राहताना दिसत नाहीत. अनेकदा त्यांचा हिंस्र चेहरा समोर येतो आणि मन कापते. मात्र मूळचा लढावू बाणा तिने सोडलेला नाही. तिची पुस्तके वाचकांत लोकप्रिय आहेत. आणि तिचा आपल्या शब्दांवर विश्वास आहे.

**– संजीवनी खेर**
sanjeevanikher@gmail.com

ग्रंथाली




# कालिदास शब्दकोश

## सुरेश वाघे

**खंड पहिला – अ ते घ**
**खंड दुसरा – च ते भ**
**खंड तिसरा – म ते ह**
**परिशिष्ट विभाग**

'अभिज्ञान शाकुंतल', 'विक्रमोर्वशीय', 'मालविकाग्निमित्र' ही नाटकं, 'कुमारसम्भव' व 'रघुवंश' ही महाकाव्यं आणि 'मेघदूत' व 'ऋतुसंहार' ही ललित काव्यं या महाकवी कालिदास याने रचलेल्या अभिजात साहित्याचा अर्थ सोपा करून सांगणारे शब्दकोश 'ग्रंथाली'ने प्रसिद्ध केले आहेत. सुरेश पांडुरंग वाघे लिखित हे चार खंड अभ्यासकांसह रसिक वाचकांना कालिदासाच्या वाङ्मयाचा आस्वाद घेण्यासाठी उपयुक्त ठरतील. **चार खंडांची मूळ किंमत ४५०० रुपये आहे. ते २७०० रुपयांत** (टपालखर्च वेगळा) उपलब्ध केले आहेत.



किरण येले

# समाजात काम करत लिहिणारा ललितलेखक : मिलिंद घायवट

**नव्या** पिढीतले अनेक तरुण कविता लिहिताना दिसतात. कवितेनंतर कथा, नाटक आणि मग कादंबरी असे हे प्रमाण उतरत जाते. या साहित्यप्रकारात एक महत्त्वाचा प्रकार दुर्लक्षित राहतो तो म्हणजे ललित निबंध.

मराठी साहित्यात ललित निबंधाची देदीप्यमान परंपरा आहे ती लोकहितवादी, आगरकर यांच्यासून सुरू होत वि.स. खांडेकर पुढे दुर्गा भागवत मग महावीर जोंधळे आणि आताच्या पिढीच्या दासू वैद्यपर्यंत येते.

नव्या पिढीचा लेखनाचा कल पाहता समाजमाध्यमावर अनेक तरुण कवींचे समूह दिसतील. नाटक लिहिणाऱ्यांचे समूह महाविद्यालयात दिसतील, परंतु ललित लेख लिहिणारे त्या तुलनेत कमी दिसतात. याचे कारण ललित निबंधाचा विषय सामाजिक वा निसर्ग वा माणूस असतो आणि या विषयावर लिहिताना त्यासाठी समाजाचा, पर्यावरणाचा काळाचा आणि माणसांचा अभ्यास असावा लागतो. समाजमाध्यमावर रोज पोस्ट करणारे काहींना तो अभ्यास नसल्याचे जाणवते. मात्र हा अभ्यास गांभीर्याने तरणारे आणि सामाजात काम करून लिहिणारे जे नवे तरुण आहेत त्यापैकी एक आहे मिलिंद घायवट.

मिलिंद घायवट हा तरुण कविता लिहितो, पण त्याच्या ललितबंधाला आणि कवितानाही सामाजिक जाणिवेची जोड असते. त्याच्या ललितबंधातली सामाजिक जाणीव ही त्याच्या रोजच्या जगण्यातून येते. मिलिंद घायवट हा तरुण कसारा येथे राहतो पण नोकरीनिमित्त मुंबईत येत असतो. कुबेररूप मुंबईच्या जवळच असलेली ही दीनवाणी गावे आणि जगण्यातील तफावत त्याला अस्वस्थ करते आणि ती अस्वस्थता तो कागदावर उतरवतो. मिलिंद घायवट फक्त अस्वस्थता कागदावर उतरवत नाही तर अस्वस्थ होतो तेव्हा समाजाच्या कामासाठी रस्त्यावरही उतरतो हे त्याचे वैशिष्ट्य आहे. कोरोनाकाळात कसारा



मिलिंद घायवट

परिसरातील गरिबांसाठी आणि आदिवासींसाठी तो रात्रदिवस फिरून काम करत होता. कोरोनाबाधितांना हॉस्पिटलमध्ये नेण्यापासून पाड्यातील आदिवासींना धान्य पोहोचवण्यापर्यंतची कामे तो करत होता. त्यातून त्याला कोरोनासंसर्गही झाला, पण तो घाबरला नाही, थांबला नाही.

मराठी साहित्य इतर भाषांच्या तुलनेत मराठी वाचकाला जवळचे का वाटत नाही याचे एकच कारण असे सांगितले जाते की हिंदी, मल्याळम साहित्यिक जसे चळवळीत आणि सामाजिक स्तरावर काम करतात तसे समाजातील खालच्या स्तरावरील लोकांत वावरून लिहिणारे विनोबा भावे, दुर्गा भागवत, अनिल अवचट, राजन गवस, मिलिंद बोकील यांसारखे काही मोजके लेखक असल्याने समाजाची नेमकी नस लेखक-कवींना कळत नाही. तसे असेल तर पुढील काळात लेखनात सातत्य राखले तर मिलिंद घायवट हे नाव मराठी साहित्यात लक्ष वेधून घेईल. मिलिंद घायवटचा एक लेख वानगीदाखल देत आहे.

## लेणी आणि म्हातारी

पेण तालुक्यातील भोगेश्वरी नदीवर हेटवणे नावाचं एक धरण आहे. हे धरण पेणसोबतच पनवेल व नवी मुंबईची तहान भागवत असतं.

ह्या धरणाच्या पात्रात अपूर्ण अवस्थेत असलेली व सध्या पूर्ण दुर्लक्षित अशी एक लेणी आहे. ही कोणी आणि कधी बांधली हे सांगणारा कोणताही शिलालेख आज तिथे उपलब्ध नसला तरी लेण्याच्या रचनेवरून, शैलीवरून व तिथे असलेल्या स्तुपांवरून, ती बौद्ध लेणी असल्याचा निष्कर्ष सहज काढता येतो. ही लेणी धरणाच्या पात्रात असल्यानं वर्षातून निदान आठ-नऊ महिने तरी पूर्णपणे पाण्याखालीच असते. धरणानजीकच असलेल्या वाक्रुळ गावावरून सदर लेणी वाक्रुळची बौद्ध लेणी म्हणून हळूहळू परिचित होऊ पाहते आहे.

बऱ्याच वर्षांपासून माझ्या मित्रयादीत असलेले गडकिल्ले, रानवाटांमध्ये रमणारे, फुलं, झाडं, पक्ष्यांशी संवाद साधणारे, फोटोमधून निसर्गाला बोलतं करू पाहणारे लेणीअभ्यासक प्रभाकर जोगदंडसरांच्या सांगण्यावरून मीदेखील त्यांच्या MBCPR (Movement of Buddhist Caves Preservation Restoration) टीमसोबत लेणीअभ्यासासाठी निघालो होतो. आपला सांस्कृतिक वारसा व वास्तुसौंदर्याचे उत्कृष्ट कलाकृती असलेल्या बहुतांश लेण्या त्यांची निर्मितीकथा आणि इतिहास आजही जनमानसापर्यंत पोहोचले नाही. तो वारसा जपण्यासाठी व पुढे पोहोचवण्यासाठी MBCPR लेणी संवर्धनाच काम करते.

खोपोलीहून पुढे पेणच्या दिशेनं आपल्या वाहनाने वाक्रुळ-मधल्या खरबाच्या वाडीपर्यंत जाता येतं. पुढे तासाभराची पायपीट करत लेण्यापर्यंत पोहोचता येतं. आम्ही तीस जणांनी मजल-दरमजल करत लेण्याकडे मार्गक्रमण करायला सुरुवात केली आणि एका बऱ्यापैकी निसरडा उतार असेलेल्या वाटेनं आपली कमाल दाखवायला सुरुवात केली. प्रत्येकाच्या पायात स्पोर्ट्स शूज असले तरी उतरताना घसरगुंडी सुरू झाली होती. 'आताशी तर सुरुवात झालेय, उतरताना एकवेळ ठीक पण चढण चढताना तर धापा टाकायला लागाल,' म्हणत जुने सहकारी पहिल्यांदाच आलेल्यांची टर उडवत होते.

तेवढ्यात एक म्हातारी दिसली. ऐंशी-पंच्याऐंशीच्या आसपासची. आमची टीम रस्ता उतरतेय म्हणून पायवाटेवरून थोडंसं बाजूला होऊन हातातल्या काठीच्या आधारानं कसाबसा आपला तोल सावरू पाहत होती. तिच्या डोक्यावर पाण्यानं भरलेली कळशी होती. आम्हाला धड उभं राहणं मुश्किल तिथे ही ऐंशी वर्षाची म्हातारी डोक्यावर भरलेली कळशी घेऊन निसरड्या चढावावर उभी. काळजात चर्रर झालं!

काही बोलायच्या आतचं तिच्याकडून कळशी घेतली.

'आजी, तू कशाला आली मरायला? या उतारावर उभं राहता येत नाही आणि चालली मोठी पाणी भरायला. घरातले



पाणी देणार नाहीत का तुला? स्वतःचा जीव सांभाळायचा ना!'

असं रागानंच म्हणत कळशी घेऊन चढ चढायला लागलो. म्हातारी मागाहून हळूहळू काठी टेकवत टेकवत आली. तिला दमा असवा. म्हातारीनं घर दाखवलं. तिथवर कळशी पोहोचवली, घरात कोणीच दिसलं नाही. पुन्हा तिला प्रश्न केले,

'घरातले कुठेत? मुलं बाळं, नातवंड?'

'म्हातारा आहे. लेकरंही आहेत पन आपापल्या संसारात. तालुक्याला राहतात. आम्ही हायेत इथं. एकमेकाला आधार. जितकं जमल तितकं राबू, जवर झिजता येईल तवर झिजू.'

सोबतची माणसं बरीच पुढे निघून गेलेली, आणि मलाही रस्त्याचा अंदाज नसल्यानं तिकडून आल्यावर येतो म्हणून निघालो. जंगलातून, कड्या-कपारींतून चढउतार करत लेण्यापर्यंत पोहोचलो. धरणपरिसरातील निसर्गसौंदर्याचा आविष्कार अप्रतिम होता. धरण आणि आजूबाजूचा परिसर डोळ्यांचं पारणं फेडत होता. लेणी अपूर्ण होती. मात्र तरीही तिथली शांतता प्रफुल्लित आणि उत्साहवर्धक होती. सर्वांनी मिळून लेण्याच्या अवतीभोवती असलेला पसारा साफ केला, व्यवस्थित चढता यावं ह्यासाठी तिथल्याच भल्यामोठ्या दगडांना हलवून त्यांची पायरीसदृश व्यवस्थित मांडणी केली. जुन्या सदस्यांनी लेण्याच्या देदीप्यमान इतिहासाची उजळणी केली. बऱ्याच सदस्यांनी खाण्यापिण्याच्या गोष्टी सोबत आणल्या असल्या तरी जवळचं प्यायचं पाणी संपल्यानं आता मात्र परतीची ओढ लागली होती.

बऱ्याच उशिरानं परतीला निघालो, वाटेत एका डेरेदार आंब्याच्या वृक्षाखाली मिळून मिसळून डबे खाल्ले. पुढे येऊन त्या विहिरीत जमा झालेलं पाणी पोहऱ्याने काढून तृप्त होईस्तोवर प्यायलो. मध्येच त्या आज्जीचा विचार डोक्यात चमकला. कसं बरं पाणी खेचत असेल ती? की देत असेल तिला कोणीतरी पाणी काढून?

म्हातारीच्या घरी आलो. पंचायतीकडून कुठल्याशा योजनेअंतर्गत घर बांधून मिळालेलं, म्हणून सिमेंटमध्ये बांधकाम असलेलं ठीकठाक असं घर होतं. मागे भलं मोठं आवार. आवारात आंब्याची, जांभळांची बरीच झाडं होती. मागे आवारात गेलो. म्हातारा कुऱ्हाडीनं लाकडं फोडत होता. काळी तुकतुकीत सुरकुतलेली कातडी, हातापायाच्या काड्या, पोटं खपाटीला गेलेलं, छातीची एकूणएक बरगडी मोजता येईल आणि अख्ख्या अंगावर मोजून अर्धा किलो मांस भरणार नाही अशी म्हाताऱ्याची अवस्था. बोलायचं काय काहीच उमजत नव्हतं. फक्त पाण्याचंच काय, ह्यांच्या आयुष्यात तर सगळीकडून अंधारच अंधार होता.

जरासं बोलणं झाल्यावर काही मदत करता येईल का ह्या हेतूनं, आजूबाजूचा एखादा गरजू किंवा कोणी मदत म्हणून किंवा पैसे घेऊन दिवसाला दोनेक खेपा पाणी आणून देईल का म्हणून विचारलं. तर म्हातारीनं 'नाय बा' म्हणत मान हलवली, जिथं स्वतः च्या लेकरांना जड झालो तिथं परकं कोण बर आमचं वझं वाहणार?'

चला, प्रयत्न तर करून पाहूयात म्हणून आजुबाजूच्या घरांत बोलून अंदाज घेतला.

धरण पायथ्याशी असलं तरी पूर्ण पाडा पाण्यासाठी विहिरीवरच अवलंबून असल्याचं कळलं. ती विहीरसुद्धा पूर्ण आटलीय. एकेका हंड्यासाठी रात्र रात्रभर लेकराबाळांसकट नंबर लावून तिथं बसावं लागतं. पंचायतीनं पाइप टाकले असले तरी त्यातून पाणी कधी येणार ह्याबद्दल काही शाश्वती नाही. म्हातारीबद्दल कितीही कळवळा वाटतं असला, दया वाटत असली तरी जिथे स्वतःचं भागत नाही तिथे दुसऱ्यांचं काय करणार, अशी एकंदर परिस्थिती होती, हतबलता होती.

ह्यांच्या डोळ्यांसमोरच्या धरणातलं पाणी वापरणारे आपण, आणि पिण्याच्या पाण्यासाठीही व्याकूळ झालेले ते..

फ्लश करण्यासाठी सेकंदात दोन-तीन लिटर पाणी वापरणारे आपण, आणि थेंब थेंब पाण्यासाठी रात्रभर जागरण करणारे ते..

उशीर होत होता. आता निघणं भाग होतं. म्हातारीचा निरोप घेताना डोळ्यांत डोळे भिडवायची हिंमत मात्र नव्हती. घसा सुकला होता. 'येईन पुन्हा भेटायला' म्हणत निरोप घेतला.

पंधरा दिवस होऊन गेले ह्या गोष्टीला, मात्र ती म्हातारी आज्जी, तो पाडा, तो निसरडा चढ आणि ती विहीर अजूनही डोक्यात काहूर मांडताहेत. आपण स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव साजरा करतोय आणि कितीतरी पाडे, वाड्या आहेत जिथे पिण्यासाठी साधं पाणी पोहोचलं नाहीये, गावाशिवाराला जोडणारे रस्ते पोहोचले नाहीयेत.. खायच्याप्यायच्या मूलभूत गोष्टींसाठीच इतका मोठा संघर्ष, बाकी सुखसुविधा तर दूरच..

एकीकडे टोलेगंज टॉवर.. सुखसोईंच्या नावानं मोठमोठाले ब्रिज तासाभरात शहरं ओलांडणारी हायस्पीड ट्रेन तंत्रज्ञानाच्या जोरावर तयार होणारे कोस्टल मार्ग..

आणि एकीकडे प्राथमिक सुविधांपासून कित्येक वर्षांचं अंतर राखून असलेले हे पाडे.

जिथे तंत्रज्ञानाचा गंध नाही, प्रगतीची कल्पना नाही, विकास कशाला म्हणतात, तो कसा असतो ह्याचा थांगपत्ता नाही. पाणी नाही, वीज नाही, दळणवळणाची साधनं नाहीत. आरोग्याच्या प्राथमिक सुविधा नाहीत. शाळा असल्या तरी त्यात शिक्षक नाहीत. आणि तिथे असणारी म्हातारीसारखी आयुष्याची माती झालेली मातीतली माणसं. जितकं मिळालंय, जे आहे त्यात आनंद मानून राहणारी..

कसली आशा नाही, कसली अपेक्षा नाही,

खोल खोल गेलेल्या डोळ्यांमध्ये कसलीच स्वप्नं नाहीत. दिवस ढकलत आयुष्य ढकलायचं.

नाळ कायम मातीशी जुळलेली... त्यांना वेळेनुसार नाही बदलता आलं.. किंवा ती बदलली नाहीत कारण त्यांना माती सोडायची नसते म्हणून अशी माणसं मुलं शहरात गेली तरी पाड्यातच राहतात. कारण त्याना त्यांचं मूल निवास महत्त्वाचं वाटतं. निसर्गाशी एकरुप झालेली ही माणसं म्हणजेच निसर्ग आहेत, निसर्गाचा एक भाग आहेत. या काळाची लेणी आहेत. आणि नव्या युगाला नेमकी त्यांचीच अडगळ वाटू लागली आहे. म्हातारी आणि लेणी आता एकटी, एकाकी झाली आहेत, श्वास चालूय म्हणून जिवंत मात्र सुखी दिवसाच्या इच्छाआकांक्षा कधीच संपलेली चालतीबोलती मढी.

भल्यामोठ्या डोंगरांमध्ये कोरलेली दुर्लभ अशी ऐतिहासिक लेणी असो किंवा आपल्या रोजच्या जगण्यात आढळून येणारी ही म्हातारी माणसं- संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या ह्या दोन्ही घटकांना आपण दुर्लक्षित केलं आणि दोन्ही घटक जणू शेवटची घटका मोजू लागले.

त्यांना जपायला हवं, त्यांना जोपासायला हवं.

त्यांच्यामध्ये आपल्या संस्कृतीच्या वैभवाची चिन्हं आहेत, त्यांच्याकडे पर्यावरणाचं अमोघ ज्ञान आहे, जमिनीवर आलेला कीटक पाहून ते सांगतात कधी पाऊस येईल, पक्षी पाहून सांगतात या वर्षी दुष्काळ येईल. ही माणसं आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा आहे.

पुढारलेल्या तंत्रज्ञानाच्या जोरावर आपण कितीही उड्या मारत असलो तरी त्या तंत्रज्ञानातला फोलपणा कोरोनासारख्या एवढ्याशा विषाणूनं उघड केला. म्हणूनच तंत्रज्ञान कितीही प्रगत झालं तरी आपल्याला हा वारसा जपणं क्रमप्राप्त आहे.

म्हणूनच लेणी असो वा मूल निवासी आदिवासी पाडे आणि त्यातली माणसं.. त्याना सांभाळण्याची गरज आहे.

**- मिलिंद घायवट**
manmilind@gmail.com

**- किरण येले**
kiran.yele@gmail.com

# मेंदूची रहस्ये उलगडणाऱ्या गप्पा

शनिवार, ३ जून २०२३ रोजी ग्रंथाली-प्रतिभांगणच्या 'आरोग्याची कॅप्सुल' या उपक्रमात नाशिक येथील सुप्रसिद्ध मेंदूशल्यविशारद डॉ. महेश करंदीकर यांच्या मुलाखतीचा कार्यक्रम झाला. डॉ. सतीश नाईक यांच्याशी झालेल्या या संवादामध्ये डॉ. करंदीकरांनी मानवी मेंदूच्या विविध रहस्यांबद्दल आणि मेंदूच्या आरोग्याविषयी माहिती दिली. वैद्यकीय शिक्षण आणि मेंदू या विषयातील उच्च शिक्षण घेतल्यावर त्यांनी नाशिकमध्ये अद्ययावत मेंदू शस्त्रक्रिया करणारे रुग्णालय सुरू केले. अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वैद्यकीय परिषदांमध्ये त्यांनी संशोधनपर व्याख्याने व सादरीकरणे केली आहेत.

'सर्व मानवी मेंदूची रचना सारखी असली तरी प्रत्येकाचा मेंदू वेगळ्याप्रकारे कार्य करतो. मेंदू सर्व शरीरातील क्रिया-प्रतिक्रियांचे संचालन करतो. त्याचे उजवे व डावे भाग वेगवेगळ्या कारणांसाठी वापरले जातात. उजवा भाग विचार, भावना यांचे नियंत्रण करतो तर डावा भाग निर्णयप्रक्रिया, वैचारिक मुद्यांशी संबंधित बाबींसाठी वापरला जातो. या दोन्ही भागांत ज्याची सूसुत्रता चांगली असते त्याला स्वतःची प्रगती चांगल्या प्रकारे करता येते. मेंदूच्या विविध भागांत असणारी जैवरसायने वेगवेगळ्या कामांसाठी उपयुक्त असतात. सध्या मेंदूच्या विविध क्रियांविषयी सखोल संशोधन सुरू असले तरी हजारो वर्षांपूर्वी भारतीय अभ्यासकांनी या विषयी बरेच काम केले आहे,' असे डॉ. करंदीकर यांनी सांगितले. महाभारतातील दुर्योधन व कृष्णसंवादाच्या आधारे त्यांनी विषद करून सांगितले की विचार आणि कृती यामध्ये मेंदूच्या वेगवेगळ्या प्रक्रियांमुळे वेगवेगळ्या शक्यता संभवतात. योग्य आहार, नियमित व्यायाम, निसर्गाचे सान्निध्य यामुळे मेंदूचे आरोग्य उत्तम राहते. ज्याप्रमाणे कॉम्प्युटरमध्ये एकावेळी अनेक फाइल उघडल्या, अनेक सॉफ्टवेअर चालू केली तर कॉम्प्युटर हॅंग होतो, त्याप्रमाणे एकावेळी अनेक कामे करणे, विविध गोष्टींचा विचार करणे यामुळे आपल्या मेंदूवर ताण येऊन त्याचे आरोग्य बिघडू शकते. मेंदूच्या स्वास्थ्यासाठी रागावर नियंत्रण व त्याचा योग्य निचरा करणे आवश्यक आहे.



डॉ. महेश करंदीकर यांच्याशी संवाद करताना डॉ. सतीश नाईक

स्मरणशक्तीशी संबंधित समस्या व मानसिक आजार, पार्किन्सन आजार या विषयी डॉ. करंदीकर यांनी माहिती सांगितली. मेंदूतील पेशी मृत झाल्या की परत नवीन तयार होत नाहीत. त्यामुळे मेंदूची शस्त्रक्रिया करणे तुलनेने जास्त अवघड असते. आता नव्या तंत्रज्ञान व संशोधनामुळे मेंदूवरील उपचार व शस्त्रक्रिया खूपच सोपी झाली आहे. त्यामुळे मेंदूशी संबंधित आजार असणाऱ्या व्यक्ती व त्यांच्या कुटुंबीयांनी घाबरून जाण्याची आवश्यकता नाही, असे त्यांनी सांगितले.

अपेक्षा आणि वस्तुस्थिती या दोन्हीत फरक असतो तेव्हा मन व मेंदूत तणाव तयार होते. अशावेळी वस्तुस्थितीत बदल करण्यापेक्षा अपेक्षांमध्ये बदल केला पाहिजे हे विविध उपनिषदांमध्ये सांगितले आहे. आपण जितके जास्त शिकतो तितकी आपल्याला किती कमी माहिती आहे हे समजते. आधुनिक वैद्यकशास्त्र आणि भारतीय तत्त्वज्ञान या दोन्हींचा सखोल अभ्यास व चिंतन केले असल्याने डॉ. करंदीकर यांनी अतिशय सोप्या भाषेत मेंदू व संबंधित बाबींविषयी माहिती सांगितली.

अतिशय रंगलेल्या या कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांनाही डॉ. करंदीकर यांनी उत्तरे दिली. •

ग्रंथाली

**अलवार**

**ऋग्वेद**




कवितासंग्रह

**मूल्य २०० रु.**

**सवलतीत १२० रु.**

# टीजेएसबीचे अध्यक्ष शरद गांगल यांच्याशी संवाद




शरद गांगल यांच्याशी संवाद साधताना ज्ञानेश चांदेकर

महाराष्ट्रातील सहकारक्षेत्रामध्ये सहकारी बँका हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. सहकारी बँक क्षेत्रातील चार नंबरच्या स्थानावर असलेल्या टीजेएसबी बँकेचे अध्यक्ष शरद गांगल यांची मुलाखत सोमवार, १२ जून २०२३ रोजी कॉर्पोरेट गप्पा या उपक्रमात ग्रंथाली-प्रतिभांगण, वांद्रे येथे झाली.

थरमॅक्स, कॅडबरीज अशा विविध कंपन्यांमध्ये उच्चपदावर काम केल्यावर शरद गांगल हे टीजेएसबी या अग्रगण्य शहरी सहकारी बँकेमध्ये काही वर्षे संचालक म्हणून व आता अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी सहकारी बँक इतर बँकांपेक्षा वेगळी कशी आहे याबद्दल माहिती दिली. भागधारक आणि कर्जदार हे दोन घटक सहकारी बँकांसाठी महत्त्वाचे असतात. छोट्या कर्जदारांना सहकारी बँकांचा मोठा आधार असतो. सामान्य नागरिक आपले पैसे गुंतवून सहकारी बँकेचे भागभांडवल विकत घेतो. हे सांगतानाच गांगल यांनी पुढील दुर्दैवी वस्तुस्थितीही सांगितली. सहकारी बँक एखाद्या छोट्या उद्योजकाला कर्जसंदर्भात वेळोवेळी मदत करते. त्याच्या व्यवसायाच्या सुरुवातीच्या चढउतारांमध्ये साथ देते. परंतु जेव्हा त्याचा उद्योग मोठा होतो व त्याला जास्त रकमेची आवश्यकता लागते तेव्हा सहकारी बँक त्यांच्यावर असलेल्या निर्बंधांमुळे तेवढी मदत करू शकत नाही. याचा परिणाम म्हणजे मनात नसूनही या व्यवसायिकाला खाजगी किंवा राष्ट्रीय बँकेकडे जावे लागते.

कोविड साथीमध्ये अनेक उद्योगांचे नुकसान झाले. त्यावेळी बुडालेल्या व्यवसायाचे पडसाद कोविड संपल्यावरही जाणवत आहेत व त्याचा परिणाम त्यांनी बँकांच्या कर्जाचे हप्ते फेडण्यावरही होत आहे असे गांगल यांनी सांगितले. या गप्पांमध्ये एन.पी.ए, नेट इंटरेस्ट मार्जिन, कॅपिटल डिक्रेसी रेशो, सी डी रेशो अशा बँकिंग व्यवसायातील संकल्पना त्यांनी सोप्या भाषेत समजावून सांगितल्या.

शरद गांगल यांची पार्श्वभूमी मानवसंसाधन (एच. आर.) विभागातील कामाची असल्याने त्यांनी टीजेएसबी बँकेच्या कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणामध्ये ग्राहकाशी कसे वागावे याविषयीची ठरावीक मुद्दे समाविष्ट केले आहेत. निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जागी नवीन लोक घेण्यासाठी त्यांनी एक नियोजनपूर्वक योजना केली आणि त्याचा चांगला फायदा बँकेला झाला.

रिझर्व्ह बँकेचा सहकारी बँकांकडे बघण्याचा दृष्टिकोन काहीसा सावत्रपणाचा आहे. अनेक बंधने व अडचणी सहकारी बँकांच्या प्रगतीमध्ये येत असतात. मात्र त्यावरही मात करून टीजेएसबी निर्धाराने आपला कारभार वाढवत आहे. ३१ मार्चला आर्थिक वर्ष संपल्यावर बँकेचे ऑडिटेड अकाउंट १० एप्रिलच्या आत पूर्ण होतात ही परंपरा गेली १२ वर्षे सुरू आहे असे त्यांनी अभिमानाने सांगितले. बँकेच्या नेट प्रॉफिटपैकी एक टक्का इतकी रक्कम सामाजिक संस्थांना मदत म्हणून दिली जाते.

शरद गांगल सहकार भारतीच्या माध्यमातून छोट्या बँकांना प्रशिक्षणस्वरूपात मदत करतात. तसेच, ते विद्यार्थी विकास योजना या उपक्रमातून हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक मदतीच्या कामात सहभागी होतात. वैद्यकीय शिक्षणापासून परदेशी उच्चशिक्षणापर्यंत सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी ही मदत केली जाते व त्यातून गरजू हुशार मुलांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी भक्कम पाया तयार केला जातो.

या मुलाखतीत शरद गांगल यांनी बँकिंग क्षेत्राप्रमाणेच भारतीय अर्थकारण, समाजकारण या विषयांवरही आपले विचार मोकळेपणाने मांडले. तसेच, उपस्थितांच्या काही प्रश्नांनाही उत्तरे दिली. ●

ग्रंथाली




**माझी कॉर्पोरेट दिंडी**

**माधव जोशी**

लेखकाच्या पन्नास वर्षांच्या कॉर्पोरेट वाटचालीवर, भेटलेल्या व्यक्तींवर-सहकाऱ्यांवर आधारित आत्मकथन.


**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**

**युक्तीच्या गोष्ट सांगणाऱ्याची गोष्ट**

**शिल्पा शिवलकर**

अनेक उद्योगांना युक्तीच्या गोष्टी सांगणारे आत्मकथन.

**मूल्य ३०० रु. सवलतीत १८० रु.**



# 'भविष्यवेधी लेखन व्हावे' – डॉ. अभय बंग

'कथाकार शांताराम' ह्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ग्रंथाली, डॉ. श्रीरंग पुरोहित कुटुंबीय आणि नॅशनल लायब्ररी, वांद्रे ह्यांच्या संयुक्त विद्यमाने 'कथा' हा विषय घेऊन एकदिवसीय वाङ्मयीन सोहळा नुकताच आयोजित करण्यात आला. १५ जून रोजी दिवसभराच्या या समारंभात संध्याकाळचे तिसरे सत्र नॅशनल लायब्ररी, वांद्रे येथे संपन्न झाले. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या आणि रसिकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत संपन्न झाले.


शांताराम ऊर्फ के. ज. पुरोहित ह्यांनी रेखाटलेली आपल्या मित्रांची व्यक्तिचित्रे 'मित्रास्त' पुस्तकांतर्गत संपादित करण्याचे मोलाचे काम त्यांचे सुपुत्र डॉ. श्रीरंग पुरोहित ह्यांनी केले. त्याचे प्रकाशन निमंत्रित मान्यवर न्या. नरेंद्र चपळगावकर, डॉ. अभय बंग, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. सुरेखा सबनीस, डॉ. श्रीरंग पुरोहित, प्रमोद महाडिक, सुदेश हिंगलासपूरकर ह्यांच्या हस्ते करण्यात आले.

कालभेदी शक्ती असते. ज्यूल्स व्हर्न, शरदचंद्र चट्टोपाध्याय, रविंद्रनाथ टागोर यांच्या कादंबऱ्यांमध्ये भविष्यात घडलेल्या मोठ्या घटनांसारख्या परिस्थितीचे कथानक दिसून येते. जॉर्ज ऑर्वेल यांच्या 'नाईन्टिन एटीफोर' आणि ऑल्डस हक्स्ले यांच्या 'ब्रेव्ह न्यू वर्ल्ड' या कादंबऱ्यांमध्ये वर्णन केल्याप्रमाणे भयंकर वास्तव सध्या जगभरात दिसून येत आहे असे डॉ. बंग यांनी सांगितले. मराठी साहित्यिकांनी अशा प्रकारचे भविष्यवेधी साहित्य लिहिले पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

१९७० साली समाजात आजच्या प्रमाणेच भ्रष्टाचार, बेरोजगारी, महागाई वाढली होती. परंतु तेव्हा ज्याप्रमाणे तरुणांनी, सामान्य नागरिकांनी आंदोलनाचा मार्ग धरला तसे आज होताना दिसत नाही. हातातील मोबाइलमुळे तरुणांना समस्यांची जाणीवच होत नाही. लोकांना लोकशाही नाही तर भोगशाही हवी आहे. मराठी साहित्य भूतकाळ व वर्तमानाचे



डॉ. सुरेखा सबनीस



डॉ. अभय बंग



न्या. नरेंद्र चपळगावकर



डॉ. रवींद्र शोभणे

यावेळी वक्ते न्या. चपळगावकर, डॉ. सबनीस, डॉ. शोभणे ह्यांनी के.ज. पुरोहित ह्यांच्या सहवासातील आपल्या स्मृतींना उजाळा दिला. चपळगावकर यांनी के.ज. पुरोहित यांच्या कथांचे मर्म सांगत असलेल्या जुन्या संबंधांच्या आठवणींना मराठी साहित्यविश्वातील कथा ह्या साहित्यप्रकाराचा प्रवास उलगडून सांगितला. नाट्यछटा, खंडकाव्य आदी साहित्यप्रकार लुप्त झाले त्याप्रमाणे कथा हा साहित्यप्रकार लुप्त होईल अशी भीती मला वाटत नाही. कारण समाजात कटुता वाढत असली तरी सकारात्मकतेचा, चांगुलपणाचा विचार नागरिकांपर्यंत पोहोचवत राहण्याचे सामर्थ्य लघुकथेमध्ये आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.

डॉ. अभय बंग ह्यांनी पुरोहितांच्या कथावैशिष्ट्यांबद्दल बोलताना आजच्या मराठी कथाप्रकारातून आणि इतरही लेखनप्रकारांतून, साहित्यिकांकडून आणखी नवे काय अपेक्षित आहे, ह्याबद्दल आपली स्पष्ट मते मांडली. साहित्यिकांना भविष्यामध्ये काय होणार आहे याचे भाकीत करण्याची

दर्शन फार उत्तमरित्या घडवते, पण भविष्याचा वेध ते घेताना दिसत नाही. आजच्या साहित्यिकांनी आमचा उद्या कसा असेल आणि तो बदलावा कसा हे दाखवणारे लेखन करावे, अशी अपेक्षा डॉ. बंग यांनी व्यक्त केली.

ह्या सत्राची सुरुवात 'कथाकार शांताराम' ह्यांच्यावरील एका लघुपटाने झाली. डॉ. सुरेखा सबनीस ह्यांनी ह्या सुंदर, माहितीपूर्ण लघुपटाचे लेखन केले आहे. विलास कारेकर ह्यांनी तो दिग्दर्शित केला आहे. रंगभूमी आणि चित्रपट क्षेत्रांतील प्रसिद्ध दिग्दर्शक-अभिनेते विजय केंकरे आणि अभिनेत्री मधुरा वेलणकर ह्यांनी शांताराम ह्यांच्या दोन कथांचे उत्तम अभिवाचन करून रसिकांना शांताराम ह्यांच्या कथाविश्वात गुंगवून ठेवले.

डॉ. श्रीरंग पुरोहित ह्यांनी वडील म्हणून आपल्या आयुष्यातील शांतारामांचे स्थान, ह्याबद्दल भावपूर्ण निवेदन केले. ह्या कार्यक्रमाला डॉ. मृण्मयी भजक ह्यांनी एका सुंदर सूत्रात गुंफले.

**पहिल्या सत्रात सहभाग – प्रा. मीना गोखले, डॉ. रवींद्र शोभणे, भारत सासणे, चांगदेव काळे आणि दुसऱ्या सत्रात सहभाग – नीरजा, गणेश मतकरी, मोनिका गजेंद्रगडकर, किरण येले. दोन्ही सत्रांचे सूत्रसंचालन डॉ. निर्मोही फडके**

ग्रंथालीच्या 'प्रतिभांगण' वास्तूत सकाळची दोन सत्रे झाली. पहिल्या सत्रात, 'स्वातंत्र्योत्तर मराठी कथा' ह्या विषयावरील चर्चेचे बीजभाषण ज्येष्ठ साहित्यिक आणि माजी संमेलनाध्यक्ष भारत सासणे ह्यांनी केले स्वातंत्र्योत्तर कालखंड ते आधुनिक कालखंडातील समग्र कथाप्रवाहांच्या टप्प्यांबद्दल ऊहापोह करताना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुरुवातीच्या काळात कथा ही समूहवादी होती. सत्तरच्या दशकापर्यंत तिचा प्रवास व्यक्तिवादाकडे झाला. मनोविश्लेषणात्मक कथा लिहिल्या जाऊ लागल्या. आता हा प्रवास पुन्हा समूहवादाकडे होऊ लागला आहे, असे मत त्यांनी मांडले. यंत्रयुगाचा परिणाम महानगरांवर होऊ लागला आहे. एक असुरक्षिततेची भावना शहरी माणसाच्या मनात व पर्यायाने कथांमध्ये दिसून येत आहे. एकल कुटुंबपद्धतीचेही यात प्रतिबिंब दिसते. स्वतःचा, इतरांचा, भोवतालचा शोध घेताना बुद्धिवादी लेखन की भाववादी लेखन या प्रश्नाला कथालेखक सामोरे गेले आहेत. आधुनिकोत्तर साहित्य हा नवा प्रकार साहित्यविश्वात आला आहे असे निरीक्षण मांडताना त्यांनी कथाकार शांताराम यांच्या साहित्याचाही आढावा घेतला.

त्यानंतर ज्येष्ठ लेखक रवींद्र शोभणे ह्यांनी 'कथेतील नवता' ह्या संकल्पनेबद्दल सोदाहरण चर्चा केली. शांताराम, जी.ए. कुलकर्णी आणि गंगाधर गाडगीळ हे श्रेष्ठ मराठी कथाकार एकाच वर्षी जन्माला आले आणि एकाच वेळी साहित्यविश्वात लिहिते झाले या योगायोगाकडे त्यांनी लक्ष वेधले. मर्ढेकर व गाडगीळांनी नवसाहित्य व नवकथेचा पुरस्कार जोरकसपणे केला. य.गो. जोशी, श्री.म. माटे, कुसुमावती देशपांडे, वा.कृ. चोरघडे, पी. रघुनाथ अशा विविध लेखकांनी वेगळ्या बाजाच्या कथा लिहिल्या. मराठी नवकथेच्या आधी खांडेकर-फडके यांची कथा आदी-मध्य-अंत अशा प्रकारची साचेबद्ध कृत्रिम झाली होती. गाडगीळ, भावे, गोखले, माडगूळकर अशा नवकथाकारांनी याला छेद देऊन कथा लवचीक केली. साठ सालानंतर या चारही लेखकांचे साहित्यलेखन कमी झाले पण शांताराम यांनी मात्र पुढेही सातत्याने लेखन केले असे शोभणे यांनी सांगितले.

ज्येष्ठ साहित्यिक चांगदेव काळे ह्यांनी 'शांताराम' ऊर्फ के. ज. पुरोहित ह्यांच्या निवडक कथांच्या अनुषंगाने त्यांच्या कथावैशिष्ट्यांबद्दल विवेचन केले. शांताराम यांनी जवळजवळ ऐंशी वर्षे लेखन केले. सुरुवातीला फडके-खांडेकर यांचा प्रभाव असलेले लेखन त्यांनी केले तरी लवकरच त्यांच्या लेखनाला स्वतंत्र सूर गवसला. त्यांचा शेवटचा संग्रह २०११मध्ये प्रकाशित झाला. आदिवासी, शेतकरी यापासून शहरी माणसापर्यंत विविध स्तरांतील माणसांवर त्यांनी लेखन केले. काळाच्या ओघात घडलेल्या स्थित्यंतरांचा आलेख त्यांच्या कथेत दिसून येतो. मानवी जीवनातील विसंगतीकडे पाहण्याच्या समजुतदारपणामुळे व आवश्यक तेथे केलेल्या बंडखोरीबद्दल त्यांना वाटणाऱ्या आदरामुळे शांताराम यांची कथा मूल्ययुक्त झाल्या आहेत असे प्रतिपादन त्यांनी केले.

ज्येष्ठ लेखिका आणि विद्यार्थिप्रिय प्राध्यापक मीना गोखले ह्यांनी निवडक मराठी कथा-लेखिकाच्या कथानिर्मितीमागच्या जाणिवांचा वेध घेतला त्यांना सोदाहरण मांडले. सहसा पुरुषांकडून स्त्री साहित्यिक, स्त्री समीक्षक यांच्या योगदानाकडे दुर्लक्ष केले जाते असे निरिक्षण त्यांनी मांडले. १९५० ते २००० या पन्नास वर्षांच्या कालखंडात कथेचा प्रवास विविध अंगांनी झाला आहे. स्त्री लेखिकांनी १९७५ पूर्वी प्रस्थापित मध्यमवर्गाच्या कथा लिहिल्या गेल्या. नंतर दलित, ग्रामीण व प्रादेशिक अशा विविध प्रकारच्या कथा लिहिल्या गेल्या. २००० सालानंतर मात्र सर्व स्तरांतील महिला आपल्या अनुभवांविषयी लिहू लागल्या आहेत. नीलम माणगावे, हिना कौसर खान या नव्या लेखिकांचा प्रातिनिधिक उल्लेख त्यांनी केला. कथा हा दुय्यम साहित्यप्रकार आहे असे मत मांडले जाते त्याचे गोखले यांनी खंडन केले.

भोजनोत्तर दुपारच्या सत्रात 'नव्या वळणावरील मराठी कथा' ह्या शीर्षकांतर्गत झालेल्या चर्चासत्रात प्रसिद्ध लेखिका नीरजा ह्यांनी नव्वदोत्तर लेखिकांच्या तसेच स्वतःच्याही कथालेखनातील स्त्रीवादी भूमिकांबद्दल रसपूर्ण विवेचन करत आपले ठाम विचार मांडले. विभावरी शिरुरकर यांच्यापासून आताच्या मोनिका गजेंद्रगडकर, प्रज्ञा पवार, मनस्विनी

लता रवींद्र यांच्यापर्यंत अनेक लेखिकांनी कथालेखनात आपला ठसा उमटवला आहे. सध्या अनेक लेखिका कथा हा साहित्यप्रकार हाताळत आहेत. या लेखिकांनी आपल्या कथेच्या नायिकांना स्वतःचा आवाज दिला असे त्यांनी सांगितले. या लेखिका शारीरिक संबंधांविषयीही सहजपणे लिहितात. मनाची घुसमट थेटपणे व्यक्त करतात. या लेखिकांनी फँटसीऐवजी जगण्याविषयी लिहिणे पसंत केले आहे. गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर यांनी वेगळ्या प्रकारच्या कथा लिहिल्या आहेत. स्त्रीला जोपर्यंत पुरुषाप्रमाणे मुक्तपणे जगण्याची संधी मिळत नाही तोपर्यंत तिला जागतिक स्तरावरची कलानिर्मिती करणे कठीण असेल असे प्रतिपादन त्यांनी केले. पुरुष कथालेखक बऱ्याचदा स्त्रीकडे आई नाही तर मादी याच भूमिकेत चित्रित करतात. शेवटी स्वतःच्या लेखनातील काही भाग वाचून त्यांनी आपले बीजभाषण पूर्ण केले.

प्रसिद्ध लेखक, सिने-परीक्षक गणेश मतकरी ह्यांनी नव्या वळणावरील नव्या लेखकांबद्दल, विशेषतः सध्या निर्माण होणाऱ्या अमाप बालसाहित्याबद्दल आपली परखड मते व्यक्त केली. सुरुवातीला कथा लिहिणारे लेखक प्रामुख्याने शहरी भागातील असल्याने कथा विषयात नागर अनुभव जास्त होते. त्यावेळी शहर व गावांमध्ये एक दरी होती. परंतु आता इंटरनेटसारख्या माध्यमांमुळे ही दरी नष्ट झाली आहे. त्यामुळे सर्व प्रकारचे अनुभव या लेखनात येताना दिसतात. जयंत पवार यांनी मुंबईतील गिरणगावाचे व तेथील माणसांच्या शोकांतिकेचे वर्णन अतिशय तपशीलवार व परिणामकारकपणे केले आहे. पंकज भोसले याने विश्वामित्र सिंड्रोम या कथासंग्रहामध्ये मध्यमवर्गीयांमध्ये पोर्नोग्राफीने केलेला शिरकाव अशा वेगळ्या विषयावर लेखन केले आहे. शहरांमधील स्पर्धा, गर्दीतील एकाकीपणा, तंत्रज्ञानामुळे निर्माण झालेले ताण यावर लेखन होत आहे. स्वतःच्या आजूबाजूला दिसणाऱ्या गोष्टींवर लिहून मी कथालेखनाची सुरुवात केली असे त्यांनी सांगितले. त्यांच्या कथा महानगरी पार्श्वभूमीच्या असल्या तरी त्यांचा आशय सर्वांसाठी आहे असे त्यांनी मत व्यक्त केले.


प्रसिद्ध कथालेखक मोनिका गजेंद्रगडकर ह्यांनी आपली लेखनप्रक्रिया, तिच्यामागील काही बदलत्या प्रेरणा उलगडताना, नव्या कथालेखिकांच्या लेखनाबद्दल आपली अभ्यासपूर्ण निरीक्षणे विशद केली. नवीन कथा ही प्रयोगशील व लवचीक आहे असे सांगून प्रणव सखदेव, विवेक कडू, शर्मिला फडके, अनिल साबळे अशा लेखकांचा त्यांनी यासंदर्भात उल्लेख केला. स्वतःच्या लेखनाबद्दल त्यांनी सांगितले की त्यांनी स्त्रीवादी वा व्यवस्थेच्या विरोधात लेखन केले नाही. मात्र कुठलीही स्त्री दुबळी नसते हे मी माझ्या कथातून मांडले असे त्यांनी प्रतिपादन केले. स्त्रीचा व धर्माचा काय संबंध असतो, माणसाचा एकटेपणा, दुःख वेगांची आर्तता याविषयी त्यांनी लिहिले आहे. स्वतःच्या कथेचे वर्गीकरण करण्यावर माझा विश्वास नाही आणि कथालेखनाची माझी ऊर्मी कमी झालेली नाही असे प्रतिपादन गजेंद्रगडकर यांनी केले.

लेखकांच्या नव्या पिढीतील आघाडीचे लेखक किरण येले ह्यांनी मराठीच्या नव्या वळणावर असलेल्या कथांमधील दुर्लक्षित प्रदेशांवर आपल्या विवेचनातून प्रकाश टाकला. स्वतःच्या कथा मला कधीच परिपूर्ण वाटत नाहीत. छापून आल्यावरही मला त्यात नवे काही सुचत राहते असे त्यांनी सांगितले. मालिकालेखनातून मला विषयांचे वैविध्य किती असू शकते हे शिकायला मिळाले. कथा सुचणे ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. कथांमधली पात्रे मला आसपास दिसतात. त्यांच्याविषयी विचार करताना मी स्वतःच त्यांच्याजागी असल्याची कल्पना करू लागतो. यातून माझी कथा जन्माला येते, असे येले यांनी सांगितले. लेखकाची कथा वाचकाच्या मनामध्ये सुरू होते तेव्हा ते खरे सृजन आहे असे मला वाटते. सध्याची तरुण मुले काय विचार करत आहेत, समाजापुढे कोणते नवे प्रश्न आहेत याचे प्रतिबिंब मराठी कथेत पुरेशा प्रमाणात पडताना दिसत नाही असे मत येले यांनी मांडले.

ह्या दोन्ही सत्रांचे सूत्रसंचालन डॉ. निर्मोही फडके ह्यांनी केले. निमंत्रितांकरता असलेल्या ह्या खास कथा-चर्चासत्रांकरता अनेक प्रसिद्ध तसेच नवे, लिहिते लेखक, सांस्कृतिक क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

**- महेश खरे**


॥ग्रंथाली॥




**फर्स्ट जून चाईल्ड**

**डॉ. यशवंत इंगळे**

**मूल्य २५० रुपये**
**सवलतीत १५० रुपये**

बालपणीच्या अपार कष्टातून माणसे उभी राहतात. स्वत:च्या जीवनाला शिल्पासारखा आकार देतात, अन् स्वत:ला घुमटाकार देता देता इतर जिद्दी स्त्री-पुरुषांनासुद्ध एक प्रकारे लढण्याची प्रेरणा देऊन जातात. डॉक्टर यशवंत इंगळे यांचे आत्मचरित्र याच चाकोरीतून प्रवास करणारे आहे.

- विश्वास पाटील

## 'शब्दरंग' पुस्तकप्रकाशन

रविवार, १८ जून २०२३ रोजी ग्रंथाली-प्रतिभांगण, वास्तूत हेमंत जोशी लिखित 'शब्दरंग' या कवितासंग्रहाचे प्रकाशन झाले. यावेळी कादंबरीकार, समीक्षक अविनाश कोल्हे, कवी व गजलकार चंद्रशेखर सानेकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. जागतिक साहित्याचे अभ्यासक राजीव श्रीखंडे यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले.

कवितेतील तरलता व कमी शब्दांमध्ये मोठा अर्थ सांगण्याची शक्ती भावत असल्याने मी नेहमी कविता वाचतो. जे सामान्यांना दिसत नाही ते कवी बघू शकतो, असे अविनाश कोल्हे यांनी यावेळी सांगितले.

सुरुवातीला मी चित्रे काढली, पण रेषांना, चित्रांना एक मर्यादा आहे हे मला काही काळानंतर जाणवले. मला व्यक्त करायच्या असलेल्या भावना पुरेशा स्पष्टपणे व्यक्त करण्यासाठी मला शब्दांचा आधार मिळत असे. त्यामुळे मी कविता लिहिल्या असे प्रतिपादन कवी हेमंत जोशी यांनी केले.

कविता लिहिणे सोपे आहे पण कवितेबद्दल लिहिणे खूप कठीण असते. कमी रेषांमध्ये मोठा अर्थ सांगणारे चित्र आणि कमी शब्दांमध्ये तेच करणारी कविता या दोन्हींतील साम्यामुळे मला जोशींची कविता विशेष वाटली. जमीन व आकाश यांच्यामधली क्षितिजाची रेष जोशी यांना खुणावते. त्या रेषेपलीकडे जाण्यासाठी त्यांना कविता मदत करत असावी असे मत सानेकर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष राजीव श्रीखंडे यांनी संदिग्धता हा कलेचा मोठा गुण आहे असे सांगितले. कोणतीही कला ही अनुभवण्याची बाब आहे, कळण्याची नाही असे ते म्हणाले. मराठी माणसाने आपली आत्ममग्नता सोडून जगाच्या क्षितिजावर आपले साहित्य नेले पाहिजे अशी अपेक्षा श्रीखंडे यांनी व्यक्त केली.

या कार्यक्रमाला रसिकांनी भरघोस प्रतिसाद दिला. डॉ. लतिका भानुशाली यांनी अभ्यासपूर्ण व नेटके सूत्रसंचालन केले.

●

## 'आरोग्याची कॅप्सुल' उपक्रमात मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शाश्वत शेरे यांची मुलाखत

शुक्रवार, २३ जून २०२३ रोजी ग्रंथाली-प्रतिभांगण येथे 'आरोग्याची कॅप्सुल' या उपक्रमामध्ये रत्नागिरी येथील सामाजिक मनोविकारतज्ज्ञ डॉ. शाश्वत शेरे यांची मुलाखत आयोजित करण्यात आली होती.

मनाच्या आरोग्यासाठी शांत झोप अत्यावश्यक आहे. सध्या मोबाइल, टीव्ही यामुळे आबालवृद्धांची झोप कमी झाली आहे. मोबाइल-टीव्हीवर हिंसाचाराविषयीच्या कार्यक्रमांमुळे संवेदना बोथट होतात. मनामध्ये नकारात्मक भावना बळावतात. त्यामुळे या गोष्टींमध्ये कमीत कमी वेळ घालवला पाहिजे, असे डॉ. शेरे यांनी सांगितले. मानसिक आजार हे शरीराच्या आजाराप्रमाणेच आहेत हे समाजामध्ये समजण्याची आवश्यकता आहे. याविषयीचे भान नसल्यामुळे त्या उपचारांविषयी अनेक गैरसमज आहेत. एखाद्या व्यक्तीच्या विचार, वर्तनामध्ये अचानक बदल व्हायला लागले तर त्याला मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घ्यायला हवा. मानवी मनामध्ये नकारात्मक गोष्टी पटकन लक्षात ठेवण्याची नैसर्गिक प्रवृत्ती असते. समूहामध्ये असताना या नकारात्मक भावनांचा सहज प्रसार होतो. समाज-माध्यमांमधूनही हेच होताना आपण अनुभवत आहोत. मुलांच्या मानसिक समस्यांमध्ये पालकांनी आपल्या अपेक्षा वास्तववादी ठेवण्याची आवश्यकता असते. विद्यार्थ्यांच्या मानसिक समस्यांप्रमाणेच लग्न-लिव्हइन अशा सहजीवनविषयक तसेच लैंगिक संबंधांमध्येही अनेक मानसिक समस्या दिसून येतात.




डॉ. शाश्वत शेरे यांच्याशी संवाद साधताना डॉ. सतीश नाईक

यामध्ये संवाद व समजूतदारपणा दोघांनीही अवलंबण्याची गरज आहे. वाढलेल्या आयुर्मानामुळे समाजात ज्येष्ठ नागरिकांची संख्या आणि त्यांच्या मानसिक समस्या यांची वाढ होत आहे. यासाठीही ज्येष्ठांनी छंद, समवयस्क व्यक्ती यांच्यामध्ये जास्त वेळ घालवला तर फायदा होऊ शकतो.

मानसिक आजारांपासून दूर राहण्यासाठी पुरेशी व शांत झोप, परस्परांशी मनमोकळा संवाद, नियमित व्यायाम आणि आवश्यक असल्यास कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय मानसोपचारतज्ज्ञांचा सल्ला घेणे याचा नक्की फायदा होऊ शकतो, अशा विविध प्रकारे डॉ. शेरे यांनी या मुलाखतीमध्ये प्रबोधन केले. डॉ. सतीश नाईक यांनी मुद्देसूद चर्चा घडवल्याने श्रोत्यांना या संवादातून उत्तम माहिती मिळाली. ●

# 'रानभुलीचे प्रदेश' पुस्तकप्रकाशन

उत्कृष्ट कवयित्री व लेखिका व गायिका म्हणून प्रसिद्ध विजयालक्ष्मी मणेरीकर तथा लक्ष्मीमंगेश यांचे महान संगीतकार पंडित हृदयनाथ मंगेशकर यांच्या चिंतनातून प्रकटलेल्या स्वराविष्काराचे म्हणजेच त्यांनी संगीतबद्ध केलेल्या लोकप्रिय गीतांचे अभ्यासपूर्ण विश्लेषण असलेल्या 'रानभुलीचे प्रदेश' या पुस्तकाचा प्रकाशनसोहळा ज्योती स्टोअर्स व ग्रंथाली, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी सभागृह येथे २ जुलै रोजी संपन्न झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संगणकतज्ज्ञ, समाजसेवक व जगप्रसिद्ध लेखक अच्युत गोडबोले उपस्थित होते. यांच्या हस्ते या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. मंचावर प्रकाशनासाठी सुप्रसिद्ध संगीतकार मिलिंद जोशी, प्रकाशक राजीव बर्वे, ग्रंथालीचे सुदेश हिंगलासपूरकर उपस्थित होते. त्यांचा सन्मान शशांक मणेरीकर व पं. शंकरराव वैरागकर यांच्या हस्ते करण्यात आला.




पंडितजींच्या जीवनावरील एका शॉर्ट फिल्मने सोहळ्याची सुरुवात झाली. सुरुवातीस ग्रंथालीचे प्रमुख विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर यांनी हे पुस्तक करण्यामागील भूमिका स्पष्ट केली तसेच ग्रंथालीचा कार्यालेख प्रस्तुत केला. त्यांच्यानंतर ज्योती स्टोअर्सचे वसंत खैरनार यांनी पुस्तकातील महत्त्वाच्या आणि वैशिष्ट्यपूर्ण नोंदींबद्दल सांगितले.

अखिल भारतीय प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीव बर्वे यांनी आपल्या मनोगतात सांगितले की लेखिकेचा शब्दसंग्रह अफाट आहे. या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे गाण्यांबद्दल घडलेले संगीतकार व कवी यांच्यातील सूर-शब्दांचे नाते, गाण्याच्या जन्मकथा, गाण्यांचे लालित्यपूर्ण व सांगीतिक रसग्रहण असे सगळेच वाचनीय आहे. त्यांनी लक्ष्मीमंगेश यांची दिलिपराज प्रकाशनतर्फे आलेल्या आधीच्या तीन पुस्तकांच्या वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैलीवरही प्रकाशझोत टाकला. यावेळी बोलताना लेखिकेचे याआधी प्रकाशित झालेले हृदयरंग, क्षेमालागी जीव आणि कवितासंग्रहदेखील वाचनप्रेमींनी अवश्य वाचावेत, असेही यावेळी ते म्हणाले.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी अच्युत गोडबोले यांनी आपल्या मनोगतात म्हटले, की हे पुस्तक एवढे सुंदर आहे की मी विजयालक्ष्मीला म्हणेन, की या पुस्तकाचा दुसरा भाग काढावा, इतकी सुंदर वर्णने या पुस्तकात आहेत. त्यांनी एका गाण्यातला एक छोटा भाग वाचून दाखवला. त्यांनी पंडितजींच्या अनेक गाण्यांची वैशिष्ट्ये, त्यातील राग तसेच त्यांच्या काही आठवणी सांगितल्या.

'रानभुलीचे प्रदेश' ह्या पुस्तकाची प्रस्तावना मिलिंद जोशी यांनी लिहिली आहे. त्याबद्दल बोलताना, त्यांनी पुस्तकातील अशा प्रकारचे लेखन म्हणजे माध्यमांतर असते असे सांगितले. संगीतातील सुरांच्या गोष्टी शब्दांकित करणे सोपे निश्चितच नसते. ते एक मोठे आव्हान असते आणि ते आव्हान विजयालक्ष्मी यांनी समर्थपणे पेलले, असे कौतुकाद्गार त्यांनी काढले. पं. हृदयनाथ मंगेशकर यांची गाणी अनवट आहेत त्यामुळे त्याबद्दल लिहिणे तर महाकठीण. हे पुस्तक म्हणजे एक महत्त्वपूर्ण साहित्यधन झाले आहे. हे संगीत नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी या पुस्तकाचा निश्चितच मोलाचा वाटा ठरेल. या पुस्तकाची एक सिरीज लवकरच प्रकाशित करावी असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या भागात विजयालक्ष्मी मणेरीकर यांनी या पुस्तकातील गाणी सादर केली. ज्यात दयाघना, जिवलगा, कसे कसे हसायचे या गाण्यांनी अतिशय भावपूर्ण माहोल तयार झाला होता. तबलासाथ हितेश्वर पाटील तर हार्मोनियमवर सागर कुलकर्णी यांनी संगत केली. या गाण्यांविषयी बोलताना त्यांनी पंडितजींच्या काही आठवणी सांगितल्या. गाण्यातील करुणेतून प्रकट होणारे सौंदर्य याबद्दल सांगितले. कोणत्याही संगीतात कारुण्य जाणवत असेल तर ते उच्च प्रतीचे संगीत असते. लिखाणात, बोलण्यात, गाण्यात संवेदनशीलता असलीच पाहिजे, असे त्या म्हणाल्या. या प्रकाशन सोहळ्यास पं. शंकर वैरागकर, जगदीश वैरागकर, दिलीप फडके, प्रमोद पुराणिक, विनायक रानडे, शंकर बोऱ्हाडे, अर्जुन वेलजाळी,यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने करण्यात आली. कार्यक्रमाचे निवेदन प्रसिद्ध निवेदक महेश गाडगीळ यांनी केले. निवेदक महेश गाडगीळ यांच्या निवेदनशैलीने रसिक श्रोत्यांची मने जिंकली.

**– अरुणा पाटील**

# शिल्पा खेर लिखित ‘योगः कर्मसु कौशलम्’ पुस्तकाचे प्रकाशन

सोमवार, ३ जुलै २०२३ रोजी शिल्पा खेर लिखित ‘योगः कर्मसु कौशलम्’ या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा ग्रंथाली-प्रतिभांगण, बॅन्डस्टॅन्ड, वांद्रे (प.) येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी के.जे. सोमैया महाविद्यालयाच्या भारतीय संस्कृती पीठम्‌च्या माजी संचालक डॉ. कला आचार्य प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.

आपल्या भाषणात आचार्य यांनी योग या विषयाचे आपल्या संस्कृती व समाजामधील महत्त्व सुबोधपणे समजावून सांगितले. योग म्हटल्यावर सर्वांना डोळ्यांसमोर योगासनेच येत असली तरी पातंजलयोगाप्रमाणे वेदांतामधील योग हा महत्त्वपूर्ण भाग आहे, गीतेमध्ये, दुःखापासून वियोग करवतो तो योग अशी योगाची व्याख्या केली आहे असे सांगत त्या म्हणाल्या, शिल्पा खेर यांचे पुस्तक वाचकांना त्यांच्या विषादाच्या क्षणांतून बाहेर कसे पडायचे याचे मार्गदर्शन करते, त्यांनी विविध उदाहरणे देऊन योगाची महती सांगितली आहे.




यानंतर जागतिक कीर्तीचे न्यूरोस्पायनल सर्जन डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. पुस्तकाच्या लेखिका शिल्पा खेर यांनी या पुस्तकाच्या लेखनामागील भूमिका स्पष्ट करून सांगितली, ‘आपले शरीर हे रथ, बुद्धी ही सारथी, आत्मा हा रथाचा मालक, आपली इंद्रिये म्हणजे रथाचे घोडे आणि मन हे लगाम असते. घोड्यांकडेच सर्व नियंत्रण असते व सारथी निष्क्रिय असतो तेव्हा सर्वच चुकते. म्हणून बुद्धीकडे मनाचे नियंत्रण असले पाहिजे. हे तत्त्वज्ञान पुराणे व उपनिषदांमध्ये सांगितले आहे. मी त्यांतीलच निवडक ज्ञान या पुस्तकातून वाचकांसमोर ठेवले आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत चोखामेळा अशा संतांनी आपल्या शिकवणुकीतून बुद्धी व मनाचे संतुलन, बंधुभाव ही शिकवण दिली आहे असे खेर यांनी सांगितले. आसने, प्राणायाम या शरीरिक योगाप्रमाणेच मनाचा योगही महत्त्वाचा आहे हे त्यांनी उदाहरणांच्या मदतीने स्पष्ट करून सांगितले.

डॉ. प्रेमानंद रामाणी यांनी आपल्या भाषणामध्ये सध्या जागतिक स्तरावर योग या विषयाचे वाढलेले महत्त्व ही आनंदाची बाब आहे असल्याचे म्हटले. माणसाच्या मनामध्ये असलेल्या अहंभावामुळे बुद्धिमत्ता असूनही त्याच्या हातून चुका होतात असे ते म्हणाले. योग केवळ व्यायाम नसून जीवन जगण्याचे शास्त्र आहे. समाजाच्या सर्व स्तरांतील लाखो व्यक्ती सहभागी होत असलेली म हाराष्ट्राच्या संस्कृतीमध्ये असलेली पंढरपूरच्या वारीची परंपरा म्हणजेच अध्यात्म, असे प्रतिपादन त्यांनी केले. श्रद्धा, प्रेम, आदर, विश्वास आणि समर्पणभाव म्हणजे ज्ञानेश्वर माऊली. आपल्या दैनंदिन जीवनात प्रगती करायची असल्यास अध्यात्माची आवश्यकता आहे. आपली बुद्धिमत्ता व कौशल्य चोखपणे वापरून फळाची अपेक्षा न करता केवळ कर्म केले पाहिजे, असे डॉ. रामाणी यांनी सांगितले. बहुतांश आजार हे मानसिक कारणांमुळे होतात आणि त्यावर कोणतेही वैद्यकीय उपचार उपयोगी नसतात त्यामुळे योगशास्त्राचा अवलंब करून अशा आजारांना दूर ठेवले पाहिजे हे त्यांनी स्वानुभवातून स्पष्ट केले. गुरुशिष्य परंपरा, कुटुंबसंस्था व अध्यात्म हे आपल्या संस्कृतीचे तीन प्रमुख आधारस्तंभ आहेत हे शिल्पा खेर यांनी या पुस्तकात सांगितले आहे. या पुस्तकातील योगविषयक माहिती सर्वांनी वाचली व आचरणात आणली पाहिजे आणि समाजामधील उपेक्षितांना यथाशक्ती मदत केली पाहिजे अशी अपेक्षा त्यांनी यावेळी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सुरस सूत्रसंचालन शोभा नाखरे यांनी केले. सुदेश हिंगलासपूरकर यांनी ग्रंथालीच्या वतीने मनोगत व्यक्त केले. मुखपृष्ठकार चित्रकार सतीश भावसार यांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला.


॥ग्रंथाली॥

**पूर्ण रंगीत छपाई... आर्ट पेपरवर...**





**मूल्य ६०० रु. सवलतीत ३५० रु.**
टपालखर्च वेगळा

**मूल्य ८०० रु.**
**सवलतीत ५०० रु.**
दोन्ही पुस्तकांचा
टपालखर्च वेगळा




**मूल्य १००० रु.**
**सवलतीत ६०० रु.**




**द्वारकानाथ संझगिरी** लिखित
**शतकांत एकच... सचिन**
**Scintillating Sachin**
इंग्रजी रूपांतर - **सतीश मुटाटकर**

## सुनील कर्णिक यांचा पंचाहत्तरीनिमित्त सत्कार

ठाणे मराठी ग्रंथसंग्रहालय आणि ग्रंथाली, सुनील कर्णिक मित्रपरिवार यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ संपादक, पत्रकार सुनील कर्णिक यांचा 'अमृतसत्कार' आयोजित केला होता. २४ जून २०२३ रोजी ठाणे ग्रंथसंग्रहालयाच्या सभागृहात ज्येष्ठ पत्रकार, संपादक कुमार केतकर, निखिल वागळे, कवी महेश केळुसकर, कवयित्री नीरजा, समीक्षक-लेखक विजय तापस, पत्रकार श्रीकांत बोजेवार, प्रवीण धोपट, सुदेश हिंगलासपूरकर यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. यावेळी केतकर, दीपक राजाध्यक्ष आदींनी कर्णिक यांच्याबद्दल विचार मांडले. कर्णिक यांना मानपत्र प्रदान करून पंचाहत्तर हजार रुपयांची थैली देण्यात आली. ही रक्कम कर्णिकांनी एका सामाजिक संस्थेला देत असल्याचे जाहीर केले.

कर्णिकांना एखादा विषय पुस्तकरूपाने यावा असे वाटत असेल तर ते चिकाटीने लेखकाचा पाठपुरावा कसा करताता याचे उदाहरण देताना कुमार केतकर म्हणाले, माझे 'ज्वालामुखीच्या तोंडावर' हे पुस्तक प्रसिद्ध होण्यामागेदेखील कर्णिकांनी माझ्याकडे लिखाणाबाबात केलेला पाठपुरावाही तितकाच महत्त्वाचा आहे.

सत्कारमूर्ती सुनील कर्णिक यांनीही 'मराठी मरू घातलेली भाषा आहे' या वि.का. राजवाडे यांनी अनेक वर्षांपूर्वी केलेल्या विधानाशी मी सहमत असल्याचे सांगताना मराठीचा वाङ्मयाचा प्रसार होण्यात लेखक काही करत नाहीत, अशी खंत व्यक्त केली.

यानिमित्त 'आजचा खरा-खोटा साहित्यव्यवहार' या विषयावर चर्चा घेण्यात आली. विजय तापस, नीरजा यांनी महेश केळुसकर यांच्या 'परखड प्रश्नांना' तितकीच स्पष्ट उत्तरं दिली. मराठीला अभिजात दर्जा दिल्याने काही फरक पडणार नाही. त्यासाठी निधी मिळेल, इतकेच, असे मत तापस यांनी मांडले. मराठी काळानुसार बदलली तशी बदलत राहील, ती संपण्याची धास्ती वाटायचं कारण नाही, असं मत बोजेवार यांनी मांडलं. साहित्य संस्थांमध्ये विशिष्ट विचारधारेची माणसं पेरून आपला अजेंडा चालवण्याचा प्रकार सर्रास सुरू असल्याबद्दल नीरजा यांनी स्पष्ट भूमिका मांडली. कार्यक्रमाच्या सांगतेस निखिल वागळे यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांनी कर्णिक यांच्या संपादनकौशल्याची प्रशंसा केली. भूमिका घेऊन संपादन करणारे आता उरले नाहीत, आता संपादकीत्व मृत होत चालले आहे, असे मत मांडले. संपादक नोकरी जाईल या भीतीने दडपणाखाली काम करत आहेत, ते अपरिपक्व असतात, असे ते म्हणाले. कार्यक्रमात कर्णिकांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेताना, 'सीमांत' संस्थेमार्फत त्यांनी केलेल्या कामाची दखल घेण्यात आली.

●

## 'लगीनघाई' पुस्तकाचे प्रकाशन




फुलराणी प्रकाशनच्या कल्पना संजयराव देशमुख लिखित 'लगीनघाई' या पुस्तकाचे नुकतेच नागपूर येथे प्रकाशन झाले. त्यावेळी संजयराव देशमुख, माजी मंत्री यशोमती ठाकूर, माजी जिल्हापरिषद अध्यक्ष सुनीता गावंडे, माजी महापौर कुंदा विजयकर आणि लेखिका कल्पना देशमुख




# फाशी

## गणेश मनोहर कुलकर्णी

नुकतेच शेखर देशमुख यांच्या ‘शिरच्छेद, फाशी आणि अल्बेर काम्यूचा चिंतननामा’ या पुस्तकाच्या वाचनाने निव्वळ अस्वस्थपणा वाढत गेला. या पुस्तकाचे स्वरूप अल्बेर काम्यूच्या १९५७ साली मूळ फ्रेंच मध्ये लिहिलेल्या आणि नंतर इंग्रजीत अनुवाद केलेल्या रिफ्लेक्शन्स ऑन दी गिलोटीन या निबंधाचा अनुवाद आणि त्या अनुषंगाने देहदंड आणि त्याचा पुराणकाळापासून घेतलेला वेध असे असले; तरी अनुवादकाची ललित लेखनात मुरलेली शैली आपण एखादे प्रसन्न पुस्तक वाचल्याचा अनुभव नक्की देते. पुस्तकाचे स्वरूप अभ्यासपूर्ण, शैक्षणिक आहे. यात बरीचशी तांत्रिक माहितीही असल्याने मधे मधे आपण वाचताना थबकतो. त्यात लेखकाने दिलेल्या तपशिलाने, आकडेवारीने हबकूनही जायला होते.

**शिरच्छेद, फाशी आणि**
**आल्बेर काम्यूचा चिंतननामा**
**अनुवाद : शेखर देशमुख**




फ्रान्समध्ये ही शिक्षा जाहीर स्वरूपात दिली जायची तेव्हा लोकपण आवडीने त्या घटनेचा आनंद घ्यायचे. याच काळात इंग्लंडमध्ये फुटकळ खिसेकापूंनाही देहदंडाची शिक्षा दिली जायची, तेव्हा केलेल्या एका सर्वेक्षणात असे आढळून आले की २५० जणांना तोवर देहदंडाची शिक्षा दिली गेली होती, त्यातल्या १७० जणांनी एक किंवा अधिक वेळा प्रत्यक्ष देहदंडाची शिक्षा बघितली होती. एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस १८८६ साली ब्रिस्टनच्या तुरुंगात १६७ गुन्हेगारांना देहदंड देण्यात आला त्यातल्या तब्बल १६४ जणांनी एकदा तरी या शिक्षेचा नजारा स्वतः अनुभवलेला होता हे वाचताना बधिर व्हायला होते.

गिलोटीन म्हणजे मान कापण्यासाठी बनवलेले हत्यार, त्यात गुन्हेगाराची मान ठेवायची आणि जाहीरपणे कापून टाकायची. कॅथलिक चर्चचा नेहमीच या शिक्षेला पाठिंबा होता. त्यांच्या मते हे दैवी कर्तव्य वगैरे आपण पार पाडत असतो. या पार्श्वभूमीवर, रशियन झारने जल्लादाकरवी फाशी दिल्या जाणाऱ्या गुन्हेगाराला अखेरच्या क्षणी येशूची प्रतिमा घेऊन पाद्री त्याचे सांत्वन करायला येतो तेव्हा तो आरोपी त्या पाद्रीला निघून जायला सांगतो आणि वर हेही ऐकवतो की पावित्र्याचा भंग करू नकोस. येशूला स्वतः याच लोकांनी खिळे ठोकून क्रुसावर चढवले होते, हे कदाचित त्याच्या मनात येत असेल, किंवा स्वतः शिक्षा भोगलेला आपला परमेश्वर आपल्याला कसे वाचवणार हेही त्याच्या मनात तरळत असेल.पण या प्रथेचे समर्थन करणारी ही मंडळी सोयीस्कर अशी भूमिका पापपुण्याच्या संदर्भात घेतात तेव्हा वाईट वाटते, ही अनुवादकाची भूमिका आपल्यालाही भुरळ घालते. खरे तर यात जल्लाद, फाशीची सजा देणारे न्यायाधीश, शेवटच्या क्षणी सोबत करणारे पाद्री किंवा तत्सम लोकांच्या अनेक अनुभवांना अनुवादकाने उत्तम रितीने आणि ओघवत्या शैलीत मांडले आहे. काही काही अनुभव तर अंगावर येतात. म्हणजे एका जल्लादाच्या तलवारीवर ‘हे प्रभो, तूच न्यायदाता आहेस’ असले शब्द कोरलेले होते याचे कारण सुरुवातीपासून देहदंडाच्या शिक्षेला धार्मिक रंगात रंगवलेले आहे. काम्यूच्या वडिलांनी एकदा हा सोहळा याची देही याची डोळा अनुभवला, पण तिथल्या तिथे त्यांना ओकारी आली आणि बरेच दिवस ते या घटनेबद्दल काही बोलायला तयार नव्हते. १७९७ साली सर्वप्रथम या विषयावर चर्चा आणि वाद सुरू झाला. तरीही गुन्हेगारी करणाऱ्याला जाहीरपणे शिक्षा दिल्याने समाजात जरब निर्माण होईल, राजसत्तेचा वचक बसेल अशा अनेक कारणांमुळे ही शिक्षा प्रस्थापित अनेक सरकारांनी सहजपणे अंगीकारली. याचा उद्देश भलेही इतका चांगला असला, तरीही प्रत्यक्षात शिरच्छेदाची किंवा फाशीची जाहीर शिक्षा बघणारा एकही गुन्हेगार आजवर एखाद्या खुनापासून वा तितकाच कठोर गुन्हा करण्यापासून परावृत्त झाल्याचा कोणताही पुरावा उपलब्ध नाही हे अनुवादक आपल्याला अगदी आकडेवारीनुसार पटवून देतो. ९५ टक्के लहान मुलांना मारणारे खुनी मद्यपी असतात असे १९५१ सालचा एक अहवाल सांगतो. १९५३ साली फ्रान्समधल्या अपरिटीफ या मद्य कंपनीचा नक्त फायदा चक्क ४१० लक्ष फ्रँकइतका होता. त्या काळातदेखील दारू हेच सर्व गुन्ह्याचे मूळ आहे असे मानणारा मोठा वर्ग होता. काम्यूने आपल्या निबंधातून गुन्हेगारीच्या या तऱ्हेच्या जाहीर शिक्षेला सतत विरोध केलेला आहे. तब्बल २४ वर्षांनंतर, ९ ऑक्टोबर १९८१ रोजी फ्रान्समध्ये देहदंडाची शिक्षा रद्द झाली.

३१ डिसेंबर २०१४ पर्यंत जगभरातील १९५ देशांपैकी १४० देशांनी देहदंड रद्द केलेला आहे हे वाचतो तेव्हा आपल्याही पोटात गोळा उठलेला असतो. यात युरोपातील सगळे २८ देश सामील आहेत आणि याच कारणाने अबु सालेमला भारतात आणले तरीही फाशी देता येत नाही. आजच्या काळात आशिया खंडातील चीन हा सर्वाधिक देहदंड देणारा देश आहे. पाकिस्तानात २०१५ पर्यंत २०० जणांना फाशीची शिक्षा दिली गेली आहे, आठ हजार जण रांगेत आहेत. भारतात दरवर्षी १२९ जणांना फाशी दिली जाते, राजीव गांधी हत्याप्रकरणात २६ जणांना फाशी दिली गेली किंवा २०२२मधील अहमदाबाद स्फोटात ५६ माणसे ठार झाली होती तेव्हा ३८ जणांना एकाच वेळी फाशीची शिक्षा दिली गेली होती. असले ताजे संदर्भ पुस्तक रोचक बनवते.

जल्लादावरचे प्रकरण तर एकदम भारी उतरले आहे. माणसाची आदिम प्रेरणा खुनशीच असते की काय असे वाटायला लावणारी या प्रकरणातील अनेक उदाहरणे वाचताना हादरून जायला होते. याचबरोबर शिरच्छेद वा फाशीच्या शिक्षेचे बारीकसारिक तपशील, संवेदना गोठवणारे प्रसंग वाचकांपर्यंत पोहोचावेत, शिक्षा झालेल्या हतबल गुन्हेगारांची आणि शिक्षा देणाऱ्या खुनशी शासनसत्तेची तसेच शिक्षेला पाठिंबा देणाऱ्या दुतोंडी समाजाची मानसिकता कळावी, प्रत्यक्ष देहदंडाच्या शिक्षेच्या घटनाक्रमातली भयावहता वाचकांपर्यंत पोहोचून त्याच्यातले माणूसपण जागे व्हावे, त्याच्यातली सद्सदविवेकबुद्धी जागृत व्हावी हा काम्यूच्या निबंधाचा उद्देश होता. त्या उद्देशाची कालसुसंगतता आजही संपलेली नाही, माणूसपण परतून येण्याची शक्यता अद्यापही संपलेली नाही, हा आशावाद प्रस्तुत पुस्तकाच्या निर्मितीतून अनुवादकाला पोहोचवायचा आहे.

अनेक जुन्या जाणत्या लोकांची अवतरणे, किस्से यांनी ठासून भरलेले हे पुस्तक वाचताना जराही कंटाळवाणे होत नाही हे अनुवादकाचे यश. अर्थात इंग्रजी भाषेतील काहीही मराठीत आणताना पसरटपणा टाळता येत नाही ही आपल्या भाषेची गोची. त्यामुळे काही काही ठिकाणी मुद्दे जरा अधिकच लांबले आहेत आणि काही संकल्पना सोप्या करताना पुनरावृत्ती टाळली असती तर पुस्तक अधिक आटोपशीर झाले असते.

या पुस्तकाचे आजच्या काळातील प्रयोजन फारच धाडसी वाटते. आज अनुवादक म्हणतो तसे जगभरात आणि देशातही हिंसा वेगवेगळ्या तऱ्हेने सतत समोर येत आहे, तिला धग देणाऱ्या भोवतालच्या परिस्थितीत मन आणि बुद्धीस हात घालणारे काम्यूचे मुक्तचिंतन विचारी, विवेकी लोकांपर्यंत पोचावे ही अनुवादकाची अपेक्षा आपलीपण होत जाते.

लोकवाङ्मय गृहाने पुस्तक फारच देखणे काढले आहे. समर्पक मुखपृष्ठाने पुस्तकाची जातकुळी हातात घेताक्षणीच जाणवते.

शेवटपर्यंत पुस्तकातील नेमकेपणा जराही इथेतिथे होत नाही हे अनुवादकाच्या आत दडलेल्या संपादकाचे श्रेय आहे!

लोकवाङ्मय प्रकाशन
मूल्य – २०० रुपये

– गणेश मनोहर कुलकर्णी
magnakul169@gmail.com

## मनोज बोरगावकर यांच्या 'नदीष्ट' कादंबरीला 'राष्ट्रभाषा सन्मान पुरस्कार'!




भारतीय भाषांमधील साहित्यकृतीच्या हिंदी अनुवादाला बँक ऑफ बडोदातर्फे 'राष्ट्रभाषा सन्मान पुरस्कार' दिला जातो. यात मराठीमधील मनोज बोरगावकर यांच्या 'नदीष्ट' या कादंबरीला हा पुरस्कार प्राप्त झाला आहे. त्याबद्दल लेखक मनोज बोरगावकर व भाषांतरकार गोरख थोरात यांचे मन:पूर्वक अभिनंदन!



# ग्रंथपरिचय



**अनिल चनाखेकर**
**९४२२२ ९६६५९**

**चिमण्या, टरफले आणि सैगल व इतर एकांक**
**श्रीपाद भालचंद्र जोशी**




**सुवर्णपर्वताच्या पल्याड आणि इतर एकांक**
**श्रीपाद भालचंद्र जोशी**




एकांकिका, एकांक हा प्रकार खऱ्या अर्थाने नागरी महाराष्ट्राची लोककला झालेला आहे. मोठ्या उत्साहाने एकांकिकामहोत्सव साजरे केले जातात व ते सातत्याने होत असतात. एकांकिका, एकांक हे प्रामुख्याने घटनाप्रधान, उत्कर्ष बिंदू साधण्याचे कल या धर्तीच्या असतात. मात्र डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी यांच्या एकांकिका अंतर्मनातील प्रवाहांचा वेध घेत, काव्यात्म पातळीवर ते सारे पोचवतात.

सामाजिक, राजकीय भानदेखील इथे व्यक्त होते. वाक्यरचना साधी, स्वाभाविक; मात्र त्यातील आशय समजून घेऊन तो पोहचवणे हे नटांसाठी आव्हान आहे.

मराठी रंगभूमीचे एक वैशिष्ट्य असे, की बहुतांश ज्येष्ठ व श्रेष्ठ नाटककार हे मुळात तसेच श्रेष्ठ कवीही होते. श्रीपाद भालचंद्र जोशी हेदेखील त्या परंपरेतले कवी आहेत. तसेच, ते संवाद-माध्यम तज्ज्ञ आणि कार्यकर्ते विचारवंत लेखक व विविध चळवळींचे प्रवर्तकही आहेत. सोबतच ते एक महत्त्वाचे, वेगळ्या आशय, शैली, घाट व लेखन प्रयोग करणारे नाट्यलेखकही आहेत.

साधारणतः १९८० च्या दशकात व नंतरच्याही नजीकच्या वर्तमानात लिहिल्या गेलेल्या एकूण दहा एकांकांचा समावेश असणारे दोन एकांकसंग्रह, 'चिमण्या, टरफले आणि सैगल आणि इतर एकांक' व 'सुवर्णपर्वताच्या पल्याड आणि इतर एकांक' नुकतेच प्रकाशित झाले आहेत.

पहिल्या संग्रहात, 'चिमण्या, टरफले आणि सैगल', 'कुठे काय?', 'सुनी' आणि 'आत्महत्या' असे चार एकांक तर दुसऱ्या संग्रहात, 'स्वर्गघटिका', 'लाल कंदील' (हा संपूर्ण मूक एकांक आहे), 'आपण सारे झोपू या', 'फिट-अनफिट', 'सुवर्णपर्वताच्या पल्याड' आणि 'खिडक्या' असे सहा एकांक आहेत.

यातील एका एकांकाचे पूर्वी व आता नव्याने दिल्लीत, हिंदीत अनुवादित, सीसीआरटीमध्ये कमलादेवी चटोपाध्याय सांस्कृतिक महोत्सवात प्रयोगही झाले आहेत. तर दोन एकांकांचे श्राव्य प्रयोग नागपूर आकाशवाणीने पूर्वी केले आहेत.

मराठी रंगभूमीवर पूर्ण वेळ नाटक, एकांक, एकांकिका भरपूर प्रमाणात सादर होत असतात. मात्र त्या तुलनेत त्यांच्या संहिता या पाच टक्केदेखील प्रकाशित स्वरूपात उपलब्ध नसतात. परिणामी नाट्यवाङ्मय आपल्याकडे फारसे उपलब्ध होत नाही आणि त्या लेखनाच्या वाङ्मयीन दर्जा, गुणवत्तेची दखलही घेतली जात नाही. नाट्य हे मुळात वाङ्मय असते. श्रीपाद भालचंद्र जोशी यांचे हे लेखन उपलब्ध करून दिल्याबद्दल वर्णमुद्रा प्रकाशन अभिनंदनास पात्र आहे. या सर्वच एकांकिका ह्या समृद्ध प्रायोगिक प्रतिमा-नाट्य असून ते एकाच वेळी श्रेष्ठ नाट्यवाङ्मय आणि नाट्यशास्त्र व रंगभूमीची सखोल जाण असणारी रंगावृत्ती आहेत.

यातले काही एकांक हे बहुप्रवेशीदेखील आहेत. भरपूर रंगसूचना, तंत्रसमृद्धता, समाजातील विभिन्न स्तर व थरातील जीवन-जाणिवांचे अल्पाक्षरी दर्शन इथे घडते.

जीवनाच्या वेगवेगळ्या छटा, भावनिक संघर्षाचे विविध पैलू, वेदनेची, दुःखाची विविध रूपे, सूचकता आणि सौंदर्यजाणीव यांचा बोध अशा कितीतरी वैशिष्ट्यांनी युक्त या दुर्मिळ अशा श्रेष्ठ नाट्यसंहिता आहेत, अशा आशयाची मते, या संग्रहाला असणाऱ्या परिशिष्टात डॉ. श्रीपाल सबनीस यांनी मांडली आहेत.

या लेखनाची प्रकृती परिशिष्टात प्रा. माणिक कानेड यांनी म्हटल्याप्रमाणे नवनाट्य प्रकाराची असून ॲबसर्ड अशा प्रकारची ही अनुभूती असून त्यातही एक सुसंगतता आणि नाट्याकार आहे.

या लेखनाच्या प्रवृत्तीला साजेशी दोन्ही संग्रहांचे देखणी, कलात्मक मुखपृष्ठ सतीश भावसार यांची आहेत.

**१. चिमण्या, टरफले आणि सैगल व इतर एकांक**
श्रीपाद भालचंद्र जोशी
वर्णमुद्रा प्रकाशन, शेगाव, मूल्य : २०० रु.
**२. सुवर्णपर्वताच्या पल्याड आणि इतर एकांक**
श्रीपाद भालचंद्र जोशी
वर्णमुद्रा प्रकाशन, मूल्य : १८० रुपये

# ग्रंथपान



**चांगदेव काळे**
**९८६९२०७४०३**

**श्रमिकांच्या अनोख्या जगात**
**विवेक पटवर्धन**




**जिथे घामाला फुले आणि काटे फुटतात**

*‘रेकॉल्डनं दिवाळीच्या दिवशी मिठाई वाटून सर्व कामगारांना दिवाळीच्या सुट्‌ट्यांमध्ये मजा करा असं सांगितलं. त्यानंतर मात्र दिवाळीच्या आदल्या दिवशी लोकांना काढून टाकल्याची पत्र पोस्ट टाकली. जी बहुतेक कर्मचाऱ्यांना दिवाळीच्या दुसऱ्या दिवशी मिळाली. दुसऱ्या बाजूला बेजबाबदार कामगार नेत्यांनी बेइमान मॅनेजमेंटशी हात मिळवणी केल्याचीही चिक्कर उदाहरणं आहेत. मात्र ते करार गुप्तपणे झाले आणि लोकांनी त्याचा बऱ्यापैकी अचूक अंदाज वर्तवला असला तरी वास्तव नजरेआडच राहिलं.’*

कामगार हा यंत्र नाही तो माणूस आहे, तसा एका कुटुंबाचा तो कुटुंबप्रमुखदेखील आहे. त्याच्या पूर्ण क्षमतेचा उपयोग करून घेताना त्याला त्याचा मेहनतानादेखील त्याच पद्धतीने पुरेपूर मिळायला हवा. तो समाधानी असायला हवा. तरच त्याचे कुटुंब जे त्याच्यावर पूर्णपणे अवलंबून आहे त्यांच्या सगळ्या गरजा तो पूर्ण करू शकेल. व्यवस्थापनाने हे लक्षात घ्यायला हवे की कामगार भावना, संवेदना आणि मन असलेला एक माणूस आहे. त्याच्याशी सख्य करूनच कारखान्याची प्रगती होऊ शकते. कामगाराला हिशेबात न धरता व्यवस्थापन मनमानी पद्धतीने त्याला राबवू पाहत असेल तर त्यात व्यवस्थापनाला यश येण्याची शक्यता नाही. असे यश मिळवायचे असेल तर कामगार जसा कुशल असायला हवा तसाच व्यवस्थापनाचा हेतूदेखील कुशल असायला हवा. व्यवस्थापनात काम करणारे अधिकारीदेखील त्याच पद्धतीने कुशल असायला हवेत. कारखाना आणि कामगार यांचे जसे नाते आहे तसेच कामगार आणि कामगारांच्या संघटना हेदेखील एक नाते आहे. कामगारांच्या संघटना कामगारांच्या सुविधा, सुरक्षा आणि योग्य वेतन यासाठी जशा जागरूक असतात तशाच त्या व्यवस्थापनाशीदेखील सहकार्य करून दोन घटकांतील मध्यस्थ माध्यम म्हणून काम पाहतात. हे काम करण्यासाठी कामगार संघटनेचा नेतृत्व करणारा नेतादेखील कुशल आणि आपल्या भूमिकेवर ठाम असणारा हवा. तरच तो कामगारांना न्याय देऊ शकतो. जो कामगार नेता कामगारांची बाजू सांभाळण्याऐवजी कारखान्यातील व्यवस्थापनाशी हातमिळवणी करत असेल तर तो कामगाराचा नेता म्हणून काम करण्यास योग्य आहे याबाबत शंका उपस्थित होते. त्यामुळे कामगारांवर अन्याय करण्यासाठी जसे व्यवस्थापन जबाबदार ठरते तसे कामगारांचे नेतृत्व करणारे नेतेदेखील जबाबदार ठरू शकतात. कारखाना आणि कामगार यांच्या या अंतर्गत बाबी त्यांनाच कळू शकतात जे या क्षेत्रात अनेक वर्षे कार्यरत आहेत. विवेक पटवर्धन हे व्यवस्थापनातील एक अनुभवी नाव. त्यांचा कामगारक्षेत्राशी जवळून असलेला त्यांचा संबंध, कारखान्यांची भरभराट, कामगारांची पीछेहाट, कारखान्यांचे स्थलांतर वा बंद होणे याच्याशी असलेला कनिष्ठ संबंध, यातून साकार झाले ’श्रमिकांच्या अनोख्या जगात’ हे अनुभवसंपन्न पुस्तक!

कामगारजगत हे औद्योगिक संबंधावर अवलंबून असते. औद्योगिक संबंधांमध्ये असलेल्या अंतर्गत राजकारणाबाबत आपण अनभिज्ञ असतो परंतु लेखकाने संदर्भांसह आपल्याला हे राजकारण सम जावून सांगितलेले आहे. कुठलाही कारखाना किंवा उद्योग धंदा बंद करण्यामागे मालकाचे हितसंबंध वेगळे असतात आणि त्यात राजकारणी मंडळीदेखील हात धुऊन घेण्यात मागे नसतात, हे वाचून आपण दिङ्‌मूढ होतो. लेखक याला बुद्धिबळाचा खेळ म्हणतात. ओपनिंग गेम, मिडल गेम आणि एंड गेम यात व्यवस्थापन आणि मालक यांचा दृष्टिकोन कसा असतो तेही आपल्या समजुतीपलीकडचे असते, याचा अनुभव येतो. कोलगेट, रेमंड, जीएसके, हिंदुस्थान लिव्हर, मारुती, या कंपन्यांच्या सोबतच गिरणीसंप, टाळेबंदी यांचे लेखकाने केलेले विश्लेषण वाचताना राजकारणाचा आणि स्वार्थाचा पराकोटीचा खेळ लक्षात येत जातो.

लेखकाने कामगार हिताच्या दृष्टीने अनेक कामे केलेली आहेत. त्यासाठी त्यांच्या वस्तीत जाऊन परिस्थिती समजावून घेणे, त्यांना मदत करणे आणि कामगारांची बाजू व्यवस्थापनाच्या समोर योग्य रितीने मांडणे, यासाठी लेखकाचे प्रयत्नही येथे दिलेले आहेत. संपूर्ण कामगारक्षेत्र, औद्योगिकजगत आणि त्या भोवती फिरणारे राजकारण याबाबत लेखकाने हे लेख लेख लिहिलेले आहेत. आपल्या लेखनासाठी त्यांनी या क्षेत्रातले विविध तज्ज्ञांचे संदर्भ दिलेले आहेत. तसेच, मानसशास्त्राचा खास त्यासाठी अभ्यास केलेला आहे. आपण या क्षेत्रात कसे आलो आणि त्यासाठी काय काय प्रयत्न केले त्याचीही माहिती लेखकाने येथे दिलेली आहे. ‘तुमचं अपयश तुम्हाला ठाऊक असतं आणि ते केवळ तुम्हालाच दिसेल असा एक डाग मनावर उमटवून जातं.’ ’ संपात सामान्य कर्मचाऱ्यांना खूप हाल सोसावे लागतात. त्यांना केवळ आर्थिक नुकसान सोसावं लागतं असं नाही तर नोकरी गमावल्यानं समाजातील स्थानही खालावतं. काही वेळा मुलांची शिक्षण थांबतात, सामाजिक पातळीवर त्यांना त्याचा जबर फटका बसतो.’ यांसारखी वाक्ये लेखकाच्या अनुभवातून आलेल्या नवनीताची साक्ष देतात.

विवेक पटवर्धन हे एशियन पेंट्स कंपनीचे एचआर विभागाचे प्रमुख होते. एमएसएल ड्राइव्ह लाइन्स लिमिटेडचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले. हायटेक इंजिनीयर्स कंपनीचे ते संचालक आहेत. टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे चेअर प्रोफेसर ऑफ इंडस्ट्रियल रिलेशन्स होते. आरोहन या एनजीओचे ते विश्वस्त आहेत.

या लेखसंग्रहाला विद्याधर दाते यांची अभ्यासपूर्ण प्रस्तावना लाभलेली आहे. सतीश प्रधान यांनी या पुस्तकाची पाठराखण केलेली आहे. सतीश भावसार यांनी खूप सुरेख असे मुखपृष्ठ या पुस्तकासाठी दिलेले आहे.

**मूल्य ४०० रुपये    सवलतीत २४० रुपये**




# ग्रंथपान

**लढा मुंबईचा कोविडशी**
**सुरेश काकाणी**
**शब्दांकन : सुमित्रा देबरॉय,**
**अनुवाद : वैशाली रोडे**




**कोरोनालढ्याची बखर**

एकविसाव्या शतकातील लक्षात ठेवण्यासारखी कुठली घटना आहे असा प्रश्न कोणीही विचारला तरी प्रत्येकाच्या ओठांवर एकच शब्द असेल, कोरोना! कोरोना किती भयंकर होता, त्याचे परिणाम किती भयंकर झाले, याबाबतचे अनुभव त्यानंतर अनेकांनी आपापल्या अनुभवानुसार शब्दांकित केलेले आहेत. आपला संबंध जरी कोरोना नावाच्या आजाराशी आला तरी त्यानंतरची पुढील सर्व जबाबदारी आपण दुसऱ्या व्यवस्थापनावर टाकलेली होती. अगदी साधे उपचार म्हणून तपासण्या, त्यानंतरच्या औषधांची उपलब्धता, आजार पूर्ण बरा होण्यासाठी लागणारी रुग्णालयीन व्यवस्था, या सगळ्या गोष्टी दुसऱ्यांकडून अपेक्षित होत्या. कोरोना नावाच्या शत्रूला हरवण्यासाठी जी सज्ञता केली, प्रयत्नांची पराकाष्टा केली, दूरदृष्टी दाखवली, आणि आवश्यक असणारी सर्व व्यवस्था उत्तम रितीने उपलब्ध करून दिली, अशा प्रशासनाबाबत आपणास फारशी माहितीदेखील नाही. 'त्यात काय, हे सरकारचे काम आहे', अशी आपली नेहमीची बेफिकीर वृत्ती होती. मात्र सरकारऐवजी दुसरी यंत्रणा उभी होती, तिची माहिती आपल्यासमोर ठेवली आहे सुरेश काकाणी यांनी.

सुरेश काकाणी हे प्रशासकीय अधिकारी असून बृहन्मुंबई महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त म्हणून त्यांनी काम पाहिलेले आहे. आरोग्य आणि आपत्ती व्यवस्थापन हे विभाग त्यांच्या आखत्यारीत होते. कोरोना आला तेव्हा या दोन्ही विभागांची जबाबदारी खूप मोठी आहे हे प्रकर्षाने जाणवले. अशा वेळी संयमाने आणि दूरदृष्टी ठेवून काम करावे लागले. सगळ्यात महत्त्वाचा म्हणजे या साथीबाबतचे स्पष्ट निदान आणि त्यावरचे हमखास उपाय समोर नव्हते. तरीही त्यावर मात करणे आवश्यक होते. त्यासाठी घ्यावे लागणारे सर्व कठोर आणि तत्पर निर्णय सुरेश काकाणी यांनी घेतलेले आहेत. 'लढा मुंबईचा कोविडशी' हे त्यांच्या अनुभवांचे आणि कोरोनाला परतवून लावल्याच्या प्रयत्नांचे अनुभव कथन आहे. मुंबई शहराची लोकसंख्या एक कोटी ३५ लाख, ती २४ विभागांत विभागलेली, दवाखान्यांची संख्या १८६ इतकी आणि यात खाजगी, महानगरपालिका आणि शासन यांच्या रुग्णालयांचा समावेश आहे. या सगळ्यांच्या मिळून उपलब्ध होणाऱ्या सेवा अपुऱ्या पडू लागल्या तेव्हा कस्तुरबा रुग्णालयापासून सेव्हन हिल्सनंतर उघड्या मैदानावर उभारलेली जम्बो हॉस्पिटल अशी सर्वत्र पन्नास हजारांपर्यंत बेड उपलब्ध करून देण्याची कामगिरी पार पाडावी लागली. उपलब्ध असणारे सर्व शाखांमधील डॉक्टर, नर्स यांना काही वेळेस आदेश देऊन सक्तीने रुग्णांवर उपचार करण्यासाठी पाचारण करावे लागले. शंका, समस्या, तक्रारी यासाठी वार रूम सुरू कराव्या लागल्या. औषधे, पीपीई किट, मास्क पुरेशा प्रमाणात उपलब्ध नव्हते ते केरळ राज्याकडून खाजगी विमानाद्वारे मागवावे लागले. रुग्णांची वाढती संख्या आणि सेवेवर पडलेला ताण याचा परिणाम डॉक्टर, नर्स यांच्यावरदेखील होऊ लागला. त्यातच वाहतूक बंद. घरच्यांची काळजी. स्वतःची काळजी. अशी कोंडी निर्माण झाली. तेव्हा या सगळ्यांसाठी ताजसारख्या मोठ्या हॉटेलची मदत घेऊन तेथे सोय करावी लागली. या सगळ्यात सेवा देणाऱ्या नर्स आणि डॉक्टर यांची पूर्ण काळजी घेण्यात आली. एसी, आयसीसीयु, सर्व तपासण्या, अशा सर्व सुविधा तातडीने उपलब्ध होतील यांची काळजी घेतली. सर्व व्यवहार बंद असतानादेखील पाणी, स्वच्छता, फवारणी, निर्जंतुकीकरण, लसीकरण, अशा सर्व सोयी वेळच्या वेळी सुरळीत राहतील याचेही भान ठेवले. आयसोलेशन, क्वारंटाइन, कंटेनमेंट, रुग्ण येण्याची वाट पाहत न राहता त्यांचा शोध घेणे, या उपाययोजनांची अंमलबजावणी केली.

कोरोनाच्या तीन लाटा आपल्यावर आदळल्या. त्यांना परतवून लावण्यासाठी प्रशासनाने काय प्रयत्न कसे केले यांचा संपूर्ण तपशील या पुस्तकात दिलेला आहे. सर्व स्तरांवरील जबाबदारीने पार पाडलेल्या टप्प्याटप्प्यांचा वृत्तांत यात आला आहे. मुंबई महानगरपालिकेने सर्व स्तरांवर घेतलेली दक्षता आणि शासनाने दिलेला पाठिंबा यामुळे कोरोनावर मात करणारी मुंबई 'मुंबई मॉडेल' म्हणून ओळखली गेली. रुग्णांची संख्या, मृत्यू पावलेल्यांची संख्या, यांची आकडेवारी देतानाच प्राण वाचवा ही मोहीम कशी राबवली, त्यासाठी अथकपणे प्रयत्न कसे केले, मृत्यूनंतर करायचा अंत्यसंस्कार याबाबत धोरण कसे ठरवावे लागले, एक जबाबदार अधिकारी म्हणून यासाठी काय काय करावे लागले, याची माहिती वाचताना आपण थक्क होतो.

सुरेश काकाणी यांचे हे अनुभवकथन आहे तरीदेखील त्यात 'मी'चा अभाव आहे. सर्व मिळून केलेले हे सांघिक कार्य आहे या भावनेने त्यांनी हे लेखन केलेले आहे. विषय गंभीर आणि तितकाच नावीन्यपूर्ण असल्याने त्याविषयीचा तपशील प्रशासकीय भाषेत येण्याची शक्यता असतानाही त्या सर्व परिभाषा टाळून सुंदर, ललितमय पद्धतीने हे लेखन झालेले आहे. मुंबई महानगरपालिका, तिचे कार्यक्षेत्र, तिचा असलेला एकूण आवाका, यापूर्वी मुंबईने सहन केलेल्या अनेक साथींचा आणि समस्यांचा इतिहास येथे दिलेला आहे.

'लढा मुंबईचा कोविडशी' याचे शब्दांकन सुमित्रा देबरॉय आणि त्याचा अनुवाद वैशाली रोडे यांनी केलेला आहे . शब्दांकनकार आणि अनुवादक यांच्या प्रवाही आणि उत्तम ललितमय लेखनाची आवश्यक नोंद घ्यायला हवी. हे लेखन एका प्रशासकीय अधिकाऱ्याचे अनुभवकथन आहे आणि ते त्यांच्याच शैलीत आपल्यासमोर आलेले आहे, असेच आपल्याला जाणवत राहते. त्यामुळे शब्दांकनकार आणि अनुवादक यांना धन्यवाद द्यायला हवेत आणि कौतुकही करायला हवे. विषयाला हात घालण्यापूर्वी सुरेश काकाणी यांनी लिहिलेले मनोगत अवश्य वाचायला हवे. त्यांनी मनोगतला बखर असा शब्दप्रयोग केलेला आहे आणि खरोखरच ही एक लढ्याची बखरच म्हणायला हवी. डॉ. सुभाष साळुंखे, महाराष्ट्र शासनाचे माजी आरोग्य महासंचालक यांची प्रस्तावनादेखील या बखरीला दुजोरा देते. सतीश भावसार यांचे आशयसंपन्न मुखपृष्ठ या बखरीला लाभलेले आहे.


**मूल्य ३५० रुपये   सवलतीत २१० रुपये**



# ग्रंथपान

## उजेड पेरायचा आहे

**भास्कर कदम**



**उद्याच्या आशावादाची कविता**

*'चळवळीचा मूळपिंड तसेच राष्ट्रसेवा दलातून जडणघडण त्यामुळे सामाजिक जाणीव अधिक तीव्र झाल्या. माझा मूळ पिंड शोधपत्रकारितेचा होता. त्यामुळे विषयाच्या मुळाशी जाण्याची अंगभूत प्रवृत्ती बनली. होणारा अन्याय मला अस्वस्थ करत असे. त्यावेळी खूप शब्दांचा मारा करत असे. परंतु मी स्वतः 'लीन' नावाचे सांस्कृतिक नियतकालिक काढले तेव्हा मला कवितेतून कमी शब्दांत जास्त आशय मांडला जाऊ शकतो, तो लेखाइतकाच प्रभावी असतो, किंबहुना तो अधिक परिणामकारक असतो तसेच त्याचा प्रभाव दीर्घकाळ टिकणारा असतो याचीही जाणीव झाली.'*

'उजेड पेरायचा आहे' हा भास्कर कदम यांचा पहिलाच काव्यसंग्रह. त्याच्या शीर्षकातच या काव्यसंग्रहाचे अंतरंग दडलेले आहे. जिथे दुष्काळ असतो तिथे पावसाची आवश्यकता असते. जिथे दारिद्र्य असते तिथे भरणपोषणाची आश्वासक सोय आवश्यक असते. जिथे विषमता असते तिथे सम नतेची आवश्यकता असते. आणि जिथे अंधार असतो तिथे उजेडाची आवश्यकता असते, हेच कवीला या संग्रहातून सांगायचे आहे.

'बिनलाज्या पाऊस' या कवितेत कवी पावसाच्या लहरीपणाचे वर्णन करताना त्याचा एकूण परिणाम किती दूरवर होतो याचे चित्र आपल्यासमोर उभे करतो. शेतकरी शेतात काम करतो तेव्हा तो रक्ताचे पाणी आणि हाडाची काडे करून मोठ्या आशेने राबत असतो. मेहनतीला फळ येईल या आशेवर तो जगत असतो. इतकेच नव्हे तर त्याच्यासोबत काळी मातीदेखील आसुसलेली असते. परंतु पाऊस मात्र कधी चोरून येतो तर कधी दूर दूर पळतो. खरे तर अलीकडे ऋतुमानदेखील बदललेले आहेत. निसर्ग लहरी, उन्मादी झाला आहे आणि त्याला कारण मानवांच्या चुका कारणीभूत ठरलेल्या आहेत, हेही कवी आपल्या निदर्शनास आणून देतो आहे. त्याचे वर्णन करताना कवी म्हणतो,

कशावरही आता नाही भरवसा
धरणीवर अवदसा विध्वंस करीत आहे

आपल्या समाजाला सगळ्यात मोठी कीड लागलेली आहे ती म्हणजे विषमता, गरीब आणि श्रीमंत यांच्यात वाढत चाललेले दरी. हा खरा चिंतेचा विषय झालेला आहे. एकीकडे श्रीमंतवर्ग कुठेही–कसाही पैसा उधळतो आहे, आपल्या आनंदाचे प्रदर्शन मांडतो आहे आणि त्याचवेळी गरीबवर्ग दिव्यातल्या तेलासाठी वंचित आहे. उद्याचा दिवस कसा घालवायचा या चिंतेने तो खंगलेला आहे. याचे चित्रण 'दिवाळी' या कवितेत आले आहे.

अलीकडे राजकारण हा विषय खूपच हळवा आणि तितकाच तीव्र झालेला आहे. यात कुठलाही मुलाहिजा ठेवला जात नाही, नीतीनियम आणि तिची आचारसंहिता पाळली जात नाही. फसवणुकीला मुत्सद्देगिरीचा मुलामा दिला जातो. जुमलेबाजी, फेकाफेकीची बरसात होते. सामान्य माणसाला गृहीत धरले जाते आणि लोकशाहीच्या नावाने ढोल बडवले जातात, हे विदारक वास्तव 'राजकारण' या कवितेत आलेले आहे. त्याबाबत कवी असे म्हणतो,

मार्क्स म्हणतात धर्म अफूची गोळी असते
आज राजकारण आणि अफू एकत्र दिसते
मार्क्स गेला तरी विचार नाही मेला.
धर्म, जातीविद्वेषाची नशा दिवसेंदिवस चढते

समाजात होणारे जातिभेद, विषमता, विद्रोह समोर दिसत असताना त्यावर हल्ला करण्याच्या ऐवजी माणसातील पुरुषार्थ गमावला गेलेला आहे आणि तो हतबलतेने जगतो आहे. यात नुसता माणसाचा बळी जात नाही तर माणुसकीचादेखील बळी जातो आहे, हे सत्य कवी 'कलेवर' या कवितेत मांडतो.

शोषितवर्गाला कुणी वालीच उरला नाही अशा तऱ्हेचे चित्र काही काळ या वर्गाने खूप सहन केले. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या रूपाने एक देवदूत आला आणि या शोषित वर्गाचे पुनर्जीवन झाले. डॉ. बाबासाहेबांच्या या थोर कार्यासाठी कवी त्यांच्याविषयी मनापासून कृतज्ञता 'जय भीम', 'भीमा' या कवितांतून व्यक्त करतो.

गाव कोसावरून लेकरा आता गावचे झाले
तुझ्या विचारांचे झेंडे सातासमुद्रापार नेले.
बाबा तुझे लेकरांवर लय उपकार झाले
आता जगण्याबरोबर मरणही यातनाहीन झाले

गांधींच्या हत्येविषयीदेखील कवी जाहीर करतात की हत्या शरीराची होऊ शकते, विचारांची नाही. संतांनी दिलेल्या संस्कारक्षम शिकवणीचाही कवी आवर्जून उल्लेख करतो.

'अजून उजेड पेरायचा आहे' या संपूर्ण कवितासंग्रहातून आपण एका सकारात्मकतेकडे येतो हे निश्चित. परिस्थितीला शरण जाण्याऐवजी लढा द्यायला हवा. जातिभेदाचे नुसते वर्णन करण्याऐवजी बुद्ध आणि विठ्ठल एक रूपात पाहूया. बेचिराख करायचे वाईटाला, रागाला, द्वेषाला, मतलबाला आगीत भस्म करूया. माणुसकीच्या दरबारात एका तालासुरात माणुसकीचे गाणे एक साथ गायचे आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता नांदावी हीच आम्हा भारतीयांची भावना आहे. भारत आमचाही देश आहे! हा एक मोठा उदात्त दूरगामी संदेश कवी या संग्रहातून आपल्यासमोर ठेवतो आहे.

कवी भास्कर कदम हे पत्रकार आणि कार्यकर्ता अशा दोन्ही भूमिकेत वावरत असल्याने समाजातील सर्व स्तरांवर त्यांचा वावर आहे. त्यामुळे या कवितांना अस्सल असा खरेपणाचा हात आहे. त्यांच्याकडे जिद्द आहे आणि म्हणूनच आपण काय करायला हवे याचा एक ध्यास त्यांच्या कवितेतून व्यक्त झालेला आहे. कवी अनेक संस्थांचे पदाधिकारी आहेत. अनेक वृत्तपत्रांमधून त्यांनी पत्रकारितेबरोबरच उत्तम असे साहित्य लेखन केलेले आहे.

या संग्रहाला डॉ. राहुल रनाळकर, संपादक दै. सकाळ यांची प्रस्तावना आहे. त्यात ते म्हणतात, या कवितेचा मूळ हेतू म्हणजे वाचकाच्या रसिकाच्या मनाला, मेंदूला, विचारशक्तीला हात घालणे, तो कविता वाचताना नक्कीच पूर्ण होतो. पुस्तकाचे मुखपृष्ठ सतीश भावसार यांनी उत्तम रितीने सजवलेले आहे.

**मूल्य १५० रुपये   सवलतीत १०० रुपये**

# ग्रंथपान

**हिमाक्षरे**
**प्रल्हाद जाधव**




**हिमालय की गोदमे**

*'सोनसळी ऊन हलत असताना पाहायला मिळणे यासारखा दुसरा आनंद नाही. लाखो रुपये मोजले तरी तो अनुभव पदरी पडणे अवघड. शिखरावरून खाली आलेल्या सूर्याच्या पहिल्या सोनेरी किरणाने दरीतील नदीच्या पाण्याला स्पर्श केला तो क्षण अंगावर रोमांच उठवून गेला. तेज आणि आप या दोन तत्त्वांचे ते अद्‌भुत मीलन सृष्टीच्या सृजनशील वृत्तीशी माणसाला जोडू पाहत होते. त्यातच भर म्हणून की काय, समोरच्या पॉप्लरच्या झाडांची सळसळ आणि त्यांच्या पानांवर पडणाऱ्या कोवळ्या किरणांची प्रभा जिवाला पिसे लावून जात होती.'*

'हिमाक्षरे' हे आहे प्रवासवर्णन, ज्यात संपूर्ण प्रवास हा हिमालयाच्या अंगाखांद्यावरचा आहे. हिमालय हा केवळ हिम अधिक आलय म्हणजे बर्फाचे माहेरघर आहे आणि लोक तेच पाहायला जातात, असे म्हणणे म्हणजे हिमालयाचा अपमान करण्यासारखे आहे. बर्फ ही त्याची ओळख आहे म्हणून तो हिमालय; परंतु हिमालय हा त्याही पलीकडे आहे. ज्यांनी तो पाहिला ते त्याची खात्री देतील. ज्यांनी पाहिला नाही त्यांनी त्यासाठी तो पाहायला हवा. 'हिमाक्षरे' हे प्रवासवर्णन वाचा. वाचल्यानंतर तर नक्कीच हिमालय पाहण्याची इच्छा अनिवार झाल्याशिवाय राहणार नाही.

प्रल्हाद जाधव यांनी आपल्या गिरिभ्रमणाचा दस्तऐवज वाचकांच्या हाती दिलेला आहे, जो त्यांच्या अनुभवांचा 'याची देही याची डोळा'ची साक्ष देणारा आहे. त्यांनी एकदा नाही दोनदा नाही तर तब्बल नऊ वेळा हिमालयाची सैर केलेली आहे. त्याची स्मरणटिपणे काढून ठेवलेली आहेत. या सगळ्यांचे सार म्हणजे 'हिमाक्षरे' होय.

काराकोरम पर्वतरांगांशी सलगी सांगत थेट अरुणाचल प्रदेशापर्यंतच्या हिंदमातेचा खडा रक्षक,संपूर्ण भारतवासीयांचा सखा हिमगिरिराज सिंहाच्या थाटात ऐसपैस असा दिमाखात विसावलेला आहे. या साम्राज्याचे वैभव, त्याची वैशिष्ट्ये, त्याची संपन्नता, पोलादी सज्जता, अगत्यपूर्वक स्वागतशीलता, प्रल्हाद जाधव यांनी प्रत्यक्ष पाहिली-अनुभवलेली आहे. प्रत्येक वेळेचे अनुभव हे हिमालयाची आकाशाएवढी उंची, त्याचे धोकादायक दुस्तर प्रस्तर, खोल खोल खंदकासारख्या दऱ्या, उंच उंच बुरुजासम शिखरे, विविध वृक्षांच्या घनदाट भूलभुलैयी राया, बारमाही नद्यांचा खळखळाट आणि चंचलता, बदलते हवामान, भेटलेले स्थानिक आणि पर्यटक, या सगळ्यांशी निगडित आहेत. ते तितकेच विलक्षण, आनंददायी, थरारक, थकवून टाकणारे तरीही उल्हसित, आनंदाची अनुभूती पेरणारे आहेत, चित्तवृत्तींना प्रतिभेचे कोंब फुटावेत असे आहेत. प्रल्हाद जाधव या सगळ्यांचे वर्णन अगदी तपशिलाने करतात.

परंतु खरा प्रवासी तो असतो जो दिसते त्या पलीकडचे पाहतो, अनुभवतो, त्याचे संदर्भ शोधतो, भूत-वर्तमानची इतिहासाशी सांगड घालतो; आणि सर्व काही मागे टाकून स्वप्रज्ञेने त्याच्या सौंदर्याशी पोहोचतो. 'हिमाक्षरे' त्याची साक्ष देतात.

प्रल्हाद जाधव हे माहिती व जनसंपर्क संचालक होते. उत्तम साहित्यिक आहेत, नाटककार आहेत. लेखनाची त्यांची स्वतःची अशी एक शैली आहे. माणूस आणि समाज यांच्या अंतरंगाशी थेट भिडणारे, त्यांचे मानसशास्त्र उलगडून दाखवणारे त्यांचे लेखन असते. या लेखनाला हळुवार, तरल आणि तितकाच सहज भेटणारा गतिमान प्रवाह असतो. त्याचप्रमाणे निसर्गात वावरताना, त्याचे सौंदर्य प्राशन करताना ते निसर्गकविताच जगत असतात. त्यांनी या प्रवासवर्णनात केलेल्या विविध प्रसंगांची, देखाव्यांची, अनुभवांची, वर्णने वाचताना आपण कविताच अनुभवत आहोत, असे वाटत राहते. मनमोकळेपणा आणि सदा प्रसन्न वृत्ती त्यांच्या ठायी असल्याने त्यांचे प्रतिबिंब या लेखनात सांडले नसते तरच नवल! 'जमिनीवरचे पाय सुटले की माणसाच्या प्रतिभेचे पंख भरायला सुरुवात होते. माझे थोडेफार तसेच झाले.' 'आकाश म्हणजे मन आणि त्याच्यात येणारे विचार म्हणजे ढग, अशी एक कल्पना सुचली.' 'सोनसळी किरणांचा नजरबंदी करणारा तो उत्सव पाहून माझी जणू भावसमाधी लागली. 'तमसो माऽऽ ज्योतिर्गमय' ही प्रार्थना जणू जिवंत होऊन समोर आली आणि तिने साऱ्यांचे अंतरंग उजळून काढले.' अशी वाक्ये केवळ कविताच नाही तर त्यांच्या चिंतनशील विचारांची देखील प्रचीती देतात. आपण थेट त्यांच्या सोबत आहोत आणि ते आपल्या मनाचा संवाद साधत आहेत, असेच वाटत राहते.

पुस्तकाची मांडणी आणि नेटकेपण त्याच्या शीर्षकापासून सुरू होते. या पुस्तकाची चार भागांत विभागणी केलेली आहे. प्रत्येक भागाला दिलेले शीर्षक, पोटशीर्षके, आणि त्यासोबत दिलेला दोह्यांसारखा काव्यरूपी मथळा त्यांच्या चोखंदळपणाची, धारणेची, विचारांची, तत्त्वज्ञानाची साक्ष देतात. पुस्तकाच्या शेवटी प्रवासाला निघताना कोणती काळजी घ्यायला हवी; हिमालयाच्या प्रवासात कोणकोणते पक्षी आढळले, यांची परिशिष्टे जोडलेली आहेत. वाचकांच्या माहितीसाठी ती उपयुक्त तर आहेतच, शिवाय ज्यांना हिमालयाच्या गिरिभ्रमणाची ओढ लागलेली आहे किंवा अन्यत्र कुठे प्रवासाला निघायचे आहे, त्यांच्यासाठी ही खूप उपयुक्त आहे.

प्रल्हाद जाधव यांचे वैशिष्ट्य असे, की ते स्वतःविषयी लिहितात त्यापेक्षा सोबतचे सहप्रवासी, आणि भेटलेल्या व्यक्ती, सैनिक, सैनिकी पराक्रम, यांच्याविषयी अधिक तन्मयतेने लिहितात. असेच एक सहप्रवासी राजेश गाडगीळ, सुप्रसिद्ध गिर्यारोहक आणि 'द हिमालयीन जर्नल'चे संपादक, यांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहिलेली आहे. 'एखाद्या कसलेल्या गायकाने एका संथ अशा लयीत बंदिशीची सुरुवात करावी आणि हळूहळू त्या मैफिलीनं आपल्याला बेहोश करत न्यावं, अगदी तसा अनुभव या वाचनानं दिला,' असा अभिप्राय त्यांनी या लेखनाविषयी प्रस्तावनेत दिला आहे. पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठ आणि आतील सुंदर रेखाटने गोपी कुकडे यांची आहेत.

**मूल्य ३५० रुपये सवलतीत २१० रुपये**

## कार्यक्रम व प्रकाशन क्षणचित्रे







वांद्रे येथील 'एमआयजी क्लब'मध्ये 'शतकात एकच.. सचिन' पुस्तक ठेवण्यात आले. त्यावेळी उपस्थित क्लबचे पदाधिकारी व ग्रंथाली सदस्य



'शब्दरंग'चे प्रकाशन



'पाने पिवळी पडत चालली असताना'चे प्रकाशन







'शब्द रुची'च्या के.ज. पुरोहित विशेषांकाचे प्रकाशन

अभिवाचन – मधुरा वेलणकर व विजय केंकरे



'रानभुलीचे प्रदेश'चे प्रकाशन



'योग: कर्मसु कौशलम्'चे प्रकाशन



सुनील कर्णिक @ ७५
अमृतमहोत्सव सोहळ्यात मानपत्र प्रदान...

RNI No. MAHMAR/2013/50137
Published on 10th of Every Month.

Postal Registration No. MCW/310/2022-2024
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001 on 10th & 11th of Every Month.

सारस्वत बँक | सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
(शेड्युल्ड बँक)

डेअर टू ड्रीम...



# शैक्षणिक कर्ज

₹1.5 कोटींपर्यंत
@ 10% प्र. व.

विद्यार्थिनींसाठी खास 9.5% प्र.व. व्याजदर

कोर्स फीस्च्या 100% अर्थसहाय्य

परतफेडीचा कालावधी 12 वर्षे
(मोरॅटोरियम कालावधी व्यतिरिक्त)

प्रोसेसिंग फीस् वर 25% सूट

भारतातील आणि परदेशातील शिक्षणासाठी

फॉरेन करन्सी / फॉरेक्स रेमिटन्सच्या खरेदीवरील कमिशनवर 25% सूट
शैक्षणिक कर्जावरील भरलेल्या व्याजदरावर टॅक्स बेनिफिट (इन्कम टॅक्स ऍक्ट 1961 च्या कलम 80E अंतर्गत)

अधिक माहितीसाठी 90290 50027 या नंबरवर मिस्ड कॉल द्या.

• ऑफर फक्त मर्यादित कालावधीकरिता •

नियम व अटी लागू. 2023जून

www.saraswatbank.com

मुद्रक, प्रकाशक, संपादक : सुदेश राजाराम हिंगलासपूरकर यांनी ग्रंथाली विश्वस्त संस्थेच्या वतीने, 'शब्द रुची' हे मासिक इंडिया प्रिंटिंग वर्क्स, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी.डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ४०००३१ येथे छापून ग्रंथाली विश्वस्त संस्थाच्या वतीने, वुलन मिल म्युनिसिपल स्कूल, खोली नं. ९, तळमजला, जे. के. सावंत मार्ग, यशवंत नाट्यमंदिराशेजारी, माटुंगा (प), मुंबई ४०००१६ येथे प्रकाशित केले.